२४५३

पुणें मराठी ग्रंथालय
निबंध
क्रमांक— ९३

...हामंडळ—पुस्तकमाला

015631

संदर्भ

# खरें गोरक्षण.

# COW-PROTECTION
## IN ITS REAL SENSE.

लेखक व प्रकाशक
डॉ. रामचंद्र भीमराव नाईक.
एम्. सी. पी. एस्., एल्. एम्. अँड एस् (नॅशनल)
ह. भ. प. अनंतदास रामदासी.

मार्गशीर्ष शके १८३९

किंमत १२ आणे

नवें साप्ताहिक ] **गोरक्षण** अथवा **कृषिजीवन** [ लौकरच सुरूं होईल.

या नांवाचें साप्ताहिक फेब्रुवारी १९१८ चे सुमारास श्री सनातन गोवर्धन महामंडळातर्फे आम्ही सुरूं करणार आहों. हिंदुस्थानांत शेंकडा नव्वद लोक शेतीवर निर्वाह करीत असून, शेतीस भरपूर व चांगल्या बैलांची जरूरी असल्यामुळें "गोरक्षण" हें "कृषिजीवनच" होय. त्याकरितां शेतीला चांगले बैल कसे मिळतील, उत्तम गुरांची पैदास, त्यांचें खतमूत, जोपासना, औषधोपचार, इत्यादिसंबंधी अर्वाचीन उपयुक्त शोधांचा फायदा शेतकऱ्यांस आपल्या स्थित्यनुरूप कसा घेतां येईल, तसेंच दूधदुभत्याचा पुरवठा कसा वाढेल, हल्लींच्या पांजरपोळ व गोरक्षणी संस्थास व्यावहारिक व उपयुक्त वळण कसें लावतां येईल, वगैरे महत्त्वांच्या विषयांची चर्चा या वर्तमानपत्रांत येत जाईल. पत्राचा आकार डेमी साईज असून अशा महर्गतेच्या दिवसांतहि त्याची वार्षिक वर्गणी ट. ह. व्ही. पी खर्चासह अवघी १॥।२ एक रुपया बारा आणे आहे. तरी वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं व जाहिरात देणारांनीं खालील पत्त्यावर त्वरित नांवें नोंदवावी.

२१७ बुधवार पेठ, पुणें सिटी. { डॉ. रामचंद्र भीमराव नाईक, चिटणीस श्री सनातन गोवर्धन महामंडळ.

---

## डॉ. रामचंद्र भीमराव नाईक कृत पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुपद्यरत्नावली (श्रीगणपतीस्तवन) | किं. | १ आणा. |
| २ | शांकरदिग्विजय पद्यावली .... | ,, | १ आणा. |
| ३ | मूर्तिपूजा करणें अवश्य होय .... | ,, | १ आणा. |
| ४ | केमिस्ट्रीचें पद्यात्मक पुस्तक .... | ,, | १ आणा. |
| ५ | श्रीशिवाजी उत्सव व त्यापासून बोध | ,, | २ आणे. |

हीं पुस्तकें "चिटणीस—श्री सनातन गोवर्धनमहामंडळ, बुधवार पेठ, पुणें," या पत्त्यावर विकत मिळतील.

श्री सनातन गोवर्धन महामंडळ—पुस्तकमाला

पुष्प २ रें.

# खरें गोरक्षण.

# COW-PROTECTION
## IN ITS REAL SENSE.

लेखक व प्रकाशक

डॉ. रामचंद्र भीमराव नाईक.

एम्. सी. पी. एस्., एल्. एम्. अँड एस् (नॅशनल)

ह. भ. प. अनंतदास रामदासी.

मार्गशीर्ष शके १८३९

किंमत १२ आणे

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

महात्मा मोहनदास करमचंद गांधी

यांस

त्यांची गोरक्षणाबद्दलची उत्कट आस्था व कळकळ,

त्याचप्रमाणें मातृभूमीविषयींचा त्यांचा अत्यंत

स्वार्थत्याग व अखंड कर्तव्यतत्परता इत्यादि

त्यांच्या अनेक सद्गुणांबद्दल

ग्रंथकर्त्यांनीं

सदर पुस्तक त्यांच्याच परवानगीनें सप्रेम

अर्पण केलें असे.

---

DEDICATED BY KIND PERMISSION TO

**MAHATMA M. K. GANDHI**

for his sincere devotion to the cause

of Cow-Protection, and also for

his invaluable services

to the Mother-Country

*BY*

THE AUTHOR.

# अनुक्रमणिका.


ह. भ. प. जोग महाराजांची प्रस्तावना. १

आभारप्रदर्शन. १

आमचें हृद्गत. १

खरें गोरक्षण. १

खऱ्या गोरक्षणाविषयीं महात्मा गांधीचे विचार. ३५

मुसलमानबंधूंसही गोरक्षणाची आवश्यकता. ३८

ख्रिस्तीबांधवांसहि गोरक्षणाची आवश्यकता. ४३

श्री चौंडे महाराज व गोरक्षण. ४६

गोरक्षणी संस्थांची माहिती. ६९

Our-selves. 1

Cow-Protection in its real sense. 4

Shri Chavande Maharaj and Cow-Protection. 32

Shri Sanatan Govardhan Mahamandal. 39



श्रीमंगलमूर्ति प्रसन्न.

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !

## त्रिजन्म-परीक्षण नाटक.

तासगांवचे श्रीमंत बाबासाहेब पटवर्धन यांनीं वरील पंचाकी नाटक लिहिलें असून लवकरच रंगभूमीवर येईल. मनुष्याच्या पूर्वजन्मींचें संस्कार व लोभद्वेषादि संबंध त्याच्या पुढील जन्मींहि उदयास येतात, हें तत्व या नाटकांत हृदयंगम रीतीनें दाखविलें आहे. पुस्तक एकवार अवश्य वाचण्याजोगें आहे. विद्वान लोकांचे उत्तम अभिप्राय. किंमत १८४. व्ही. पी. खर्च वेगळा. व्यापाऱ्यांस योग्य कमिशन. खालील पत्त्यावर मागणी करावी.

म्यानेजर नवीन किताबखाना, पुणें.

# गोवर्धनमाला.

गोरक्षणविषयाची चर्चा करणारें मराठी भाषेंत हें एकच मासिक पुस्तक आज पांच वर्षे सुरू आहे. ट. ह. सह. १॥ आणे.

व्यवस्थापक गोवर्धनमाला--कचेरी, वाई जि० सातारा.

---

# गोरक्षणविषयक पुस्तकें.

१ शुभलग्न पण सावधान ०२.

२ गोधन महती, २ गोरक्षणपर संतवचनें प्रत्येकीं ०१.

१ गोस्तवन, २ हंबरडे ३ संतांचे गोरक्षण ४ पंढरीचा सोहळा प्रत्येकीं ०३.

पत्ताः—चिटणीस—श्री. स. गोवर्धन महामंडळ २१७ बुधवार पुणें,

---

# गोरक्षणी कॅलेंडर

गोरक्षणाचें महत्व चित्तावर ठसून गोमातेची सेवा करण्याची आवड उत्पन्न व्हावी ह्मणून सुप्रसिद्ध राजा रविवर्म्याच्या गाईचे चित्रासह भपकेदार रंगांत सन १९१८ सालाकरितां छापवून तयार आहे. किंमत व पोस्टेज-करितां ०२ चीं तिकिटें पाठवावीं. घाऊक मागविणारांस कमिशन मिळेल.

का. दा. आष्टेकर,

मुख्य स्वयंसेवक गोरक्षण सं, पुणें.

# प्रस्तावना.

प्रत्येक इंग्लिश मनुष्याच्या घरांत हार्मोनियम जेव्हां मला दिसून येईल त्यावेळीं इंग्लंडची खरी भरभराट झाली असें मी समजेन, असें एका प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्यानें ह्मटलेलें मला आठवतें. घराची शोभा हार्मोनियमनें पूर्ण होते अशी इंग्लंडप्रभृति पाश्चात्य राष्ट्रांची समजूत. पौर्वात्यांच्या राष्ट्र-वैभवाच्या व गृहसौख्याच्या कल्पना अगदीं निराळ्या. ' यस्य गौस्तु गृहे नास्ति स्मशानसदृशं हि तत् ' अशी आमच्या पूर्वजांची समजूत. गाई-संबंधाची पारमार्थिक बुद्धि बाजूला ठेवली व केवळ व्यवहाराच्या दृष्टीनें विचार केला तरी कोणती कल्पना अधिक सरस आहे हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. हिंदी लोकांचा निर्वाह मुख्यत: शेतीवरच अवलंबून असल्यामुळें व शेतीच्या कामीं आम्ही घोड्यांचा उपयोग करीत नसल्यामुळें आमच्या देशांत गाईला सहज महत्व प्राप्त झालें आहे. व्यवहाराच्या दृष्टीनें गाईचा फार उपयोग होतो ह्मणून ह्मणा किंवा कसेंहि ह्मणा पौराणिक काला-पासून हिंदु लोक गाईला आपलें दैवत मानित आलें आहेत. पुढें पुढें हिंदुस्थानावर जे परधर्मी राजे झाले त्यांना गोवधासंबंधानें किंवा गोमांसभ-णासंबंधानें विधिनिषेध नसल्यामुळें राजसत्तेपासून सनातन वैदिक धर्माच्या रक्षणाची जशी जरूरी भासली, त्याचप्रमाणें गोरक्षणाचीहि अत्यंत जरूरी भासल्यामुळें हिंदू लोकांची गोमातेवरील श्रद्धा अधिक दृढतर झाली आहे. पारमार्थिक दृष्ट्या गाईला आम्ही अत्यंत पूज्य मानीत असल्यामुळें हिंदुस्था-नांतील २५ कोटी हिंदू लोकांच्या धर्मभावनेला मान देऊन हिंदुस्थानांतील गोवध अजीबात बंद झाला पाहिजे व पारमार्थिक दृष्टी सोडून दिली तरी केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या ह्मणजे गाईच्या जोपासनेवर अवलंबून असलेल्या देशाची सार्वत्रिक उन्नति होण्याकरितां सुद्धां गोरक्षणाची व गोसंवर्धनाची किती जरूरी आहे हें निराळे सांगावयास पाहिजे असें नाहीं. गोरक्षणाचें हें उभयविध महत्व ओळखून देशांत आज बरीच वर्षें गोरक्ष-णसंबंधाचे प्रयत्न चालू आहेत. पण या प्रयत्नांना यावें तसें यश आलेलें

नाहीं. तथापि इतक्या दिवसांच्या अनुभवामुळें ‘ खरें गोरक्षण ’ ह्मणजे काय हें मात्र या चळवळीच्या पुरस्कर्त्यांना चांगलें कळूं लागलें आहे. प्रस्तुत पुस्तकांत गोरक्षणासंबंधाच्या अनेकविध अंगांचा सोपपत्तिक विचार केला असून कोणते उपाय केले म्हणजे गोरक्षणाचें खरें यश पदरीं पडेल हें या पुस्तकावरून कळून येण्याजोगें आहे. शेतकऱ्याचें दारिद्य व अज्ञान याच दोन गोष्टी गोवधास मुख्यतः कारणीभूत आहेत. गोशाळांतून शेतकऱ्यांच्या गाई ठेवून घेऊन, कृषिविषयक पतपेढ्या काढून थोडक्या व्याजावर त्याला पैसे पुरवून गोरक्षणाचें महत्व, गोशाळांची माहिती शेतकऱ्यांना देऊन व पैशाच्या लोभानें आपल्या गाई कसाबाला विकण्यापासून त्याला परावृत्त करून गोरक्षणाचें कार्य कसें यशस्वी करतां येईल याचें विवेचन या पुस्तकांत केलें आहे. आमच्या इकडील गुजरमारवाडी अनेक पांजरपोळ व गोशाळा काढून गोरक्षणाचें कार्य करीत आहेत; वांद्यासारख्या ठिकाणी कसाब मागेल तेवढे पैसे देऊन त्याच्यापासून गाई सोडवण्याचा त्यांचा उद्योग चालूं असतो; पण आमच्या या श्रद्धाळू शेटसावकारांचा प्रयत्न गोरक्षणाच्या कार्याला विघातक असून वांद्यासारख्या ठिकाणीं गाई घेण्यापेक्षां ज्या गांवोगांवच्या बाजारांतून कसाब लोक गाई विकत घेतात त्या ठिकाणीं गाई सोडविण्याचा प्रयत्न होणें जरूरीचें आहे. या गोष्टीकडे आमच्याकडील उदार धनिकांचें लक्ष गेल्यास या लहानशा पुस्तकानें एक मोठेंच कार्य केल्यासारखें होईल. गोरक्षणासारखे देशहिताचे व्यापक प्रश्न सरकारनें योग्य ते कायदे करूनच सोडविले पाहिजेत; पण या गोष्टीकडे सरकारचें लक्ष जात नसेल किंवा जाणूनबुजून सरकार या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत असेल तर लोकांनीं खासगी प्रयत्नानें शक्य तितकें गोरक्षणाचें कार्य करित राहिलें पाहिजेच पण त्याबरोबरच सरकारचें या गोष्टीकडे लक्ष वेधण्याकरितां गोरक्षणासंबंधाची संघटनात्मक जोराची चळवळ देशांत सुरू होऊन हिंदुस्थानांतील गोवध कायद्यानें बंद होईपर्यंत ती थांबतां उपयोगी नाहीं. गोरक्षणाचें खरें महत्व समजून वरील प्रकारची चळवळ सुरू होण्यास अशा पुस्तकांचा फार उपयोग होईल.

विष्णु नरसिंह जोग.

# आभारप्रदर्शन.

सदर पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचे कामीं नागपूरची गोरक्षणी सभा व मुंबईची जीवदया ज्ञानप्रसारकमंडळी यांनीं आपलीं पुस्तकें पाठवून माहिती पुरविली, पुस्तक आपल्या नांवें अर्पण करण्यास महात्मा गांधी यांनीं परवानगी दिली. ह. भ. प. जोग महाराज यांनीं प्रस्तावना लिहून दिली, रा. विष्णु महादेव भट, रा. वीरकर वकील, व रा. रामकृष्ण वा. बर्वे यांनीं निरनिराळीं इंग्रजी भाषांतरें वेळेवर तपासून दिलीं, सांगलीचे सुप्रसिद्ध व्यापारी व तेथील पांजरपोळचे अध्यक्ष शेट गोकुळदास मानचंद यांनीं या पुस्तकाच्या ५०० प्रती घेतों म्हणून कळविलें, धारवाडचे सुप्रसिद्ध वकील व 'चंद्रोदय' पत्राचे संपादक रा. गदगेया होन्नापुरमठ आणि 'पूर्णानंद' ( बेळगांव ) मासिकाचे संपादक रा. ब. रा. सोहोनी या दोघांनीं ' खरें गोरक्षण ' पुस्तकाच्या जाहिराती आपापल्या पत्रांत फुकट छापून प्रसिद्ध केल्या, आणि ' चित्रशाळा ' छापखान्याच्या मालकांनीं वेळेवर पुस्तक छापून दिलें याबद्दल वरील सर्व सद्‌गृहस्थांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों.

उपयुक्ततेच्या व काटकसरीच्या तत्वास अनुसरून असलेल्या गोरक्षण कार्यास आपली पूर्ण सहानुभूति असून त्याबद्दल शक्य ती सर्व मदत मोठ्या आनंदानें करीन असें म्हटल्याबद्दल येथील कलेक्टर 'वेस्ट्रॉपसाहेब' यांचे व श्री. स. गो. महामंडळास उपयुक्त सल्ला देऊन त्यांच्या सल्लागार मंडळांत समाविष्ट झाल्याबद्दल तेथील शेतकी कॉलेजचे लोकप्रिय प्रिन्सिपाल डॉ. मॅनसाहेब यांचे आम्हीं मनःपूर्वक आभारी आहोंत.

छपाई घाईनें झाल्यामुळें कांहीं अशुद्धें राहिलीं असतील त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

श्रीगोमाताकी जय

# आमचें हृद्गत.

पुराणमित्येव न साधु सर्वम् ।
न चापिकाव्यं नवमित्यवद्यम् ॥—कालिदास.

१ हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत मुख्य उद्देश तीन आहेत. पैकीं पहिला उद्देश असा कीं, आपल्या देशांत अनेक ठिकाणीं गोरक्षणी व पांजरपोळ संस्था आहेत, गोरक्षणाविषयीं वेळोवेळीं लेखन-भाषणद्वारां जागृति होत आहे व बहुजनसमाजाचीहि या कार्यास सहानुभूति मिळत आहे ही कार्यकर्त्या पुरुषास मोठी उत्साहकारक गोष्ट आहे. तथापि गोरक्षणाचें मुख्य दृश्यफल म्हटलें म्हणजे मुबलक दूधदुभतें ( विशेषें करून लहान मुलांस ) मिळणें आणि शेतकामाला भरपूर बैलांचा पुरवठा होणें हें होय; पण सरकारी शेतकी खात्याचे अहवाल, मि. ह्यूम, प्रो० नाईट यांसारख्या तज्ज्ञ गृहस्थांचे अभिप्राय आणि ठिकठिकाणची प्रत्यक्ष पाहिलेली परिस्थिति ही पाहतां जिकडे तिकडे दुभत्या व शेतकामांच्या जनावरांचा बराच तुटवडा दिसून येत आहे. याकरितां शक्य तितका प्रयत्न करून प्रचलित गोरक्षण व्यवहारदृष्ट्या कसें उपयुक्त करतां येईल आणि असें करीत असतांना जुन्या धार्मिक पद्धतीस व इतर कोणत्याहि जातीस किंवा मतास विरोध न करितां दूधदुभतें ( Dairy farms ), चांगल्या जनावरांची पैदास (Cattle-breeding), खत, मेलेल्या जनावरांची चामडीं वगैरे बाबतींत गोरक्षणाचे आर्थिक व औद्योगिक फायदे कसे घेतां येतील याची मांडणी या पुस्तकांत करावयाची आहे. ही माहिती देतांना प्रसिद्ध गोभक्त श्री चैंडे महाराज यांनीं आज १२।१४ वर्षेपर्यंत अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक व निरपेक्षतेनें गोरक्षणाचें जें कार्य केलें आहे व ठिकठिकाणीं १५।१६ गोरक्षणी संस्थ

स्थापन करून या बाबतींत त्यांनीं जो अनुभव मिळविला आहे, त्याचाहि समावेश या पुस्तकांतील लेखांत केला आहे.

२ दुसरा उद्देशः—पहिल्या उद्देशांत दाखविल्याप्रमाणें गोरक्षणासंबंधीं सर्वांना उपयुक्त होतील असे जे विचार या पुस्तकांत दर्शविले आहेत, ते केवळ मातृभाषेंतून मांडल्यास त्याचा प्रसार फक्त महाराष्ट्रापुरताच होईल; पण आजचें युग जागृतीचें आहे आणि शिवाय प्रत्येक महत्त्वाच्या गोष्टीचा खल सर्व देशभर होत असतांना गोरक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयाचा विचार फक्त महाराष्ट्रापुरतांच करीत बसणें हें प्रागतिक तत्त्वाच्या विरुद्ध होणार आहे. असें न व्हावें म्हणून या पुस्तकांतील मुख्य लेख सर्व लोकांस कळतील अशा भाषेंत मांडले आहेत. देशांतील प्रमुख लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें आजच हिंदी ही आपली राष्ट्रभाषा झाली असती तर आह्मी मोठ्या अभिमानानें व आनंदानें त्याच भाषेमध्यें हें सबंध पुस्तक लिहिलें असतें; परंतु तो सुयोग येण्यास अद्याप कांहीं कालावधि असल्यामुळें राजमान्य असलेल्या इंग्रजी भाषेंतून प्रमुख लेखांचें भाषांतर दिलें आहे. सर्व लोकांना कळेल अशा भाषेंतून आपले विचार प्रगट केल्यानें अनेक फायदे आहेत. एक तर आपल्या विचारांचा सर्व देशभर प्रसार होतो; दुसरें, त्यांत असलेल्या ग्राह्यांशाचा इतर लोक स्वीकार करितात; कांहीं टीकात्मक प्रश्न उत्पन्न होण्याजोगा असल्यास त्याची सर्वत्र चर्चा होऊन सर्व लोकांस योग्य तो फायदा मिळतो. याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट ही कीं, याच वेळीं सुदैवें करून कलकत्ता येथें अखिल भारतर्षीय गोरक्षणी परिषदेचें अधिवेशन होणार असून देशांतील सर्व विद्वान व अनुभवी असे गोभक्त तेथें जमणार आहेत व सर्व जातींच्या लोकांस उपयुक्ततेच्या दृष्टीनें गोरक्षणाचा फायदा कसा घेतां येईल या महत्त्वाच्या प्रश्नाचाच मुख्यत्त्वेंकरून तेथें ऊहापोह व्हावयाचा आहे. अशा वेळीं आमचे विचार सर्वांना समजतील अशा भाषेंत ( इंग्रजींत ) मांडल्यास परस्परांच्या विचारविनिमयास सोईचें होईल.

श्री चौंडे महाराजांनीं पुणें येथें ‘ श्रीसनातन गोवर्धन महामंडळ ’ स्थापन केलें आहे त्याचा मुख्य उद्देश असा कीं, हिंदुस्थानांतील गोशाळा व

पांजरपोळ या संस्थांचें ध्येय शक्य तितकें वर सांगितलेल्या तत्त्वांस अनुसरून असावें, परस्परांत सहानुभूति व सहकार्य वाढावें, एकमेकांचा फायदा एकमेकांस व्हावा आणि पुढें मागें गोरक्षणाच्या कार्यांत सर्वांच्या सल्यानें जेव्हां जेव्हां कांहीं गोष्टी करण्याचे प्रसंग येतील, तेव्हां तेव्हां 'श्रीसनातनगोवर्धन महामंडळ' ही नांवाप्रमाणें मध्यवर्ती संस्था बनावी. हाही एक हेतु इंग्रजी लेख देण्यांत आहे.

३ तिसरा उद्देश—वरील दोन्ही उद्देश साधण्याकरितां तसेंच गोरक्षणाचें महत्त्व व उपयुक्तता यांचा जनतेमध्यें प्रसार करण्याकरितां 'कृषि गौरक्ष्यवाणिज्यम्' या भगवद्वचनाप्रमाणें शेती व व्यापार यांस अनुसरून उपयुक्ततेच्या दृष्टीनें गोरक्षणाचा फायदा सर्व लोकांस किती प्रकारें घेतां येईल, हिंदुस्थानच्या उन्नतीचें खरें मर्म शेतकामाच्या जनावरांच्या संरक्षणावर व धर्मावर कसें अवलंबून आहे, इत्यादि कृषिगोरक्षविषयक प्रश्नांची चर्चा करण्याकरितां आणि ठिकठिकाणच्या गोरक्षणी संस्थांची सविस्तर माहिती देण्याकरितां श्रीसनातनगोवर्धन महामंडळातर्फे 'गोरक्षण अथवा कृषिजीवन' या नांवाचें साप्ताहिक लवकरच सुरू करण्याची तजवीज होत आहे. त्याकरितां गोरक्षणाचे बाबतींत आमचे जे विचार आहेत ते सर्व लोकांस कळल्यास व सुदैवेंकरून त्यांना पटल्यास ज्यांची इच्छा आहे ते आमच्या साप्ताहिकास वर्गणीदार होऊन किंवा अन्य रूपानें मदत करूं शकतील. या पुस्तकांतील 'खरें गोरक्षण' व त्याचप्रमाणें इतरही लेख यांमधून आह्मीं आपल्या कल्पना सविस्तर मांडल्या आहेत; त्यांवरून आमच्या पत्राची दिशा सर्वांचे ध्यानीं येईल.

आजच्या परिस्थितीमध्यें एखादें नवीन वर्तमानपत्र सुरू करणें किती जबाबदारीचें आहे हें सर्वांस माहीतच आहे. तथापि या साप्ताहिकांत केवळ गोरक्षण व शेतीची सुधारणा याच विषयांची प्रामुख्यानें चर्चा व्हावयाची असल्यामुळें आणि सुदैवेंकरून आमचे जिल्हाधिपति व इलाखाधिपति यांची उपयुक्ततेच्या तत्त्वास धरून असलेल्या गोरक्षणास सहानुभूति असल्यामुळें आमचें काम सुलभ जाईल असा आम्हांस भरंवसा आहे. तथापि आमच्या कार्याची दिशा कोणती आहे हें सरकारापुढें मांडावयाचे

वेळीं या पुस्तकांतील लेखांचा आयताच उपयोग होणार असल्यामुळें हाही हेतु या पुस्तकाच्या प्रसिद्धीच्या योगानें साध्य होणार आहे. शेवटीं सर्व गोभक्तांस आगाऊच

## विनंति

अशी कीं, सदरहू कार्याचा व्यापकपणा व महत्त्व ओळखून आमच्या भावी साप्ताहिकास वर्गणीदार होऊन व इतर रूपानें शक्य ती सर्व मदत करावी आणि **खऱ्या गोरक्षणाचा प्रसार** करण्याचें श्रेय संपादून गोमातेचा मंगल आशिर्वाद घ्यावा हेंच आमचें हृद्गत आहे. हें हृद्गत गोभक्तांखेरीज इतर कोणापुढें आम्ही सांगावें ?

---


# THE CHANDRODAYA

## A KANARESE WEEKLY

Published on every *MONDAY* at *DHARWAR*, contains leaders and leaderlettes on Political, Social, industrial and educational current topics. It contains local news aud general news of all parts of the country and also detailed war nws: size:—Royal RATES OF Subscripion to local Subscribers Re. 1—8—0 and to Moffusil subscribers Rs. 2—6—0 inclusive of postal and v. p. charges.

G. H. Honnapurmath

*Editor and Propritor, "Chandrodaya"*

*DHARWAR.*

पृष्ठें ७०० मजबूत कापडी बांधणी. ] गीर्वाणलघुकोश अथवा [ किंमत ४ रुपये. ट. ख. सहा आणे.

## संस्कृत–मराठी कोश

संस्कृत भाषा मराठींतून शिकणारांची मोठी अडचण ह्या कोशानें कायमची दूर केली आहे. एवढा मोठा सर्वांगसुंदर संस्कृत मराठी कोश आज एकही उपलभ्य नाहीं, व याची किंमतही सामान्य ग्राहकांच्या आटोक्यांत असावी अशीच ठेविली आहे. उपनिषदें, मनुस्मृति, रामायण, महाभारत, भागवत, रघुवंशादि काव्यें, नाटकें इत्यादि ग्रंथांतील शब्द यांत दिले आहेत. मराठी संस्कृतशब्दप्रचुर ग्रंथ वांचतांना याचा फारच उपयोग होईल.

**मुलांचा महाराष्ट्र**—मराठ्यांच्या मर्दुमकीचें हृदयंगम व स्फूर्तिदायक चरित्र. पृष्ठें ४०० किं. १ रु. **बीजगणित**—आवृत्ति २ री, किं. १॥ रु. यांत म्याट्रिक, स्कूल फायनल व मराठी ट्रेनिंग कॉलेजें यांना लागणारा बीजगणिताचा सर्व भाग आहे. **शाळांत चालविण्यास मंजूर झालें.**

**काव्हूर ऊर्फ इटलीचा रामदास**—मनोरंजक चरित्र, किं. १२ आणे.

**संस्कृत-प्रवेश**—तिसरी आवृत्ति सुधारून वाढविलेली, किं. १ रु.

**प्रथमगुच्छ**–संस्कृत वेंचे, मराठी स्पष्टीकरण, (छापत आहे) किं. १ रु.

**इंग्रजीप्रवेश**—[ शिक्षकाकरितां ]—संभाषणपद्धति किं. ८ आणे.

वि० सू०—आमचीं सर्व पुस्तकें एकदम घेतल्यास ट. ख. माफ.

ज. वि. ओक, संपादक लोकशिक्षण, ३९५, सदाशिव पेठ पुणें.

---

स्त्रियांस अति उपयुक्त ] **भगिनी समाचार** [ मासिक पुस्तक.

वार्षिक वर्गणी ट. ख. सह १। रु.

संपादक—**कृष्णाजी रघुनाथ खिस्ती**, आप्पाबळवंत पेठ पुणें.

# तीन कृष्ण कृत्यें !

१ **वसंतरावाचें कृष्ण कृत्य !**–मनुष्यानें उच्च शिक्षण संपादन केलें असून जर उच्च प्रकारची नीति नसेल तर त्यांचे हातून कशीं भयंकर कृत्यें घडतात व त्यांचा कुशल गुप्त पोलिसाकडून कसा अचूक शोध लागतो ह्याचे **चित्तवेधक** शब्दचित्र ह्यांत रेखाटलें आहे.

२ **मालतीचें कृष्णकृत्य ! !**–अंध प्रेमाच्या भरांत स्त्रिया देखील कशा धाडसाचीं कृत्यें करूस आपल्या सौख्याची कशी हानि करून घेतात, ह्यांचे **करुणाजनक** व फारच **बहारीचें वर्णन** ह्यांत दिसेल.

३ **नीलमाधवाचें कृष्ण कृत्य ! ! !**––यांत कनक–कांतेच्या लोभानें मनुष्य कसा बेफाम होऊन दुसऱ्याच्या व स्वतःच्या जीविताचा कसा नाश करितात ह्यांचें दिव्य व हृदयविदारक चित्र या कथानकांत **उत्कट रीतीनें** उठविलें आहे किंमत १२ आणे व्ही. पी.नें १४ आणे.

**पाश्चात्य युद्धांतील वीरांच्या अद्‌भूतपूर्ण व चटकदार अशा निवडक**

# अघोर कर्म कथा !

मूर्तिमंत **देशाभिमानी** व खरा **स्वार्थत्याग** जागृत करून **क्षात्रतेजाची** ओळख पटवून हृदयाला पाझर फोडणाऱ्या विलक्षण कथा जर कोठें असतील तर त्या ह्याच पुस्तकांत आहेत आणि त्या सुद्धां कल्पित नव्हेत तर **ऐतिहासिक**, आपल्या पोटच्या गोळ्यांचे **स्वहस्तें** परिमार्जन करून समरांगणावर जाणाऱ्या व हातांत शस्त्र घेऊन आपल्या **कुटुंबाचा मारेकरी** बनणाऱ्या **देशभक्त वीरांचे अश्रुतपूर्व** प्रसंग ह्यांतच पहावयास मिळतील ! तसेंच हल्लीच्या महायुद्धांतील सर्वांना थक्क करून सोडणारे व घटोत्कचाच्या मायेची आठवण करून देणारे **समरचमत्कार** यांतच आढळतील. किं. १२ आणे, व्ही. पी. नें १४ आणे, जरूर मागवा.

प्रो. **ज्ञानमित्र** शनवार, पेठ पुणें सिटी.

# ब्रह्मविद्या प्रबोधरत्न.

भाग १-५ रा. अ. पृष्ठें १००० , किं. रुपये ५. ट. ख. ०८ आणे.

हा ग्रंथ ओंवीबद्ध न करितां चालू मराठी भाषेत लिहिला असल्यामुळें तो सहज समजण्यासारखा आहे. विद्वानांचे उत्तम अभिप्राय,

बक्षिस--ओंवीबद्ध मुकुंदरायकृत परमामृत. किं. ०४ आ. ट, ख. ०१

सोलापूर
माटे वकील यांचा वाडा } रामचंद्र गणेश माटे.

---

# श्रीगदाधर प्रासादिक मंडळी.

## देवघाट. घ. नं. ८१ श्री क्षेत्र गया.

## स्फटिक माळांची मोठी एजन्सी.

स्फटिकाच्या १०९ दाण्याच्या माळेस १ रुपयापासून पुढें किंमत पडेल. उत्तम पाणीदार कंठ्याचे मोठे दाणे प्रत्येकीं ०८ आणेपासून २॥ रु. पर्यंत. खालीं लिहिलेला माल ३ रु. कमीशन घेऊन पाठविला जाईल. गयेंतील प्रसिद्ध काळ्या दगडाचा माल, वाट्या, खलबत्ते, तऱ्हेतऱ्हेचीं खेळणीं व कपबश्या व " टसरचे साफे सोळी, " तशीच फार उत्तमोत्तम सुगन्धी " गुडाखू." खुलाशाकरितां रिप्लायकार्ड आल्यावर उत्तर पाठवूं. चतुर्थांश रकम आल्याशिवाय माल पाठविला जाणार नाहीं, आमचेकडे यात्रेकरूंची उत्तम सोय केली जाते.

गयावळांचा बिलकुल त्रास होणार नाहीं सर्व कृत्य यथाशक्ति यथासांग करून दिलें जाईल, मात्र खालील पत्त्यावर निघण्याचें पूर्वींच पत्रव्यवहार केल्यानें काशी; प्रयाग, गया; तिन्ही ठिकाणची व्यवस्था करून देऊं; परंतु बरोबर पंडेलोकांचा मनुष्य घेऊं नये; येणारांनीं आगाऊ नक्की दिवस तारेनें अगर पत्रद्वारे कळविल्यास स्टेशनवरही व्यवस्था केली जाईल,

व्यवस्थापक--विष्णू कृष्ण आचनल; मॅनेजर;
राजाराम सीताराम पेंढारकर;

श्रीगोमाता विजयते

# खरें गोरक्षण.



**यया सर्वमिदं व्याप्तं जगत्स्थावरजंगमम् ।**
**तां धेनुं शिरसा वंदे भूतभव्यस्य मातरम् ॥**

—श्रीमन्महाभारत.

जिनें हें चराचर जग व्यापिलें आहे, आणि जी भूत व भविष्यकाळाची माता आहे त्या गाईला मी नमस्कार करितों.

गाय ही सर्व जगाला अनेक प्रकारें व्यापक आहे. ज्या ज्या वेळीं जरूर पडते त्या वेळीं पृथ्वी ही गाईचेंच रूप धारण करिते; म्हणून गाय हें पृथ्वीचें सगुण रूप आहे. अर्थात् आपल्या मूळस्वरूपानें म्हणजे पृथ्वी-रूपानें ती सगळ्या जगाचा आधार आहे. पाऊसपाणी पडेल तर जगांत आबादानी होऊन सर्व प्राण्यांचें व वृक्षवेली इ० वनस्पतींचें पोषण होईल. पाऊस यज्ञामुळें पडतो हें ' यज्ञाद्भवति पर्जन्यः ' या गीतावचनावरून सिद्ध आहे; सर्व यज्ञीय हविर्द्रव्यें गाईपासूनच मिळतात. लहान अर्भकाचें

पोषण तिच्या दुधामुळें होतें. इतर सर्व जगाचें भरणपोषण बैलाच्या–तिच्या मुलाच्या–श्रमांमुळें अन्नवस्त्राच्या योगानें होतें. तिचें खतमूत धान्याला जीवनाधार आहे. येणंप्रमाणें ती सर्व जगाचा जीवनाधार पूर्वी होती, हल्लीं आहे, व पुढें हि असणार च. म्हणून तिची प्रत्येकानें नमस्कारपूर्वक पूजा करावी असें शास्त्रांत म्हटलें आहे. श्रीमद्भागवतांत

**गाईचें धार्मिक महत्त्व**

सूर्योऽग्निर्ब्राह्मणो गावो वैष्णवः खं मरुज्जलम् ।
भूरात्मा सर्वभूतानि भद्रपूजापदानि मे ॥

या श्लोकांत जीं अकरा पूजास्थानें सांगितलीं आहेत, त्यांत गाईला हि प्रमुख स्थान दिलें आहे. याप्रमाणें गाईची सेवा केल्यानें, गोप्रदान दिल्यानें परलोकाची प्राप्ति होते, ही आर्यांची धार्मिक दृष्टि बाजूस ठेविली तरी तिची ऐहिक उपयुक्तता कोणास हि नाकबूल करतां येणार नाहीं.

वरील प्रकारें ज्या वेळीं गाईला अतिशय पूज्य मानीत असत त्या पौराणिक व ऐतिहासिक कालांमध्यें देखील गाईवर संकटें येत नव्हतीं असें नाहीं. तिला प्रसंगीं मोटमोठ्या आपत्ति सहन कराव्या लागत असत; पण त्या कालीं सनातनधर्मीयांची धर्मनिष्ठा विशेष जागृत असल्यामुळें तिच्या आपत्तींचा प्रतिकार करण्यास ते सदैव तत्पर असत. धार्मिक दृष्ट्या गाईचें महत्त्व कोणी मानो किंवा न मानो; परंतु प्राचीन दूरदर्शी महर्षींनीं तिला जागोजाग धार्मिक दृष्ट्या पूज्यत्व दिल्यामुळें च तिचें महत्त्व आज इतकें तरी टिकून राहिलें आहे. ज्यांनीं आपल्या अनुभवानें व ज्ञानानें पुढें घडणाऱ्या अनेक गोष्टी पूर्वींच सिद्ध करून ठेविल्या आहेत, त्या महर्षींनीं गाईची थोरवी धर्मग्रंथांतून विनाकारण गायिली नसती. कोणत्या हि धर्मांत पाहिलें तरी असें आढळून येतें कीं, एखादी गोष्ट धर्मदृष्ट्या महत्वाची ठरलेली असली कीं, मनुष्य स्वाभाविक च तिला श्रद्धापूर्वक मानतो. याच तत्वास अनुसरून धर्मग्रंथांमधून पूर्वीच्या महात्म्यांनीं गाईचें श्रेष्ठत्व वर्णन करून

**गाईवरील सांप्रतच्या आपत्तींचा विशेष**

ठेविल्यामुळें हल्लींच्या धर्मग्लानीच्या काळीं देखील तिला थोडें तरी महत्व मिळत आहे ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. परंतु सांप्रत पाश्चात्य संसर्गानें असो किंवा इतर कांहीं कारणांमुळें असो देवाधर्मावरची श्रद्धा दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. जेथें देवालाच देव म्हणण्याची मारामार तेथें गाईला देव मानून तिची पूजा तरी कोण करितो ? आणि यामुळें गाईच्या जोपासनेविषयीं जिकडे तिकडे औदासीन्य दिसून येऊन तिची सर्वत्र अनास्था चालली आहे. देवपूजा सांगणारे ब्राह्मण देवाची व आपली पूजा करून घेतांना गाईची आठवण ठेवीत नाहींत. कित्येक तर गोप्रदानार्थ आलेल्या गाई खुशाल वधिकांस देऊन टाकतात ! वेदांताच्या शाब्दिक चर्चेमुळें धर्मोपदेशकांना गाईबद्दल चार शब्द सांगण्यास सवड सांपडत नाहीं. राजेरजवाड्यांच्या येथील हजारों गाईचीं खिल्लारें तर केव्हांच नामशेष होऊन गेलीं. वैश्यवर्गांत गोरक्षणाची थोडी बहुत जागृति दिसून येत आहे. पण त्यांतहि 'मतामतांचा गलबला' आड येऊन त्या जागृतीला यावें तसें उपयुक्त स्वरूप येत नाहीं. " कित्येक व्यापारी गोरक्षणाच्या नांवावर लोकांकडून धर्मादाय पैसा घेऊन तो गोरक्षणाकडे न देतां इतर धर्मकार्याकडे लावितात. *" ज्यांच्या घरीं गाई आहेत ते आपल्या गाईंना बैलापुढचा गळांठा आणि उष्ट्याखरकट्याचें घाणेरडें पाणी यावर गुजारा करावयाला लावतात. अशा प्रकारें गाईच्या अभिमान्यांचें तिच्या विषयींचें औदासिन्य व इतर बाह्य आपत्ति यांमुळें सांप्रतच्या आपत्कालाचें स्वरूप पौराणिक व ऐतिहासिक कालापेक्षां विशेष उग्र आहे.

**शेतकऱ्यांचें दारिद्र्य व अज्ञान यांमुळें होणारा गुरांचा नाश**

या उग्रतेंत शेतकऱ्यांचें—ज्यांच्या हातांत आज गाई बैल आहेत त्यांचें—दारिद्र्य व अज्ञान यांची भर पडल्यानें हल्लींची आपत्ति विशेषच भयंकर स्वरूपाची झाली आहे. शेतकऱ्यांचें दारिद्र्य तर महाशूरच आहे; त्यांच्यांत शिक्षितांचें प्रमाण किती अल्प आहे हेंहि सर्वांस ठाऊक आहे. अशा दारिद्र्यग्रस्त व अज्ञानपंकांत

* नागपूर गोरक्षणी सभेचा ४ था वार्षिक रिपोर्ट पान १३,१४

रुतलेल्या शेतकऱ्यांचे हातीं गाईबैलांची जोपासना सर्वस्वीं राहिल्यामुळें आपल्या अडचणी भागविण्याकरितां आपलीं जनावरें ते शेंकड्यावारीं वधिकांकडे देत आहेत. त्यांना परिस्थित्यनुरूप जी वस्तु निष्कारण खर्चाची वाटते तीं ते प्रथम विकायला काढतात. जमीन व घरदार प्रथमच विकलें जात नाहीं. कारण त्यावर कुटुंबपोषण अवलंबून असतें; डागडागिना एखादा कदाचित् असला तर तोही प्रथमतः विक्रीस येत नाहीं; कारण त्याचा रोजचा खर्च अंगावर नसतो. शेतीच्या उपयोगाचे बैल ही सहसा विकले जात नाहींत आणि क्वचित् प्रसंगीं बैल बाजारांत आले तरी त्यांच्या भारी किंमतीमुळें वधिक लोकांस ते परवडत नाहींत. राहतां राहिली गाय, लहान वासरें व होतकरू खोंड; यांची विक्री मात्र शेतकरी लोक पहिल्या तडाख्यास करितात. गाय दूध देईनाशी झाली किंवा कमी दूध देऊं लागली म्हणजे ती विकायला काढतात. त्याचप्रमाणें वासरांचा किंवा खोंडांचा खर्च चारपांच वर्षें अंगावर सोसावा लागत असल्यामुळें व तो खर्च सोसण्याची शेतकऱ्याला ताकद नसल्यामुळें तीं वासरेंहि विकलीं जातात. अशा प्रकारें जिच्यापासून शेतकीचे आधारस्तंभ असे बैल पैदा व्हावयाचे ती गायच नाहींशी होते, मग बैल कोठून मिळणार? परंतु शेतकऱ्यांच्या कांहीं हें ध्यानीं येत नाहीं. कित्येक तर इतके अंधारांत आहेत कीं, कसाब लोक इतक्या गाई कां घेतात हेंहि त्या बिचाऱ्यांना ठाऊक नसतें! त्यांना वाटतें, आम्ही जसें कसाबांना गाई विकतों तसें कसाबहि उलट दुसऱ्या कोणास विकत देत असतील!! सारांश, दारिद्र्यामुळें व अज्ञानामुळें शेतकरी लोक आपली गाई वासरें भराभर विकीत आहेत आणि बाजारांत त्यांना कसाबांशिवाय दुसरें कोणी गिऱ्हाईक फारसें मिळत नसल्यामुळें बैलांचा तुटवडा पडून शेताची मेहनत कमी झाली व त्या मानानें शेतकींत फायदा राहीनासा झाला. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, हजारों शेतकरी आपलीं गुरेंढोरें विकून व घरेंदारें सोडून गिरण्यांतून व रेलवेंतून मोलमजूरीवर आपला गुजारा करीत आहेत!!!

येणेंप्रमाणें शेतकऱ्यांची दशा आहे; यांच्यापेक्षां गवळी लोक थोडे खाऊन पिऊन सुखी असतात; पण त्यांची दानत हल्लीं इतकी

**गवळ्यांचें क्रौर्य.** बिघडली आहे कीं त्यांचें क्रौर्य पाहून कसाब देखील लाजतील ! मुंबई येथील म्युनिसिपल ॲनालिस्ट डॉ. एल्. एल्. जोशी यांनीं सन १९१५ सालीं मुंबईस एक व्याख्यान दिलें; त्यांत ते ह्मणतात कीं "मुंबईतील गवळी आपलीं गुरें दुभतीं असेपर्यंत बाळगतात आणि दूध देईनाशी झालीं ह्मणजे कसायांना देतात. यामुळे लोकांची फार मोठी हानि होत आहे. कोणत्याहि पाश्चात्य देशापेक्षां मुंबई शहरांत दूध महाग आहे!" जी स्थिति मुंबईची तीच कलकत्त्याची; तिकडचे गवळी लोक दूध जास्त मिळण्याच्या आशेनें गाय वितांच वासरूं कसाबाला देऊन टाकतात! मुंबइच्याहि कित्येक दावणींतून गाईह्मशींचीं वासरें मुळींच दृष्टी पडत नाहींत. प्रसिद्ध गोभक्त कृष्णाजी आबाजी गुरुजी यांनीं आपल्या 'गोरक्षण कसें करावें' या पुस्तकांत कलकत्याच्या गवळ्यांच्या क्रूरतेचें थोडेंसें दिग्दर्शन केलें आहे; ते ह्मणतात "कलकत्ता येथील दुधांत बहुतकरून खारटपणा अधिक असतो, याचे कारणाची चौकशी करितां असें समजलें कीं, तेथील गवळी लोक दूध जास्त निघावें म्हणून धार काढण्यापूर्वीं अर्धा तास मिठाचें पाणी तयार करून तें जनावराच्या जननेंद्रियांत पिचकारीनें अथवा तसेंच ओतून नंतर फुंकणीनें फुंकतात. ज्यावेळीं हा भयंकर प्रकार करितात त्या वेळीं तीं जनावरें थयथय नाचून हंबरडा फोडतात व बेशुद्ध होऊन खालीं पडतात!! नंतर अर्ध्या तासानें पाणी पाजऊन त्यास थंड करितात व धार काढितात." या राक्षसी कृत्यास 'फुंकर' असें नांव आहे. वासरास दूध पाजावें लागल्यास तेवढेंच आपल्या मिळकतींत कमी पडेल म्हणून गाय वितांच त्या वासरास कसाबाकडे पोंचवावयाचें अगर उन्हांत उपाशी ठेऊन मारावयाचें आणि वासरावांचून गाय दूध देणार नाहीं ह्मणून या सैतानी फुंकराची योजना करावयाची, ही कल्पना ज्या नरपिशाच्चानें काढली असेल त्याला नमस्कार असो ! हिंदुस्थानांत—अहिंसा, भूतदया, परोपकार इत्यादिकांची केवळ मूर्तिच म्हणून गाजलेल्या हिंदुस्थानांत मुक्या प्राण्यांवर असले अमानुष क्रौर्याचे प्रसंग मोठमोठ्या शहरांतून दिवसाढवळ्या यावेत आणि त्याचा योग्य तो प्रतिकार अद्याप होऊं नये यापरता आणखी आपत्काल म्हणतात तो कोणता? गवळ्यांच्या ह्या

आसुरी द्रव्यलालसेला दरसाल जे निरपराधी मुके प्राणी बळी पडत आहेत व त्यामुळें देशाचें जें भयंकर नुकसान होत आहे त्याकडे सरकार अथवा पुढारी लोक यांपैकीं कोणाचें लक्ष जाईल काय ?

**सामान्य जगतेचें औदासिन्य.**

'यस्य गौस्तु गृहे नास्ति स्मशानसदृशंहि तत्' ज्या घरीं गाय नाहीं तें स्मशानवत् समजावें अशी पूर्वीची जुनी पुराणी समजूत; पण त्या समजुतीमुळें प्रत्येक घरीं सहज तीन चार तरी गाई असत. हल्लीं जुन्या समजुती सर्व भ्रामक वाटूं लागल्यामुळें आतां कोणीच घरीं गाय पाळीनासें झालें आहे. गाडी घोडे ठेवतील, चार कुत्रीं बाळगतील, दरमहा दहा पंधरा रुपयांचा दुधाचा रतीबहि लावतील; पण येवढ्या खर्चांत एखादी गाय कांहीं पाळणार नाहींत. या औदासिन्याचा परिणाम असा झाला आहे कीं, दुभतीं जनावरें गरिबांच्या हातीं राहून त्यांच्या हातून तीं कसाबाकडे जात आहेत. पन्नास साठ वर्षांपूर्वी जेथें रुपायाला पांच शेर तूप व दीडमण दूध मिळावयाचें तेथें आतां गाईचें दूध औषधाला मिळण्याची मारामार पडूं लागली आहे !

**इतर आपत्ति**

या सार्वत्रिक औदासिन्यामुळें गाईची—जिच्या पोटीं शेतकामाचे मोठमोठ्या किंमतीचे बैल उत्पन्न व्हावयाचें तिची—निगा नीट राहीनाशी झाली. दुभतीं गुरें नुसत्या वैरणीवर कधींहि पुष्ट रहात नाहींत. दूध तूप हा जसा मनुष्यांचा खुराक तसा पेंड, दाणा, सरकी वगैरे हा गुरांचा खुराक, पण गाय विऊन महिना दोन महिने होईपर्यंत तिचा काय थोडाबहुत धान्याचा कोंडा वगैरे मिळत असेल तेवढेंच. एरव्हीं तिच्या वांट्याला रानांतील पालापाचोळा व गोठ्यांतील गळाठा असतो. या खुराकानें तिच्या अंगांत ताकद राहून जगाला तिनें उत्तम दूध व खोंड कसे द्यावे ? याप्रमाणें घरची स्थिति; आणि बाहेर चरावयास जावें तर चराऊ रानांचा अभाव; यामुळें 'घरीं आई जेऊं घालीना व बाहेर बाप भीक मागूं देईना' अशा कात्रींत जनावरें सांपडलीं आहेत. त्यांतच एखादी दुष्काळाची फेरी आली किंवा एखाद्या रोगाची सांथ उद्भवली तर त्या वेळीं लक्षावधि गुरें पटापट

मरावीं यांत नवल तें काय ? एकेका जिल्ह्यांत लाखलाख गुरें या भयंकर उत्पाताला बळीं पडलीं ! कित्येक ठिकाणीं दुष्काळाचे सालीं शेतकरी लोक दोनदोन पैशाला आपलीं गाई बैल विकीत होते ! ! *आणि कोणी तर त्यांच्या गळयांत चिठ्या बांधून ज्यांना शक्ति असेल त्यांनीं पोसावें म्हणून सोडून देत होते !!! एवंच या आपत्तीमुळें शेतकीच्या जनावरांचा एकसारखा ऱ्हास होत चालला असून त्यामुळें देशाच्या संपत्तीस व आरोग्यास जबरदस्त ओहोटी लागली आहे.

गुरांवरील सांप्रतच्या उग्रतर आपत्तींचें स्वरूप येणेंप्रमाणें आहे. ही आपत्ति दूर करण्यास कांहींच उपाय योजले गेले नाहींत असें नाहीं. ज्या ज्या गांवीं गुजराथी, मारवाडी, भाट्ये, जैन, कोमटी वगैरे व्यापारीवर्ग आहे त्या त्या ठिकाणीं बहुशः पांजरपोळ, गोशाळा, गोरक्षकसभा

**आपत्ति निवारणार्थ सांप्रत योजिलेले उपाय**

**१ गोरक्षणी संस्था.**

किंवा हिंसानिवारकमंडळ अशी एखादी संस्था असतेच असते. यांपैकीं गोशाळा किंवा पांजरपोळ नांवाच्या ज्या संस्था आहेत त्यांच्या कार्याची माहिती व्यापारी व कांहीं सुशिक्षित मंडळी यांखेरीज इतरांस नसते. या संस्थांच्या फंडांच्या मानानें शेंदोनशें अगर हजारपांचशें जनावरें त्यांचेजवळ झालीं कीं पुढें त्यांचें कार्य खुंटत जातें. या जमलेल्या जीवांच्या जोपासनेंतच त्यांचें सर्व आयुष्य व द्रव्य खर्च होतें. वधिकांच्या हातीं जाणारीं नवीं गुरें सोडविण्यास किंवा बाजारांत येणारा गुरांचा प्रवाह बंद करण्यास कित्येकांस द्रव्याच्या अगर मनुष्यबलाच्या अभावामुळें सवड नसते व कांहींना थोडीफार सवड असली तर इच्छा नसते. मिळून तात्पर्य एकच; या संस्थांत जनावर दाखल करण्यास प्रवेश फी द्यावी लागते. जो शेतकरी चारदोन रुपयांच्या अडचणीस्तव आपलें गुरूं वाटेल त्यास विकण्यास तयार होण्याइतका दरिद्री असतो तो प्रवेश फी भरून आपलें जनावर पांजरपोळांत दाखल करील, हें संभवनीय नाहीं. बरें, त्या प्रवेश फीमध्यें त्या जनावराचें जन्माचें पोषण

---

* गंजम जिल्ह्याचा सरकारी रिपोर्ट सन १८९१

होतें असेंहि नाहीं. मग गरीब शेतकऱ्यांचीं गुरें पांजरपोळांत दाखल होण्याचे मार्गांत ही नसती आडकाठी कां ठेवावी ? तसेंच बैलाच्या किंमती हल्लीं तिप्पट चौपट वाढल्यामुळें एक बैल घेण्याकरितां शेतकऱ्याला आपलीं गाईवासरें किंवा दुसरें कांहींतरी विकण्याचा प्रसंग येतो. आणि इकडे या संस्थांमधून किती तरी बैल शिल्लक असतात. शेतकऱ्यांचें व या संस्थांचें सहकारित्व नसल्यामुळें अशी विपरीत स्थिति प्राप्त होते. वधिकांच्या हातीं जाणारा गाईबैलांचा प्रवाह आंतून तसाच निर्वेधपणें चालू असतो आणि हे लोक पांजरपोळ किंवा गोशाळारूपीं मलमपट्या वरून लावीत असतात. पोटांत रोग आणि शेंडीला औषध अशांतला हा प्रकार होतो.

**२ व्यापाऱ्यांचा दानधर्म.**

कित्येक श्रीमंत लोक दानधर्म करण्याकरितां मोठमोठ्या रकमा खर्चीं घालितात, त्यांपैकीं कांहीं द्रव्य जीवदयेच्या दृष्टीनें ते कसाईखान्यांतून गुरें सोडविण्याकडे लावितात. परंतु जें द्रव्य जीवरक्षणाकरितां म्हणून खर्चीं पडतें त्याच द्रव्याच्या योगानें सुटलेल्या जीवांच्या चौपट जीवांचे गळे आपल्या दावणीला गुंतविण्याकरितां कसाबांना अनायासें भांडवल मिळतें व त्यांचा तो एक किफायतशीर धंदाच होऊन बसतो, हें या धर्मभोळ्यांच्या गांवींही नसतें. शेतकऱ्यांच्या हातून कसाबांकडे व कसाबांकडून मक्तेदाराकडे अशा रीतीनें जात जात जनावरें प्रत्यक्ष मृत्यूच्या दरबारांत येऊन ठेपलीं म्हणजे मग या व्यापारीवर्गाला दयेची उकळी फुटते आणि तीहि वर्षांतून एकदां किंवा दोनदां ! जें जनावर शेतकऱ्यांजवळून घेतलें असतां पांचदहा रुपयांत मिळून गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबाला मदत व्हावयाची त्याजबद्दल कसाबांस तीस तीस चाळीस चाळीस रुपये भरून त्यांच्या हिंसेच्या धंद्याला उत्तेजन देण्यांत फायदा तो कोणता ? गुरांवरील आपत्ति दूर व्हावी म्हणून हे लोक प्रयत्न करावयास जातात; पण त्या प्रयत्नांस दूरदर्शी विचारांचा पाठिंबा नसल्यानें गोरक्षणास्तव होणारे प्रयत्न गोवधाचे वृद्धीस मात्र कारणीभूत होतात.

कित्येक संस्था गोरक्षण, अहिंसा, भूतदया इ० विषयावर वाङ्मय

**३वाङ्मयप्रसारक संस्था.** प्रसिद्ध करून ते वाचकांस मोफत किंवा अल्प किंमतींत देण्यांतच आपलें इतिकर्तव्य मानतात; पण '**बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते। पिपासितैः काव्यरसो न पीयते**' या कव्युक्तीप्रमाणें सर्व बाजूंनीं संकटग्रस्त झालेल्या व नित्य अर्धपोटीं मरणाऱ्या शेतकऱ्याला त्या पुस्तकी ज्ञानाचा उपयोग काय? या वाङ्मयाचा प्रसार करूं नये असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. पुस्तकावांचून निरनिराळ्या अर्वाचीन उपयुक्त शोधांचा देशभर प्रसार होणार नाहीं ही गोष्ट खरी आहे, तथापि त्याबरोबरच आजच्या स्थितीला विशेष जरूरीची गोष्ट कोणती हेंही पाहिलें पाहिजे. वेदान्तविचारानें परलोकगति सुकर होते म्हणून सन्निपात झालेल्या मनुष्याला एखादा जर पंचदशी वाचून दाखवूं लागला तर तें करणें हास्यास्पद होईल; त्या समयीं वैद्याची हेमगर्भ मात्राच दिली पाहिजे. त्याप्रमाणें दारिद्र्यानें गांजलेल्या शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याऐवजीं त्यांच्या दारांत हीं पुस्तकें टाकणें निरुपयोगी ठरत आहे. या पुस्तकांच्यापायीं खर्च होणारें द्रव्य गरीब लोकांत वाटलें गेले किंवा त्यांस हलक्या व्याजानें कर्जाऊ मिळालें तर किती तरी दीन कुटुंबें व मुकीं जनावरें अकालीं मृत्यूपासून वांचतील!

**४ इतर संस्था.** त्याचप्रमाणें ठिकठिकाणच्या जिल्हासभा व प्रांतिकसभा यांतून चराऊ रानें खुलीं व्हावीं, शेतसारा कमी व्हावा वगैरे अर्थाचे ठराव मंजूर होत असतात; पण अलीकडे कांहीं ठरावांच्या सिद्ध्यर्थ वर्षभरपर्यंत जसे सतत प्रयत्न होतात, तसे या बिचाऱ्या शेतकऱ्यांची व मुक्या जनावरांची स्थिति सुधारण्याचे बाबतींत कोणी प्रयत्न केल्याचें अद्याप फारसें ऐकिवांत नाहीं. नाहीं म्हणावयास मुंबईच्या म्युन्सिपल रिफॉर्म असोसिएशननें ना. गव्हर्नरसाहेबांची मुलाखत मागून दुभत्या जनावरांच्या निष्प्रतिबंध व सरसहा होत असलेल्या वधाचे दुष्परिणाम सर्व देशांत जाणवत असल्यामुळें व तो प्रश्न राष्ट्रीय महत्त्वाचा असल्यामुळें त्याची दाद लावण्याची तजवीज करून या आपत्तीचा प्रतिकार व्हावा अशी त्या संस्थेनें मागणी केल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. याबद्दल आम्ही त्या संस्थेचें अभिनंदन करितों.

येणंप्रमाणें गाईगुरांवरील आपत्तींचा प्रतिकार करण्याकरितां वर दर्शविलेल्या अनेक साधनांचा उपयोग होत आहे. गोरक्षणी संस्थांचें कार्य, व्यापाऱ्यांचे अहिंसेच्या व भूतदयेच्या तत्वानें होणारे दानधर्म व पशुपक्ष्यां विषयींची त्यांची कळकळ, तसेंच भूतदयेचा प्रसार करण्याकरितां होणारी वाङ्मयप्रसिद्धी वगैरे गोष्टी इष्ट व कांहीं अंशीं उपयुक्तच आहेत. परंतु इतर सर्व प्राण्यांमध्यें 'विश्वमाता' म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या गाईच्या आपत्तीचा प्रथम प्रतिकार केला व शेतकऱ्यांस सहाय्य करून जनावरांचें योग्य प्रकारें रक्षण केलें तर देशाच्या आपत्तींचें मूळ पूर्णपणें नाहींसें होणारें आहे.

## सांप्रतच्या आपत्तींचीं मूळ कारणें.

गाईवरील आपत्ती दूर करण्याचे कामीं जितके श्रम व जितका पैसा आतांपर्यंत खर्च झाला आहे, तितकी फलप्राप्ति मात्र झाली नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. सर्वत्र अशी निष्फलता कां व्हावी हें कळण्याकरितां या आपत्तीच्या मूळ कारणांचा थोडासा विचार केला पाहिजे.

**व्यापाऱ्यांची कर्तव्यपराङ्मुखता.**

पहिलें कारण:—वर्णव्यवस्थेप्रमाणें पाहिलें म्हणजे 'व्यापार आणि गोरक्षण' हें जसें वैश्यांचें कर्तव्यकर्म आहे. तसेंच कृषि म्हणजे शेतकी हेंहि पण त्यांचेंच कर्तव्यकर्म आहे.

'कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्मस्वभावजम्।'

शेती, गुरें ढोरें पाळण्याचा धंदा व व्यापार हीं वैश्यांचीं स्वभावजन्य कर्में होत हें गीतावचन सुप्रसिद्ध आहे. पण भरतखंडांतल्या वैश्यवर्गानें अतिशय कष्ट पडतात म्हणून म्हणा किंवा अवांतर कांहीं कारणांमुळें म्हणा शेती करणें टाकून दिलें आहे आणि गोरक्षणाकडेहि केवळ भूतदयेचें एक सत्कृत्य या दृष्टीनें ते पाहत असल्यामुळें जागोजाग असलेले पांजरपोळ व गोशाळा हीं कांहीं दयाशील व्यापाऱ्यांचाच व्यवसाय होऊन बसलीं आहेत. ज्यांच्या हातांत आज शेतकी आहे त्यांना गोरक्षणाचें महत्त्व कळत नाहीं किंवा कळत असून वळत नाहीं म्हणजे त्याप्रमाणें आचरण करण्याचें त्यांना सामर्थ्य नाहीं. ज्यांचें लक्ष गोरक्षणाकडे आहे त्यांना शेतकी करण्याचें

सामर्थ्य असून ते करीत नाहींत. वास्तविक शेती आणि गोरक्षण हीं परस्परावलंबी आहेत, पण वेगवेगळ्या समाजाचे हातीं पडून त्यांचे परस्परांमधील सहकारित्वाचें सूत्र तुटल्यामुळें दोघांचीहि स्थिति समाधानकारक नाहीं. नाव दुभंग झाल्यानंतर तिचे दोन तुकडे नदीच्या प्रवाहाबरोबर इतस्ततः वाहत जात असतात. त्यांचा परस्पर संबंध कांहीं राहत नाहीं व लोकांस परतीराला नेण्याचें कार्य त्यांच्याकडून होत नाहीं; इतकेंच नव्हे तर ते दोन तुकडे मिळून पूर्वी एक नाव होती व तिच्यामधून हजारों लोक पैलतीराला जात होते हें ध्यानांत सुद्धां येणार नाहीं इतकें त्यांचें रूपांतर होतें. शेतकी व गोरक्षण यांची अवस्था अशीच झाली आहे. दोहींचा अंतर्भाव एकाच वैश्य वर्गाच्या कर्तव्यांत होतो. पण हल्लीं गोरक्षण व शेतकी यांचा कांहीं संबंध आहे ही कल्पना सुद्धां कोणाला येत नाहीं. वैश्यवर्ग जें गोरक्षण करीत आहे त्याचा उपयोग शेतीला होत नाहीं आणि आपली शेती गाईबैलांच्या रक्षणावर अवलंबून आहे ही जाणीव शेतकऱ्यांत नाहीं. व्यापाऱ्यांच्या गोरक्षणाचा शेतीला जसा उपयोग होत नाहीं तसाच त्यांच्या भूतदयेचाहि गरीब शेतकऱ्याला कांहीं उपयोग नाहीं. सारांश, शेतकी व तिला आधारभूत असें गोरक्षण हीं दोन्हीं वैश्य वर्गाचीं कर्तव्यें असतांना शेतकीला ते अजिबात विसरले आणि गोरक्षणाकडेहि त्यांचें असावें त्या दृष्टीनें लक्ष नाहीं; त्यामुळें व्यापारांत देखील त्यांचे हातांत नुसती दलाली राहून त्यांचें गोरक्षण व्हावें तितकें यशस्वी व उपयुक्त होत नाहीं ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे.

वैश्यवर्गाची स्वधर्मच्युति हे या गाईगुरांवरील आपत्तींचें मुख्य कारण होय. दुसरें कारण शेतकऱ्यांचें दारिद्र्य व अज्ञान; या जोडीनें शेतकऱ्यांना इतकें ग्रासलें आहे कीं, त्यांची स्थिति दलदलींत फसलेल्या दुर्दैवी प्राण्याप्रमाणें झाली आहे. दलदलींत रोवलेला प्राणी वर निघण्याकरितां जिवापाड मेहनत करितो. पण जों जों तो वर येण्याचा प्रयत्न करतो तों तों त्याचे पाय जास्तच रोवले जातात. बैलांच्या कमतरतेमुळें जमीन चांगली व वेळचे वेळीं नांगरली

**२ शेतकऱ्याच्या दारिद्र्याचा शेतीवर होणारा परिणाम**

जात नाहीं. जमिनीची वाफ निघून जाते व मागून शेतकऱ्याचा नांगर येतो. पिकांतलें तणहि नीट निघत नाहीं. वेळच्या वेळीं पेरणी खुरपणी करण्यास त्यांच्या जवळ पैसा नसतो. पेरण्याकरितां त्यांना बीं चांगलें मिळत नाहीं, आणि अशा रीतीनें वर्षभर काबाडकष्ट करून जी कांहीं पैदास होईल तिच्यांतून बराचसा भाग सरकारसारा व सावकाराचें देणें यांचे भरीला घालून बाकी राहील त्यांतून गुरेंढोरें व कुटुंबांतील मंडळी यांचें पोषण दानधर्म, लग्नकार्यें, दुखणींबहाणीं, जमिनीच्या मेहनत-मशागतीचा खर्च, धंद्यांत येणारें नफानुकसान वगैरे सर्व गोष्टी पहावयाच्या. त्यामुळें कित्येकांस तर वर्षांतले दोन अडीच महिने अगदीं अर्धपोटीं रहावें लागतें. स्वतःची जर अशी दशा तर मग गोठ्यांतल्या गुरांचे हाल काय विचारावे ! महाराष्ट्रांतील खेड्यांच्या स्थितीचा अभ्यास करीत असतांना पुणें शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपाल डॉ. म्यान यांनीं एका व्याख्यानांत पुणें जिल्ह्यांतील पिंपळ सौदागर नांवाच्या खेड्याचें (२२।८।१९१७) असें वर्णन केलें कीं, "या खेड्यांत लोकवस्ती ५५६ आहे. गांवचें उत्पन्न सरासरी २२४५२ रु. आणि केवळ अन्नवस्त्र, बलुतेदार व सावकाराचें व्याज यांचा खर्च २२५०१ रु. आहे. गांवाला कर्ज १३५०० रु. आहे. एकशें अकरा कुटुंबांपैकीं अवघ्या आठ कुटुंबांचा शेतीवर निर्वाह होईल अशी स्थिति आहे. ३६ कुटुंबं शेती व मोलमजू-रीवर गुजारा करितात; आणि ६७ कुटुंबें अशीं आहेत कीं, त्यांना शेती आणि मोलमजुरी करूनहि निर्वाहापुरतें मिळत नाहीं ! ! ही सध्यांची स्थिति अगदीं भयंकर व नाउमेद करणारी आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं." अशा रीतीनें शेतकऱ्यांच्या मागें नित्य दुष्काळ आहे व त्यांच्याच हातीं आज जनावरांचें संरक्षण आहे, ही गोष्ट आमच्या दयावंत व्यापारी वर्गाच्या ध्यानींमनींहि नाहीं आणि दुष्काळानें उग्र स्वरूप धारण केल्यावर त्याच्या निवारणार्थ ते जे प्रयत्न करितात ते जरी सद्धेतूनें करीत असले, तरी एका दृष्टीनें 'जिता नेदी अन्न । मेल्या पिंडदान' अशासारखे हास्यास्पद वाटतात. थोडीच कां मदत होईना पण ती जर

संकटाच्या उगमावस्थेंत मिळाली तर ती नंतरच्या धांवपळीपेक्षां पुष्कळ उपयोगी होते. असो.

**३ पैदाशींत भेसळ**

वरील दोन कारणांमुळें सशक्त जनावरें दिवसेंदिवस कमी होऊं लागलीं आहेत. त्यांतच जनावरांच्या पैदाशींत भेसळ होऊन शुद्ध जातीचें जनावर आढळणें मुष्किलीचें झालें आहे. पुण्याच्या शेतकी कॉलेजांतील प्रो. नाईट यांनीं आपल्या एका भाषणांत असें सांगितलें कीं, “ गिरनारच्या भागांत सात वर्षांपूर्वीं जसे शुद्ध सुरती बैल आढळले तसे पुढें आढळले नाहींत. त्यांच्यांत खिलारी व माळवी जातींची इतकी भेसळ केलेली दिसली कीं, सुरती जात नामशेष होते कीं काय अशी मला भीति वाटली. महाराष्ट्रांत तर काम करण्यास काटक अशी शुद्ध गांवठी जात आज क्वचितच आढळते आणि बैल दाखवितांनाहि त्याच्या शुद्ध अवलादीकडे मुळींच लक्ष दिलें जात नाहीं, इतकेंच नव्हे तर तो पूर्ण निरोगी आहे कीं नाहीं हेंहि नीट तपासलें जात नाहीं. ” यापेक्षांहि अत्यंत उद्वेगजनक गोष्ट म्हटली म्हणजे शेंकडों खेडेगांवांतून कोणत्या का जातीचा असेना पण गाईला दाखविण्याकरितां वळू वेळेला पैसे देऊनहि मिळूं शकत नाहीं !

**४ चाऱ्याचा तुटवडा**

चाऱ्याचा तुटवडा फार असल्यानें जनावरांचा ऱ्हास होऊन अवलाद सुधारण्याला अडचण पडते. प्रो. नाईटसारख्या तज्ज्ञ गृहस्थांच्या मतें एका गाईला ३ एकर उत्तम चराऊ रान असल्यास तिला दुसऱ्या खुराकाची गरज न लागतां वर्षाची बेगमी होते. पण इतकें चराऊ रान आज हिंदुस्थानांत आहे कोठें ? जपानदेश क्षेत्रफळाच्या मानानें हिंदुस्थानच्या नवव्या हिश्शाइतका असून तेथील जंगल व चराऊ जमिन सर्व हिंदुस्थानांतील जंगलाच्या व चराऊ जमिनीच्या निम्पटी इतकी आहे. म्हणजे हिंदुस्थानच्या मानानें तेथील चराऊ रान चौपट आहे; आणि शिवाय तिकडे जनावरांस जंगलांतून चरण्यास हिंदुस्थानाइतका सक्तीचा प्रतिबंध नाहीं. याचा परिणामहि स्पष्ट दिसून येत आहे. १८८८ सालीं मुंबई इलाख्यांत ३१

लाख बैल व १८ लाख गाई होत्या❀ तेंच १९०६ सालीं २५ लाख बैल व ११ लाख गाई झाल्या ! हिंदुस्थानाची अशी उलटीप्रगती चालली आहे ! आणि तिकडे जपानांत जनावरांची संख्या वाढत्या प्रमाणांत आहे. हिंदुस्थानांत दर चौरस मैलास १० बैल धरले तर जपानांत दर चौरस मैलाला २० बैल पडतात. ज्या जमीनी पूर्वी जनावरांना चरण्याकरितां म्हणून मोकळ्या होत्या, त्यांपैकीं कांहीं लोकांनीं लागवडीस आणल्या आणि कांहीं सरकारी बंद भागांत गुंतल्या. १८५७ सालापर्यंत दोन शेतांमधील बांध सोळा हातांचा असे आणि हल्लीं हद्द ओळखण्याकरितां टीचभर रुंदीचे दगड पुराव लागत आहेत. लोकांनीं लोभाविष्ट होऊन पूर्वींचे बांधबंधारे व गायरानें लागवडीस आणण्यास सुरुवात केली त्याचे परिणाम आतां त्यांनाच भोगावे लागत आहेत. पूर्वीं चरावयास मुबलक असल्यामुळें कमजास्त गुरें बाळगण्याला अडचण वाटत नसे. पण हल्लीं गोठ्यांतलें एक जनावर जड झालें आहे. त्यामुळें गुरें भराभर विकलीं जाऊन अतिशय कमी झालेलीं आहेत व शेणखताच्या अभावीं जमीनी नापीक होत चालल्या.

**५ खताचा तुटवडा.** जमिनीला वेळेस मेहनत थोडी कमी झाली तरी चालते; पण खत मात्र भरपूर पाहिजे. परंतु गुरांच्या कमतरतेमुळें अगोदरच शेणखत कमी मिळूं लागलें आणि तेंहि सगळें जमिनीस न मिळतां त्यांतील बराच भाग सर्पणाऐवजीं उपयोगांत येऊं लागला. बैलाच्या एका जोडीच्या वर्षाच्या शेणखतांत ४५॥ रत्तल नायट्रोजन असतो.* पण त्याच्या गोवऱ्या करून जाळल्या गेल्यामुळें हा नायट्रोजन (खताला अवश्य लागणारा पदार्थ) शेताला मिळत नाहीं. त्यायोगें जमीन निकस व नापीक होते. व भरपूर पीक न आल्यानें गुरांचे व माणसांचे हाल होतात.

---

❀ प्रो. नाईटचें मुंबईगोरक्षकमंडळीपुढें झालेलें व्याख्यान.

* श्री. गुलाबभाई खंडूभाई देसाई बी. ए. नवसरी प्रदर्शनमधील शेतकऱ्यांच्या सभेंतील व्याख्यान.

यात्रमाणें वैश्यवर्गाची कर्तव्यपराङ्मुखता, दारिद्र्यामुळें शेतकऱ्यांच्या हातून होणारी हेळसांड, चाऱ्याची कमतरता इ. कारणांमुळें जनावरें कमी होऊं लागलीं. त्यांतच मांसाकरितां व चामड्याकरितां होणाऱ्या वधानें तर त्यांची संख्या अत्यल्प झाली. मांसाकरितां निरोगी व चांगलें जनावर लागतें आणि पाश्चात्य देशांप्रमाणें दुभतीं व वितीं फळतीं जनावरें मारण्याचा निर्बंध इकडे नसल्यानें ज्यांच्यापासून पुढें शेतकामाचीं व दुभतीं गुरें पैदा व्हावयाचीं अशीं जनावरें देखील कसाईखान्यांत मारलीं जातात. कसाईखान्यांतून मारल्या जाणाऱ्या जनावरांचे आंकडे फारसे प्रसिद्ध नाहींत; तथापि मि. जसावाला नांवाच्या पारशी गृहस्थांनीं असें प्रसिद्ध केलें होतें कीं, केवळ गोऱ्या सैन्याकरितां एक लाख पन्नास हजार जनावरें दरसाल मारलीं जातात; त्यांत शेंकडा ८० गाई असतात. कांहीं वर्षांपूर्वीं हिंदुस्थान सरकारचे अंडर सेक्रेटरी मि. ह्यूमसाहेब होते; त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टांत एकंदर ३५ लाख गुरें प्रतिवर्षीं मारलीं जातात असें म्हटलें आहे. १८६५–६६ सालांत हिंदुस्थानांतून ६० लक्ष रुपये किंमतीचीं गुरांचीं कातडीं परदेशीं गेलीं. १८८९ सालच्या सुमाराला ही संख्या ६ कोटी रुपयांवर गेली आणि हल्लीं सुमारें १३ कोटींचीं चामडीं परदेशीं रवाना होतात. चामड्याच्या आशेनें महार वगैरे लोक विष घालून जनावरांस मारतात, असा पुष्कळ दिवसांचा बोभाटा आहेच; परंतु आम्ही प्रत्यक्ष पाहिलेला प्रकार याहूनहि भयंकर आहे. ढोरानें जनावराच्या कातड्याची जिवंतपणीं किंमत करून विसाराचे रुपये महारामांगांच्या पदरांत टाकावयाचे आणि त्यांनीं त्याच रात्रीं त्या जनावराचा गळा कापून त्याचें ओलें कातडें त्या ढोराच्या पदरांत दुसरें दिवशीं टाकावयाचें; या अमानुष क्रूरतेस काय नांव द्यावें तें समजत नाहीं. अशा रीतीनें केवळ चामड्यांसाठीं व हाडाशिंगांसाठीं हजारों जनावरें दरदिवशीं मारलीं जात आहेत! एका आंकडेशास्त्र्यानें असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, एक गाय मारल्यानें साधारण ८० लोकांचा एक वेळचा निर्वाह होतो. तीच जिवंत

**६ मांसाकरितां व चामड्याकरितां जनावरांचा वध.**

राहून तिच्या व तिच्या एका पिढीच्या संततीच्या दुभत्याच्या व शेतकामाच्या उत्पन्नाचा फायदा घेतां आला, तर त्या उत्पन्नांत १६८००० मनुष्यें एकवेळ तृप्त होतात. ८० मनुष्यांच्या तृप्तीकरितां दीड पावणेदोन लाख लोकांच्या पोटावर पाय देण्यानें देश भिकेस लागला आहे.

**७ रोग**

वधाशिवाय रोगानेंहि हजारों गुरें मरत आहेत. मि. ह्यूमसाहेबांच्या रिपोर्टांत एका सालांत १ कोटी गुरें रोगानें मेल्याचा उल्लेख आहे! याप्रमाणें गुरांचा ऱ्हास ज्या ज्या कारणांनीं होतो त्यांचें व तीं दूर करण्याकरितां सांप्रत योजण्यांत आलेल्या अपुऱ्या उपायांचें येथवर विवेचन करण्यांत आलें.

या सर्व आपत्तींस उपाय म्हणजेच

## खरें गोरक्षण

**व्यापाऱ्यांनीं स्वधर्मतत्पर होणें.**

याविषयीं आतां विचार करावयाचा आहे. गाईगुरांवरील संकटपरंपरेचें मूळ शेतकरी लोकांकडून होणाऱ्या गोविक्रयांत आणि व्यापारी वर्गाच्या कर्तव्यपराङ्मुखतेंत आहे; म्हणून या दोन वर्गाला या विषयासंबंधीं योग्य दिशा प्रथम मिळाली पाहिजे. व्यापारी वर्ग आज जें गोरक्षण करीत आहे, तें केवळ जीवदयेच्या एका दृष्टीनें करीत आहे म्हणजे त्या जीवदयेंत फक्त पशुपक्ष्यांचाच अंतर्भाव होतो. परंतु आमचें म्हणणें असें कीं, जर जीवदयेचें कार्य तुम्ही करीत आहां तर जीव या शब्दांत मनुष्यांचा–गरीब व असाह्य अशा शेतकऱ्यांचा–समावेश कां करीत नाहीं? कीं हिंदुस्थानांतलि दरिद्री शेतकरी जीवकोटींत बसण्याइतक्याहि योग्यतेचे राहिले नाहींत? यांच्या जीवदयेंत गरीब माणसांचा समावेश होत नाहीं म्हणावें तर लक्षावधि वेषधारी साधु या व्यापारी वर्गाच्या औदार्यावरच चमन करीत आहेत. यांतील सार इतकेंच कीं व्यापारी वर्गाची भूतदया सर्वांबद्दल आहे. पण तिला योग्य दिशा नसल्यानें ज्यांना यांच्या साह्याची खरोखर अपेक्षा आहे आणि ज्यांच्यावर सर्व राष्ट्राचें जीवन अवलंबून आहे त्या शेतकऱ्यांकडे या दानशूर व्यापाऱ्यांची दयादृष्टी वळत नाहीं आणि भलतेच लोक फायदा घेऊन जातात.

म्हणून शेतकरी वर्गास जेणेंकरून साहाय्य मिळेल अशा दृष्टीनें जीवदयेचें कार्य चालवें. जीवदयेच्या दृष्टीनें गुरें सोडावयाचीं तीं मुख्यतः ज्या गांवीं देशावर बाजार भरतात तेथें आपल्या आडत्यामार्फत अगर गोरक्षणी प्रचारकांमार्फत शेतकऱ्यांपासूनच घ्यावीं; म्हणजे थोड्या किमतींत पुष्कळ जीव सुटतील आणि खऱ्या गरिबांस मदत मिळेल.

**कृषिसाहाय्यक पेढ्या.** शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याला दुसरा उपाय म्हणजे त्यांचा कर्जबाजारीपणा नाहींसा करणें. सरकारी सारा, सावकारी कर्ज, लग्नकार्य व भांडणतंट्याचे खर्च याकरितां त्यांचीं गुरें नेहमीं बाजारांत येतात. त्या प्रसंगीं त्यांना द्रव्यसाहाय्य देण्याकरितां 'कृषिसाहाय्यक पेढ्या' स्थापन झाल्या पाहिजेत. या पेढ्यांनीं फक्त गरीब शेतकऱ्यांनाच मदत करावी. १९१६ च्या मार्च महिन्यांत मुंबईचे प्रसिद्ध पुढारी ना. मनमोहनदास रामजी यांनीं सिडेनहॅम व्यापारी कॉलेजांत ' हिंदी पेढ्या ' या विषयावर व्याख्यान देतांना सांगितलें कीं, ' कृषिविषयक पेढ्या स्थापन झाल्याखेरीज शेतकऱ्यांची ऋणमुक्तता होणें अत्यंत दुर्घट आहे. या पेढ्या उद्योगधंद्याच्या गांवींच न ठेवितां खेड्यापाड्यांतून सुद्धां व्हावयास पाहिजेत. तरुणपिढीनें हा प्रश्न हातीं घेऊन देशाच्या कल्याणार्थ तो सोडविण्यास झटावें.' या सूचनेला अनुसरून शेतकी पेढ्या काढण्याचें कोणीं मनांत आणल्यास त्याला भांडवलाची वाण पडणार नाहीं. भूतदयेच्या नांवावर कसाईखान्यांतून गुरें सोडविण्यास जी दरसाल लक्षावधि रुपयांची रक्कम खर्ची पडत आहे, त्याचप्रमाणें मोठमोठाल्या पांजरपोळांतून ज्या हजारों रुपयांच्या रकमा शिल्लक पडून राहिल्या आहेत, त्या सर्व जर या पेढ्यांच्या द्वारानें गरजू शेतकऱ्यांना हलक्या व्याजानें वापरावयास मिळाल्या, तर त्या योगानें दरिद्री कुटुंबाला मदत होईल आणि ज्यांच्या पोषणाकरितां हजारों रुपये खर्चून पांजरपोळ काढावयाचे आणि कसाईखान्यांत लक्षावधि रुपये ओतून कसाबांच्या थैल्या भरून ज्यांचे प्राण वांचविण्याचा प्रयत्न करावयाचा तीं गुरें बहुतांशीं बिनखर्चानें वांचतील. कांहीं शहरांत पांजरपोळ आहेत, त्यांचे जवळ मोठमोठ्या रकमाहि शिल्लक आहेत. परंतु कोणी अनाथ जनावर पांजरपोळांत आणून

सोडील व त्याबद्दल प्रवेश फी देईल तरच त्याचें संरक्षण करण्याची तजवीज तेथें केलेली असते. त्याच शहरांत गुरांचा मोठा बाजार असतो. दर बाजारीं गुरांचे तांडेच्या तांडे पांजरपोळाच्या दारावरून जात असतात. पण मृत्यूच्या पाशांतून त्यांची सुटका करण्याकरितां हे पांजरपोळवाले कांहीं खटपट करीत नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. आपल्या शहरांत इतकीं जनावरें दर बाजारीं कोणकोणत्या गांवाहून येतात, त्या गांवांत अत्यंत गरीब शेतकरी कोण आहेत, आपल्या शेतीला उपयोगी पडणाऱ्या बैलाला बाजार दाखविण्याइतका बिकट प्रसंग कोणा शेतकऱ्यावर ओढवला आहे इत्यादि माहिती मिळवून हे पांजरपोळवाले त्या गरीब शेतकऱ्यांना मदत करतील तर त्या संस्थांच्या मूळ उद्देशास साजेलसें कार्य त्यांचे हातून झालें असें होईल.

**पांजरपोळांनीं सवलती देणें.**

पांजरपोळ, गोशाळा इ० संस्था मूळ भूतदयेच्या उद्देशानें निघालेल्या असतात. तो हेतु कायम ठेवून व्यापकपणाच्या व लोकोपयुक्ततेच्या दृष्टीनें त्यांचें कार्य चालविलें तर या गोरक्षणी संस्था म्हणजे बुडित खर्चाचीं खातीं व समाजावर निष्कारण ओझें होत, असा जो त्यांचेविषयीं आक्षेप आहे तो दूर होऊन नवीन संस्था काढण्याला हल्लीं ज्या अडचणी येतात त्याहि बहुतांशीं नाहींशा होतील. व्यापकपणाच्या व लोकोपयुक्ततेच्या दृष्टीनें कार्य कसें करावें आणि तें किती परिणामकारक होते या विषयीं वाई येथील श्रीगोवर्धन संस्थेनें सप्रयोग अनुभव घेऊन पाहिला आहे. या संस्थेचें कार्य ज्या नमुन्यावर चाललें आहे, त्याची सामान्य रूपरेखा येणेंप्रमाणें:—

( १ ) खोंड, बैल, दुभती गाय किंवा चांगली कालवड घेण्याकरितां शेतकरी आपलीं गुरें विकतात. त्याकरितां शेतकऱ्यांचीं जनावरें ठेऊन घेऊन त्याबदला शेतकऱ्याला लागणारीं गुरें संस्थेंतून कोठें विकणार वगैरे नाहीं अशा करारावर दिलीं जातात.

( २ ) घरीं संभाळण्यास कोणी नसल्यामुळें गुरें विकलीं जातात तीं संभाळण्याची संस्थेंत तजवीज केली जाते.

( ३ ) अर्धलीनें असणारी गुरें प्रसंगीं विकलीं जातात, म्हणून ज्यांना आपलें जनावर संस्थेंत अर्धलीनें ठेवण्याची इच्छा असेल त्यांशीं अर्धल केली जाते.

( ४ ) संस्थेंत जनावर दाखल करून घेतांना गरीब शेतकऱ्यांच्या जनावरास प्रवेश फी मुळींच घेतली जात नाहीं, इतकेंच तर नव्हे प्रसंगीं त्यास चार दोन रुपयांची मदतहि दिली जाते.

संस्थेंतील या सवलतींचा कोणी गैरफायदा घेऊं नये म्हणून निर्बंध जरूर हवेत, पण ते निर्बंध घालतांना गरीब शेतकऱ्यांच्या गुरांकरितां पांजरपोळाचे दरवाजे सतत उघडे राहतील अशी खबरदारी घेतली पाहिजे. कारण या सवलतींमुळें आपलीं गुरें बाजारांत विकण्याची शेतकऱ्यांची प्रवृत्ति कमी होऊन ते पांजरपोळाशीं व्यवहार करण्यास आपण होऊन तयार होतात. शेतकऱ्यांना मदत करण्यासंबंधानें कोणाचाहि मतभेद नाहीं. त्याविषयीं सर्वांचे— ख्रिस्ती, मुसलमान, हिंदु, पारशी वगैरे धर्मांचें—तसेंच प्रजेचें व सरकारचें पूर्णपणें मतैक्य आहे, म्हणून या संस्थांचा उपयोग ( श्रीगोवर्धन संस्थेच्या पद्धतीप्रमाणें ) शेती व शेतकरी यांचे कार्याकडे प्रत्यक्ष होऊं लागला तर त्यांजविषयींचे सर्व गैरसमज दूर होऊन त्या चांगल्या कार्यकर्त्या संस्था होतील.

शेतकीविषयक पेढ्या काढून शेतकऱ्यांच्या सांपत्तिक अडचणी दूर करणें, पांजरपोळांमध्यें शेतकरी लोकांस सवलती ठेवणें,

**दुभतें व पैदाशीची सुधारणा.**

यांखेरीज गुरांवरील आपत्ति दूर करण्याचा दुसरा मार्ग म्हटला म्हणजे दुभत्याचे व अवलाद सुधारण्याचे कारखाने काढणें हा होय. निर्भेळ दुधाच्या अभावीं देशांतील आरोग्याचें जें नुकसान होत आहे त्याकडे देशांतील विचारी लोकांचें लक्ष लागत चाललें आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. युरोपखंडांत लहान अर्भकांच्या मृत्यूचें प्रमाण हजारीं ५८ आहे; आणि हिंदुस्थानांत ३६० आहे. एक वर्षाचें वय होईपर्यंत मुलाची वाढ फार झपाट्यानें होते. या वेळेला खात्रीचें दूध न मिळालें तर पोटांतील विकार वगैरे होऊन पुष्कळ मुलें पहिल्याच वर्षांत मृत्युमुखीं पडतात. आणि इकडे चाऱ्याची कमतरता, जोपासनेची हेळसांड, रोगराई, कत्तलखाने

वगैरेमुळें दुभर्ती जनावरें नाहींशीं होत चालली आहेत; जीं आहेत त्यांच्या आंगांतला कस दर पिढीस कमी कमी होत चालला आहे; म्हणून त्यांच्या पैदाशींत सुधारणा करणें व दूधदुभत्याचा पुरवठा करून देशाच्या आरोग्याचें संरक्षण करणें आज फार अगत्याचें झालें आहे. कमी दुधाच्या गुरांपासून दुधाळ गुरें निपजाविणें, मद्दड जनावरांची अवलाद सुधारून त्यांपासून चलाख, काटक व देखण्या जनावरांची पैदास करणें वगैरे बाबतींत पाश्चात्य देशांत फार आश्चर्यकारक प्रयोग केले आहेत. आपल्या इकडच्या साधारण जनावरांप्रमाणेंच पूर्वी तिकडे जनावरें होतीं; पण या सुधारलेल्या प्रयोगामुळें एकेका गाईपासून रोजचें ३८ शेरपर्यंत दूध तिकडे मिळूं लागलें आहे व वर्षांत एका गाईपासून ५०० शेर लोणी निघूं लागलें आहे. * ही पैदास सुधारण्याची पद्धतहि कांहीं अवघड दिसत नाहीं. पण इकडे आमचें लक्ष जाईल तेव्हां !

**चामडें विक्री.**

गोरक्षणाला औद्योगिक दिशा लावण्याचा आणखी एक मार्ग आहे. तो असा कीं, मेलेल्या जनावरांचीं हाडें व चामडीं यांची विक्री करणें; हा मार्ग कित्येकांना धर्मदृष्टया विरुद्ध वाटतो; पण त्यांनीं थोडा विचार करावयास पाहिजे. गोरस विकणें हें धर्मदृष्टया पापच आहे; पण तें आज लोकांच्या हातून घडत आहे. गोविक्रय करणें तर महत्पाप आहे. गाईला शिव्या देणें व काठीनें मारणें हेंहि पाप आहे. पण किती लोक याला मानतात ? जनावर मेल्यानंतर त्याचें चामडें कसाई विकतो आणि गाईला आई म्हणणारे हिंदुलोक जिवंतपणींच तिचीं हाडें व चामडें विकतात—मृत-हाडाचामड्यापेक्षां जिवंत हाडाचामड्यास किंमत कमी. कारण जिवंत गुरें ३।४ रुपयांस विकत मिळतात. आणि तींच मेल्यावर त्यांच्या हाडांचीं व चामड्याची दुप्पट किंमत येते. म्हातारीं जनावरें तर बहुतेक सर्व कसाबांकडे जातात. तेव्हां अशा अनेक प्रकारच्या धर्मविरुद्ध गोष्टी चालत असतां त्यांचे विरुद्ध कोणी ब्र काढीत नाहीं आणि जो उद्योग कोणाच्या

खासगी स्वार्थासाठीं नसून जनावरांच्या संहारास आळा घालणारा आहे त्या विरुद्ध हाकाटी करणें ह्मणजे शुद्ध वेडेपणाच आहे. हा उद्योग धर्मविरुद्ध आहे असें कोणी म्हणणार नाहीं अशी खात्री वाटते. इतक्याउपर यांत कांहीं पाप लागत असल्यास प्राणदानाच्या महत्पुण्यासाठीं थोडेसें पातक झालें तरी हरकत नाहीं, गोप्राणदानाचें सोळा आणे पुण्य मिळविण्यासाठीं चामडें-विक्रीच्या अशुद्ध व्यापारापासून पैसे दोन पैसे पाप लागत असल्यास पापपुण्याच्या दृष्टीनें फारसें नुकसान नाहीं. उलट जीवरक्षणास तितक्या रकमेची मदत मिळून जे लोक केवळ चामड्याच्या आशेनें गुरांना मारतात त्यांना 'लेदर फॅक्टरी' वगैरेसारखे धंदे काढून देऊन हिंसेपासून परावृत्त करतां येईल.

**मांसभक्षणाची प्रवृत्ति पालटणें.**

मांसाकरितां जी हिंसा होते तिला आळा घालण्याकरितां जे मांसाहारी असतील त्यांस त्या मांसाहारानें शरीरावर घडणारे दुष्परिणाम प्रत्यक्ष प्रमाणानें दाखवून देऊन मांस-भक्षणापासून प्रवृत्त केलें पाहिजे. या दृष्टीनें विलायतेंतील ' धि ऑर्डर ऑफ धि गोल्डन एज' या शाकाहार–प्रवर्तक मंडळीच्या धर्तीवर मुंबई इलाख्यांत 'जीवदया ज्ञान-प्रसारक मंडळी–मुंबई,' 'प्राणिरक्षक संस्था–धुळें,' 'यांचें कार्य उत्तम प्रकारें चाललें आहे. इतर इलाख्यांतूनहि अशा कांहीं संस्था आहेत. प्रसिद्ध जर्मन डॉक्टर कुन्हे यांनीं मनुष्य व पशु यांचे दांत, जठर, आंतडें, घ्राणेंद्रिय यांची परीक्षा करून मनुष्य हा मांसभक्षक प्राणी नाहीं, असें सिद्ध केलें आहे. मांसाहारी प्राण्याचे सुळे दांत विशेष लांब असून पुढील दांत बळकट नसतात. मनुष्याच्या दांतांची रचना वेगळ्याप्रकारची असते. मनुष्य आपलें अन्न चावून खातो, हिंस्र पशूंना नीट चावतां येत नाहीं. मांसभक्षक पशु जिभेनें पाणी पितात, मनुष्य ओठानें पितो; मांसभक्षक पशूंचें जठर वाटोळें असून त्यांचीं आंतडीं त्यांच्या शरीराच्या मानानें पांच सात पट लांब असतात. मनुष्याचें जठर काजूच्या आकाराचें लांबट असून त्यांचें आंतडें १० ते १५ हात लांब असतें. सिंह, वाघ, मांजर वगैरे प्राणी वासावरून आपल्या भक्ष्याचा सुगावा लावतात. आणि मनुष्यें मांसाकडे स्वाभाविकपणें धांव घेत

नाहींत. ज्या मुलास मांस खाण्याची संवय आहे, परंतु मांसाकरितां इतर प्राण्यांचा वध होतो ही गोष्ट ज्यास ठाऊक नाहीं असा एखादा मुलगा मेंढीकडे किंवा कोंबडीकडे पाहून ' काय छान वास येतो, याचा अमुक पदार्थ केल्यास किती गोड लागेल ' असे उद्गार कधीं तरी काढील काय ? रस्त्यानें चाललेल्या जनावराचा लचका तोडावा असें मांसभक्षकास सुद्धां वाटत नाहीं; यावरून मनुष्याची स्वाभाविक रुचि मांसभक्षणास अनुकूल नाहीं हें सिद्ध होतें. लहान मुलांचें स्वाभाविक अन्न दूध होय. ज्या स्त्रिया मांसाहार करितात त्यांना पुरेसें दूध नसतें असें कांहींचें म्हणणें आहे. पाश्चात्य देशांतील श्रीमंतांच्या स्त्रियांना मूल पाजण्याइतकें दूध नसतें याचें कारण मांसाहारच होय; म्हणून त्या दाया नोकरीस ठेवतात. दाया गरीब असल्यामुळें त्यांना भरपूर मांस खाण्यास मिळत नाहीं; त्यामुळें प्रथम प्रथम त्यांना दूध असतें. श्रीमंतांच्या घरीं राहण्यामुळें त्या दायांच्या खाण्यांतहि जास्त मांस येऊं लागतें आणि त्यामुळें त्यांचें दूध कमी होतें. असें होतांच त्यांना कामावरून दूर केलें जातें. त्या देशांत तान्ह्या मुलांच्या आयांना जास्त दूध यावें म्हणून ओट धान्याची अंबील देतात. मांसाहारापेक्षां धान्याहार पुष्टिकारक आहे. एरव्हीं त्यापासून स्त्रियांचे ठायीं मुलांना पुष्टिकारक असें दूध उत्पन्न होतें ना. मांसाहाराची ज्यास संवय नाहीं त्या प्राण्यास तें खाऊं घातल्यास त्याला तें न पचतां उलटें त्याची प्रकृति बिघडविण्यास मात्र कारणीभूत होते. मांसाहारानें शरिरांत गुप्त असलेले रोग बळावतात व नसलेले उत्पन्न होतात. कारण जीं जनावरें कसाईखान्यांत कापलीं जातात त्यांपैकीं शेंकडा ५० टक्के क्षय, नासुडें, फुप्पुसांचे रोग, फासी, पायलग, वगैरे अनेक रोगांच्या आधीन झालेलीं असतात. आणि फक्त निरोगी जनावरांचेंच मांस खाण्यांत यावें म्हणून कितीहि बंदोबस्त ठेविला तरी रोगट मांस थोड्याफार प्रमाणानें त्यांत मिसळलें जातेंच. त्यामुळें मांसभक्षकांत अनेक प्रकारचे भयंकर रोग उत्पन्न होतात. * सर

---

* या कलमांतील बरीचशी माहिती ' जीवदया ज्ञानप्रसारक ' मंडळीनें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांच्या आधारें लिहिली आहे.

वॉल्टर स्कॉट यांनीं लिहिलेल्या एका कादंबरीच्या प्रस्तावनेंत डॉ. ॲडम फर्ग्यूसन या विषयीं अशी हकीकत दिली आहे कीं, तो ६५ वर्षांचा असतांना त्याला अर्धांगवायु झाला. त्यावर त्याचा मित्र डॉ. ब्लॅक यानें त्यास मांसाहार वर्ज्य करण्यास सांगितलें; तेव्हांपासून डॉ. ॲडम फर्ग्यूसन शाकाहारी बनला. त्यामुळें आंगांतील सर्व रोग नाहींसा होऊन त्यास नवजीवन प्राप्त झालें व तो पुढें २० वर्षें जगला. मांसाहारानें संधिवात, अर्धांगवायु, नासूर, क्षय, हृद्रोग, इन्फ्ल्यूएंझा, दमा, मधुमेह, वगैरे अनेक रोग उत्पन्न होतात. कोणी म्हणतात मांसाहार वनस्पत्याहारापेक्षां जास्त शक्तिवर्धक आहे. पण ही गोष्ट सपशेल चुकीची आहे. डॉ. आग्रमस्की हे म्हणतात कीं, 'शुद्ध अन्नापासूनच शुद्ध रक्ताचा पुरवठा होतो. वनस्पतिवर्गापासून मिळणारें अन्न शुद्ध होय. सूर्यापासून जीवमात्रास प्राणशक्ति मिळते, आणि सूर्याची ही प्राणशक्ति वनस्पतीमध्यें किरणद्वारां नित्य सांठविली जात असते.' इंग्लंडमध्यें कांहीं मांसाहारी व वनस्पत्याहारी मुलांच्या सायक्लिंग, पोहणें, धांवणें वगैरे बाबतींत शर्यती लागल्या, त्यांत वनस्पत्याहारी मुलेंच श्रेष्ठ ठरलीं. मुंबईंतील प्रसिद्ध बुकसेलर्स थॅकर आणि कंपनीचे ॲक्टिंग मॅनेजर मि. एच्. ई. आयनिंग हे आज२७वर्षें कट्टे शाकाहारी आहेत. त्यांनीं अनेक ठिकाणीं सायक्लिंग वगैरेंच्या शर्यतींत पहिला नंबर मारून सुवर्ण पदकें मिळविलीं आहेत. १८ व्या शतकापर्यंत आयरिश लोकांचा मुख्य आहार बटाटा व ताक हेच पदार्थ होते. आणि अशा शाकाहारी लोकांमधूनच मार्लबरो व वेलिंग्टन सारखे जगद्विख्यात सेनापति निघाले. यूरोपच्या इतिहासांत असें म्हटलें आहे कीं 'हाल अपेष्टा सहन करण्यास लागणाऱ्या शक्तीबद्दल सर्वराष्ट्रांच्या इतिहासांत ज्यांची अग्रस्थानीं गणना करितात, असे रोम व स्पार्टा येथील विजयी लष्करी शिपाई मांसाहारी नसून वनस्पत्याहारी होते.' 'मांसाहाराच्या योगानें शरिराची शक्ति व हिंमत कमी होते' असें प्रो. लॉरेन्स म्हणतात. "Uric Acid as a factor in the causation of disease" या अति उपयुक्त व विद्वत्ताप्रचुर ग्रंथांत प्रसिद्ध डॉ. हेग यांनीं आपला स्वतःचा अनुभव प्रसिद्ध केला आहे. ते म्हणतात, 'मला मस्तकशूळाची जबरदस्त व्यथा होती.

नाना प्रकारचीं औषधें घेतलीं, आहारांत फेरबदल करून पाहिला, पण पूर्ण गुण येईना, शेवटीं मांसाहार सोडून दिला तेव्हां मस्तकशूल कायमचा मिटला.'—याप्रमाणें अनेक शास्त्रज्ञांनीं स्वानुभवानें मांसभक्षणाचे दुष्ट परिणाम प्रगट केले आहेत ते पाहिले तर स्वतःच्या शारीरिक स्वास्थ्याकरितां तरी मनुष्यानें मांस सोडून दिलें पाहिजे असें कोणीहि विचारवंत मनुष्य कबूल करील. म्हणून हिंदुस्थानांतील सांप्रतच्या मांसाहारी लोकांनीं मांस खाण्याचें सोडून दिल्यास त्यांचें व्यक्तिविषयक हित तर साधेलच, आणि शिवाय मांसभक्षण कमी झाल्यानें जीं जनावरें (विशेषेकरून शेतीचीं) वांचतील त्या योगानें शेतीचाहि फायदा होईल.

**संस्थानिकांनीं गोरक्षणास मदत करणें.**

काठेवाडांत गाईबैलांच्या संरक्षणाविषयीं कित्येक संस्थानांतून फारच काळजी घेतली जाते. दुभत्या व विणाऱ्या गाई आणि शेतकऱ्यांचीं जनावरें वधिकांच्या हातीं न जावींत म्हणून तिकडे चांगला बंदोबस्त केला आहे. बडोद्याचे प्रजाहितदक्ष महाराज श्री. सयाजीराव गायकवाड यांचे आज्ञेवरून बडोदें संस्थानचे हद्दींत गोवध होऊं नये म्हणून जाहिरनामा निघाला आहे. तो आमच्या वाचकांकरितां जशाचा तसाच येथें दिला आहे.

॥ श्री ॥

## बडोदें राज्य आज्ञापत्रिका तारीख १९ आक्टोबर १९१५

### न्यायमंत्री कचेरी.

# जाहिरना.

आ राज्यमां कोई पण ठेकाणे गोवध थतो नथी, अने जूदा जूदा लोकोमां धर्ममां सलाह संप जाळवी राखवा माटे ते थवो इष्ट नथी, तेथी बकरी ईदने प्रसंगे गोवध नही करवानां संबंधमां हुजूर कचेरी जाहेरनामा नंबर १ तारीख ३०।८।८६ नो प्रसिद्ध

करवामां आव्युं हतुं. तेने लांबी मुदत वीती गएली होवाथी सर्वे लोकोने जाणमाटे ते फरी नवेसर प्रसिद्ध करवूं तथा आखा राज्यने लागूं करवुं इष्ट जाणायाथी हुजूरहुकूमअन्वये नीचे मुजब ठराववामां आवे शे.

१ बकरी ईद अगर बीजा कोई पण प्रसंगे धर्मना के बीजा कोई सबबथी आ राज्यना कोई पण भागमां कोई पण सखसे गोवध करवो नही.

गोवध करवो नही.

२ सदर हुकुमनी अमान्यता करनार सखस फौजदारी निबंधनी कलम १४२ प्रमाणे शिक्षाने पात्र थशे.

गोवध ए शब्दमां गाय, बळद, आखलो अथवा तेना वाछडानां वधनो समावेश थाय छे.

खुलासा.

ता. १७ आक्टोबर सन १९१६

( सही ) सी. एम्. डी. ( सही ) जी. बी. आंबेगांवकर.

न्यायमंत्री.

## जमीन महेसुलसंबंधीं नीयमनी कलम ११३

ज्यारे गायनु वेचाण करवानो प्रसंग आवे त्यारे तेनी हराजी पोकराव्या वगर अहिंसक सखसपैकीं जे सखस उचक किंमत आपी राखवा कबूल करे तेने आपवी. अने एवो कोई सखस राखवा कबूल न होय तो ते गाय जेनी मालकीनी हशे तेने परत सोंपवी. अथवा तेवो मालीक न होय तो जे अहिंसक सखस किंमत आप्याशिवाय संभाळ करवानी शरते कबूल होय तेने सोंपी देवी.

गायना वेचाणनी विशेष रीत.

## बडोदें राज्य फौजदारी निबंध कलम १४२

सरकारी नोकरना कायदेसर हुकुमनी अमान्यता करनारने छ महिनानी सुधीनी गमे ते प्रकारनी केदना अथवा दंडनी अथवा

**ए बन्नेनी शिक्षा करवी. पण ते दंड रु. १००० एक हजर करतां वधारे होवो न जोईए.**

याचा सारांश असा कीं, बकर–इ–ईद किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रसंगीं धर्माच्या किंवा दुसऱ्या कोणत्याहि सबबीनें या राज्यांतील कोणत्याहि भागांत कोणीं गोवध (गाय, बैल, अथवा त्यांची संतती) करूं नये. या हुकुमाची अमान्यता करणारा मनुष्य फौजदारी कायद्याचें कलम १४२ प्रमाणें शिक्षेस पात्र होईल. कोंडवाड्यांमध्यें असणाऱ्या गुरांसंबंधाच्या ठरावाचा सारांश पुढीलप्रमाणें आहे; गोविक्रीचा प्रसंग आल्यास अहिंसक जातींपैकीं जो मनुष्य किंमत देऊन पाळण्याचें कबूल करील त्यास गाय लिलांव न पुकारतां द्यावी. अशा प्रकारें कोणी राखण्यास तयार नसेल तर ज्याची त्यास गाय देऊन टाकावी. मालक नसेल तर अहिंसक जातींपैकीं पैसे न देतां केवळ सांभाळण्याच्या इच्छेनें जो कोणी घेत असेल त्यास द्यावीं. बडोदेंसरकारप्रमाणेंच देवगडबारियाचे राजेसाहेब, वांकानेरचे श्री. अमरसिंह, श्री. बाबासाहेब मळेकर संस्थान मिरज ज्युनिअर व छत्तरपूर ( बुंदेलखंड ) येथील महाराजेसाहेब यांनीं आपल्या राज्यांत गोवध बंद केला आहे. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील प्रमुख संस्थानिक श्रीमंत शाहू छत्रपती महाराज सरकार करवीर यांनीं सन १९००सालीं जाहिरनामा प्रसिद्ध करून कोल्हापूर संस्थानच्या हद्दींत गोवध न व्हावा म्हणून ठराव केला, त्याचें पुनरुज्जीवन हल्लींचे सुप्रसिद्ध विद्वान् करवीरमठाधिपति श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांनीं नुकतेंच ता. २।१२।१७ रोजीं जाहीर सभा भरवून करून घेतलें. इतर संस्थानांतील लोकांस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं वरील उदाहरणें पाहून आपल्या संस्थानाधिपतींकडे गोवध बंद होण्याविषयीं कायदे करून घेण्याचे प्रयत्नांस लागावें. त्याचप्रमाणें वरील बडोदें, कोल्हापूर वगैरे ठिकाणच्या संस्थानाधिपतींचें अनुकरण करून इतर संस्थानिकांनींहि आपापल्या संस्थानांतून गोवधप्रतिबंधक कायदे करावे आणि ना. लॉर्ड वुइलिंग्डनसाहेब यांच्या म्हणण्याप्रमाणें शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचा यत्न करावा म्हणजे त्यांच्या हद्दींतील गुरांवरील आपत्ति सहजच दूर होतील.

संस्थानांत काय अगर ब्रिटिश हद्दींत काय, चाऱ्याची सुबत्ता जर असेल तर लोकांस गुरें पाळण्यास कठीण जाणार नाहीं

**चाऱ्याची वाढ पाहिजे**

प्रो. नाइट आपल्या एका भाषणांत म्हणतात कीं, "तुम्हीं आपल्या डोंगरी चराऊ रानांकडे पहा आणि त्यांची इतर देशांतील रानांशीं तुलना करा. इंग्लंडांतील चराऊ रानें पूर्वीं एके काळीं तुमच्या कडील रानासारखींच कनिष्ठ प्रतीचीं दिसत होतीं. पण काळजीपूर्वक सतत मेहनत केल्यामुळें तीं इतकीं सुधारलीं आहेत कीं, त्यांची गणना जगांतल्या अगदीं उत्तम प्रतीच्या कुरणांत होते. हिंदुस्थानांतील गवताच्या कांहीं जाती इंग्लंडांतील गवताइतक्याच—किंबहुना अधिक चांगल्या आहेत; पण त्यांच्या भोंवतीं हलक्या प्रकारचें गवत वाढून गर्दी झाल्यामुळें त्यांची वाढ फारशी होत नाहीं. शिवाय ताली किंवा बंधारे योग्य प्रकारचे नसल्यामुळें हिंदुस्थानांतील उतरणीवरची गवती रानें मोठ्या पावसानें नेहमीं वाहून जात असतात. अशा स्थितींत जें कांहीं थोडें बहुत गवत उगवतें त्यांत गुरें वाटेल तशीं व वाटेल तेव्हां चरतात. युरोप अमेरिकेंत एकदां चारलेला भाग पुनः वाढावा म्हणून तो कांहीं दिवस बंद ठेवतात. हिंदुस्थानासारख्या देशांत—जेथें चाऱ्याचा जास्त तुटवडा आहे तेथें—गवतीरानांच्या बाबतींत फारच काळजी घेतली पाहिजे."

**प्रचारकांची आवश्यकता.**

कोणतेंही काम तडीस नेण्यास तज्ज्ञ व अनुभवशीर पुढाऱ्याची जरूरी ज्याप्रमाणें असते, त्याचप्रमाणें त्या पुढाऱ्याच्या हाताखालीं कित्येक अनुयायी तयार असणें हेंहि आवश्यक आहे. एकाच मनुष्याकडून—मग तो कितीहि उत्साही व कळकळीचा असो—कोणतीहि गोष्ट त्याच्या एकट्याच्याच बळावर पूर्ण होणें शक्य नाहीं. पैसाफंडाचें उदाहरण घेतलें तर, आपणास असें आढळून येईल कीं, श्री. काळे हे निश्चयी, स्वार्थत्यागी व कळकळीनें काम करणारे असले तरी त्यांच्या एकट्याकडून हें काम तडीस जाणें शक्य नव्हतें. त्यांना जेव्हां भरपूर जोडीदार मिळाले व ठिकठिकाणीं शेंकडों स्वयंसेवकांनीं त्या कार्यास हातभार लावला तेव्हां

तेंच पैसाफंडाचें कार्य किती नांवारूपास आलें आहे हें प्रसिद्धच आहे. हाच नियम गोरक्षणी संस्थांसही लागू आहे. गुरांची स्थिति सुधारण्याचे बाबतींत वर जे मार्ग सुचविले आहेत त्याप्रमाणें काम करण्यास योग्य प्रचारक मिळाले तर चांगलें परिणामकारक कार्य होईल. श्री चौंडे महाराज यांनीं आजपर्यंत अविश्रांत परिश्रम करून निरपेक्षबुद्धीनें व स्वार्थत्यागानें ज्या कित्येक गोशाळा स्थापन केल्या आहेत, त्यांस त्यांची स्वतःची कर्तृत्वशक्ति ही तर मुख्य कारण आहेच; पण त्याबरोबर थोडेच कां होईनात पण स्वार्थत्यागी प्रचारक व कळकळीचे स्वयंसेवक काम करण्यास मिळाल्यामुळें महाराजांना इतक्या संस्था स्थापणें शक्य झालें, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. गोरक्षणाचें कार्य आतां दिवसेंदिवस वाढत चाललें आहे, अशा वेळीं कामाच्या वाढत्या प्रमाणाच्या मानानें तें काम नेटानें चालविण्यास प्रचारकांचीहि आवश्यकता अधिकाधिक भासूं लागली आहे.

सनातनधर्मपद्धतीप्रमाणें समाजास धर्मोपदेश करून योग्यमार्गास लावणारे असे कीर्तनकार व पुराणिक हे पूर्वींचे प्रचारक आहेतच; पण या उपदेशक वर्गामध्यें आजच्या मितीस तरी असावी तितकी संघटित व्यवस्था नसल्यानें * आणि धार्मिक बाबतींतील लोकांच्या औदासिन्यामुळें कीर्तनकारांची परिस्थिति बिघडून त्यांच्या पवित्र उद्योगास पोटभरू धंद्याचें स्वरूप आल्यानें या वर्गाचा प्रचारक या नात्यानें व्हावा तितका उपयोग होत नाहीं; करितां ठिकठिकाणच्या सर्व गोरक्षणी व पांजरपोळ संस्थांच्या चालकांना अशी अगत्याची सूचना आहे कीं, त्यांनीं या लेखांत वर सांगितलेले उपाय अमलांत आणून **खऱ्या गोरक्षणाचा प्रसार** करण्याकरितां आपल्या संस्थेच्या कार्यक्षेत्राप्रमाणें भरपूर प्रचारक तयार करावे. कोणत्याहि संस्थेच्या उद्देशांचा व कार्यांचा प्रसार करण्याचे कामीं प्रचारक हाच पहिला व खात्रीचा उपाय होय. वाईच्या श्री गोवर्धन संस्थेनें आज दोन वर्षांपासून या प्रकारचे प्रचारक तयार करण्याकरितां वाई मुक्कामीं श्री-

---

* पुढील महिन्यांत (जानेवारी १९१८) नागपूर येथें 'कीर्तन-संमेलन' भरून त्यांत याविषयीं विचार होणार असल्याचें समजतें.

**गोपाल विद्यालय** सुरू केलें आहे. त्याबद्दलची सर्व माहिती " व्यवस्थापक श्रीगोपालविद्यालय, श्रीगोवर्धन संस्था, वाई, जिल्हा सातारा " या पत्यावर मिळेल.

**सर्व गोरक्षणां संस्थांचें एकसूत्रीकरण.**

आज देशांत ठिकठिकाणीं बऱ्याच गोशाळा आहेत; पण खेदाची गोष्ट ही कीं, त्यांच्यामध्यें असावें तितकें सहकार्य नाहीं. त्यामुळें एका गांवच्या संस्थेस प्रसंगीं द्रव्याची अथवा इतर कांहीं आकस्मिक अडचण उत्पन्न झाली, तर तिला दुसऱ्या ठिकाणाहून मदत मिळत नसल्यानें ती संस्था मदतीच्या अभावीं नामशेषही होऊन जाण्याचा संभव असतो. गोवधाचें मूळ शेतकऱ्यांच्या हातून होणाऱ्या गोविक्रयांत आहे. कसाब आपल्या घरीं कांहीं गाईबैलांचीं खिल्लारें पाळीत नाहीं. त्याला पाहिजे असणारीं जनावरें तो गुरांच्या बाजारांत शेतकऱ्यांपासून घेतो. याकरितां ज्या ज्या गांवीं गुरांचा बाजार भरतो, त्या त्या गांवीं वर दाखविल्याप्रमाणें कृषिसाहाय्यक तत्त्वावर चालणाऱ्या गोरक्षणी संस्था निघणें जरूर आहे. पण मोठमोठ्या व्यापाराच्या सर्वच गांवीं अशा उपयुक्त संस्था अद्याप झाल्या नाहींत व कित्येक ठिकाणीं आहेत त्या चालविणें कठिण झालें आहे. मग जेथें गुरांचा बाजार भरतो, पण दुसरा व्यापार विशेष कांहीं नाहीं, आणि लोकवस्तीहि अगदीं थोडी आहे अशा गांवीं संस्था काढून ती कार्यकर्ती करून दाखविणें अतिशय अडचणीचें होईल. कांहीं ठिकाणीं उत्साही गोभक्त असतात; वाटेल त्या स्वार्थत्यागानें व निश्चयानें काम करण्याची त्यांची तयारी असते; पण गोरक्षणसंस्थेचें काम कसें करावें याची माहिती नसल्यानें अथवा पैशाचा भरपूर पुरवठा नसल्यानें तेथें गोरक्षणी संस्था निघणें शक्य नाहीं. क्वचित् निघाल्यास ती टिकत नाहीं. याच्या उलट कांहीं संस्थाजवळ भरपूर शिल्लक असते; पण दुसऱ्या अडचणींत सांपडलेल्या संस्थेस तेथून मदत मिळत नसल्यानें या श्रीमंत संस्थांचा उपयोग लोकांस योग्य प्रकारें होत नाहीं. या सर्व कारणांकरितां सांप्रतच्या सगळ्या गोरक्षणी व पांजरपोळ संस्थांचें एकसूत्रीकरण व्हावें, सगळ्यांच्या प्रतिनिधींची मिळून एक मध्यवर्ती

संस्था असावी आणि या मध्यवर्ती संस्थेनें बऱ्यावाईट अशा प्रसंगीं सर्व संस्थांचें नियमन करावें; म्हणजे वर दर्शविलेल्या अडचणींपैकीं कोणतीहि शिल्लक न रहातां सर्व संस्था परस्पर प्रेमभावानें व सहकारितेनें वागतील. या एकसूत्रीकरणाचा फायदा एकंदर देशास पुष्कळच होईल, हें कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. हें एकसूत्रीकरण कसें करावें आणि सर्व हिंदुस्थानभर गोरक्षणाच्या कार्याचा प्रसार कोणत्याप्रकारें करावा याविषयींची आमची योजना पुढें दिली आहे.

# गोरक्षण-प्रसारक योजना.

## १ गोरक्षणी ग्रामसभा.

( अ ) दरएक गांवीं एक सभा असून तिला '**गोरक्षणी ग्रामसभा**' असें नांव द्यावें.

( आ ) सर्व ग्रामस्थांच्या सल्ल्यानें ग्रामसभेकरितां अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, चिटणीस व कांहीं सभासद यांची निवडणूक व्हावी.

( इ ) ही निवडणूक दरसाल होत असावी.

( ई ) ग्रामसभेनें आपल्या गांवांतील गुरांची दरसाल श्रावणमासीं ( कारण हा महिना शेतकऱ्यांना इतर काम करण्यास सोईचा असतो ) खानेसुमारी करून त्यांच्या जन्ममृत्यूंची नोंद ठेवावी.

( उ ) गुरांची आणि गुरांच्या मालकांची परिस्थिति आपल्या तालुक्यांतील गोरक्षणी सभेकडे आणि कृषिसाहाय्यक पेढीकडे दर महिन्यास कळवीत जावी.

( ऊ ) आपल्या गांवांतील शेतकऱ्यांच्या गुरांसंबंधींच्या अडचणी तालुक्यांतील गोरक्षणी सभेमार्फत आणि सांपत्तिक अडचणी कृषिसाहाय्यक पेढीमार्फत दूर करण्याची व्यवस्था करावी.

( ऋ ) गोरक्षण तालुकासभेकडून गुरांची जोपासना, चाऱ्याची काटकसर, खताची व्यवस्था, इत्यादि बाबतींत ज्या उपयुक्त सूचना येतील, त्यांचा प्रसार आपल्या गांवांतील शेतकरीवर्गांत करावा.

( ए ) 'कृषिसाहाय्यक' पेढीकडून आपल्या गांवांतील शेतकऱ्यांकडे ज्या रकमा आल्या असतील त्यांची वसूली करून पेढीकडे पाठवावी.

( ऐ ) गोरक्षणी प्रचारकांस भिक्षा वगैरेंचे कामीं मदत करावी.

( ओ ) ग्रामसभेचें सर्व काम तालुक्यांतील गोरक्षणी सभेच्या व कृषि-साहाय्यक पेढीच्या वतीनें चालावें.

## गोरक्षणी तालुकासभा व तालुका कृषिसाहाय्यक पेढी.

( अ ) सर्व ग्रामसभांचें नियमन करण्याकरितां दरएक तालुक्याचे ठिकाणीं 'गोरक्षणी तालुकासभा' व 'तालुका कृषिसाहाय्यकपेढी' असावी

( आ ) या दोन्ही संस्थांचें व्यवस्थापकमंडळ वेगवेगळें असून दोन्हींचीं कामेंहि निरनिराळीं चालावीं.

( इ ) शेतकऱ्यांच्या गुरासंबंधींच्या अडचणी दूर करणें व गोरक्षण कार्याचा प्रसार करणें हीं कामें गोरक्षणी तालुकासभेनें करावीं आणि कृषि-साहाय्यक पेढीनें शेतकऱ्यास जरूरीच्या वेळीं द्रव्यसाहाय्य करावें.

( ई ) या दोन्हीं संस्थांचें काम करण्याकरितां तालुक्याच्या विस्ताराच्या मानानें जरूर लागतील तसे ( निदान ४ ते ७ ) प्रचारक असावेत.

## प्रचारकांचीं कामें.

( १ ) कीर्तन, पुराण, निरूपण इत्यादिद्वारां जनतेस गोरक्षणाची उपयुक्तता पटवून गोरक्षणाचा प्रसार करणें.

( २ ) गुरांची जोपासना, चाऱ्याची व्यवस्था, खत दूधदुभतें वगैरे बाबतींतील अर्वाचीन शोधांचा शेतकरीवर्गांत प्रसार करणें.

( ३ ) गांवोंगावीं गोरक्षणी ग्रामसभा स्थापून त्यांच्या द्वारानें शेतकरी-वर्गाच्या गुरासंबंधींच्या व सांपत्तिक अडचणी दूर करणें.

( ४ ) गांवोंगांवची भिक्षा करून त्यांपैकीं वैरण व धान्य गोरक्षणी तालुकासभेकडे देणें आणि द्रव्य पेढीकडे देणें.

( उ ) गोरक्षणी तालुकासभा व कृषिसाहाय्यकपेढी यांच्या द्रव्यनिधींत गोरक्षणी ग्रामसभेकडून येणाऱ्या देणग्या, स्थानिक मिळकत आणि गोरक्षणी जिल्हासभेकडून येणारी मदत यांचा समावेश व्हावा.

( ऊ ) गोरक्षणी तालुकासभा व तालुका कृषिसाहाय्यक पेढी यांनीं दरसाल आपल्या हद्दींतील सर्व गोरक्षणी ग्रामसभांच्या प्रतिनिधींची एक सभा तालुक्याच्या गांवीं भरवावी. या सभेंत वर्षभर झालेल्या कामाचा अहवाल वाचून दाखविणें, परस्परांच्या हितसंबंधाचा विचार करणें, पुढील सालच्या जमाखर्चा अंदाजपत्रकाची मंजुरी, अधिकाऱ्यांची निवडणूक इत्यादि कामें व्हावीं.

## ३ गोरक्षणी जिल्हासभा.

( अ ) सर्व गोरक्षणी तालुकासभांचें व पेढ्यांचें नियमन करण्याकरितां जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं ' गोरक्षणी जिल्हासभा ' असावी.

टीप जिल्ह्याचें गांव व त्याच्या जवळपासचा भाग याकरितां स्थानिक गोरक्षणी तालुकासभा व कृषिसाहाय्यक तालुकापेढी या संस्था जिल्हासभेशिवाय असाव्यातच.

( आ ) गोरक्षणी जिल्हासभेनें मुख्यतः तीन कामें हातीं घ्यावीं. (१) आपल्या हद्दींतील गोरक्षणी तालुका सभांवर देखरेख ठेवून त्यांना वळू, द्रव्य व प्रचारक वगैरेंची मदत करावी (२) कृषिसाहाय्यक पेढयांच्या व्यवस्थेवर व जमाखर्चावर पूर्ण देखरेख ठेवून त्यांना भांडवल पुरवावें. (३) जिल्हाभर असलेल्या संस्थांना तज्ज्ञ व अनुभवी प्रचारकांचा पुरवठा करण्याकरितां प्रत्येक गोरक्षणी जिल्हासभेनें एक गोपालविद्यालय ठेवावें आणि त्यांत धर्म, नीति, शेतकी, दूधदुभतें, मनुष्यांचे व गुरांचे औषधोपचार वगैरे गोष्टींचें शिक्षण देण्यांत यावें.

( इ ) आपल्या हद्दींतील गोरक्षणी सभांना व पेढयांना भांडवल पुरविण्याकरितां गोरक्षणी जिल्हासभेनें आपला द्रव्यनिधि पुढील मार्गांनीं जमवावा. (१) व्यापारी व इतर लोक यांजकडून निरनिराळ्या प्रसंगीं निघणारे धर्मादाय (२) सभासद, आश्रयदाते इत्यादिकांकडून आलेल्या वर्गण्या व देणग्या [illegible]

( ई ) वर्षअखेर सर्व तालुका संस्थांच्या प्रतिनिधींची जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं एक सभा बोलावून झालेल्या कामाचा अहवाल वाचून दाखविणें,

पुढील सालचे अधिकारी निवडणें, अंदाजपत्रक तयार करणें, तालुका व ग्रामसभांच्या अडचणींचा विचार करणें, इत्यादि काम व्हावीं.

## ४ गोरक्षणी प्रांतिक सभा.

( अ ) सर्व जिल्हासभांचें नियमन करणारी दरएक प्रांताची एकेक **'गोरक्षणी प्रांतिक सभा'** असावी.

**टीप**—प्रांताची विभागणी भाषावार व्हावी आणि जिल्हे देखील याच तत्वास अनुसरून आपल्या सोईनें ठरवावे.

( **आ** ) गोरक्षणी प्रांतिक सभेचें मुख्य काम गोरक्षणविषयक वाङ्मय प्रसिद्ध करणें हें होय. (१) सर्व प्रांतभर असलेल्या गोरक्षणी संस्थांचा परस्पर विचारविनिमय होण्याकरितां, इतर ठिकाणचे अनुभव आपल्या प्रांतातील लोकांना कळण्याकरितां आणि आपल्या प्रांतांत गोरक्षणाचा सर्वत्र प्रसार करण्याकरितां केवळ त्याच विषयास वाहिलेलें असें एखादें साप्ताहिक अगर मासिक वगैरे काढणें. (२) जरूरीप्रमाणें शेतकी, दूधदुभतें, खत, औषधोपचार वगैरे विषयांवर लहानमोठीं पुस्तकें प्रसिद्ध करणें. (३) आपल्या प्रांतांतील संस्थांकरितां नियमावली प्रसिद्ध करणें (४) जमाखर्चाचें वगैरे नमुने तयार करणें.

टीप—प्रांताचे शहरीं सुद्धां स्थानिक कार्य करण्याकरितां प्रांतिक सभेहून वेगळ्या संस्था असाव्या.

## ५ अखिल भारतीय गोरक्षणी महासभा.

( **अ** ) दर जिल्ह्यांतून निदान एकेक याप्रमाणें प्रत्येक गोरक्षणी प्रांतिक सभेमार्फत १५ ते २० पर्यंत प्रतिनिधी निवडले जावे व अशा सर्व प्रांतीय प्रतिनिधींची **अखिल भारतीय गोरक्षणी महासभा** असावी.

( आ ) या महासभेनें भरतखंडांतील यच्चयावत् गोरक्षणी सभांचें व कृषिसाहाय्यक पेढ्यांचें नियमन करावें.

( इ ) दरसाल कोणत्या तरी प्रमुख शहरीं अखिल भारतीय गोरक्षणी

परिषद भरवून वर्षभर झालेल्या कामाचें पर्यालोचन करावें आणि पुढील वर्षाच्या कार्याची दिशा सर्वानुमतें आंखून ठेवावी.

( इ ) गोरक्षणाच्या कार्यास सरकारची साहानुभूति व सहाय्य मिळवावें.

( उ ) दूधदुभतें, पैदास सुधारणें, जनावराची जोपासना, चाऱ्याची वाढ वगैरे बाबतींत इंग्लंड, जपान, अमेरिका आदिकरून देशांत जे उपयुक्त शोध लावले आहेत, त्यांचा आपल्या देशांतील लोकांस परिस्थित्यनुरूप कसा उपयोग करून घेतां येईल हें ठरविण्याकरितां तज्ज्ञ गृहस्थांचें एक मंडळ नेमावें.

( ऊ ) या तज्ज्ञ गृहस्थांच्या मंडळाकडून ज्या सूचना येतील त्या अमलांत आणण्याकरितां प्रांतिक व जिल्हासभेकडे पाठवाव्या.

## उपसंहार.

गोरक्षणाचें कार्य लोकोपयुक्त होऊन देशांतील आरोग्याची व शेतीची स्थिति सुधारावी या हेतूनें श्रीसमर्थांच्या व श्रीगोमातेच्या प्रेरणेनें जे उपाय योग्य दिसले आणि त्या उपायांची अमलबजावणी करण्याकरितां जी योजना सुचली ती वाचकांच्या पुढें मांडली आहे. वरील सर्व उपाय व योजना हें केवळ दिग्दर्शन आहे. त्यांत योग्य तो फेरफार कोणी सुचविल्यास आम्ही त्याचें अवश्य ग्रहण करूं. तरी भरतखंडांतील सर्व गोभक्तांनीं व विद्वान पुढाऱ्यांनीं या योजनेचा विचार करून यंदाच्या अखिल भारतीय गोरक्षणी परिषदेंत पुढील सालाकरितां कांहीं तरी प्रत्यक्ष व व्यापक कार्य करण्याचें मुक्रर करावें अशी आमची विनंति आहे. तसेंच अखिल भारतीय गोरक्षणी परिषदेनेंहि आपल्या उद्देश पत्रकांत प्रसिद्ध केल्याप्रमाणें शेतीची आणि शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे व दुभत्या व शेतकामाच्या जनावरांच्या रक्षणाचे बाबतींत प्रांतवार कांहीं तरी प्रत्यक्ष कार्य सुरू होईल अशी योजना यंदाच्या अधिवेशनांत निश्चित करावी, अशी सदर परिषदेच्या चालकांस आमची नम्र सूचना आहे.

खऱ्या गोरक्षणाविषयीं

# महात्मा गांधींचे विचार.

## गोरक्षण हें स्वराज्यवाद्यांचेंहि आद्यकर्तव्य होय.

गोध्रा येथें नुकत्याच ( नोव्हेंबर १९१७ मध्यें ) भरलेल्या गुर्जर प्रांतिक परिषदेंत महात्मा गांधी यांचें अध्यक्ष या नात्यानें फार महत्वाचें भाषण झालें. भारतवर्षाच्या उन्नत्यर्थ महात्माजींची कळकळ व खटपट किती आहे हें कांहीं निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं. या भाषणांत त्यांनीं राष्ट्राची परिस्थिति पूर्णपणें अवलोकन करून त्यास कोणता रोग झाला आहे याचें योग्य निदान ठरविलें, आणि रोगनिरसनार्थ आपण काय काय केलें पाहिजे हेंही सविस्तर सांगितलें. या योजनेप्रमाणें वागणें—तजवीज करणें हें आतां आपलें काम आहे. स्वराज्याची मीमांसा करितांना चालू व्यसनें व गोरक्षण यांचा उल्लेख करून महात्मा गांधी म्हणाले,

"शहरांतून दारूचें व्यसन वाढत चाललें आहे, इराण्यांच्या चहाच्या दुकानांची संख्या वाढत आहे, जुगार वाढत आहे; याला आपण उपाय केला नाहीं तर स्वराज्य कसें घेणार? स्वराज्य याचा अर्थच हा कीं, स्वतःचा कारभार स्वतः पहावयाचा. आपल्या मुलाबाळांच्या आणि आपल्या तोंडून दूध कायमचें जाण्याची वेळ आली आहे असें वाटतें. गुजराथेंत डेअऱ्यांनीं सत्यानाश मांडला आहे. सर्व दूध खरेदी करून त्याचें लोणी, पनीर वगैरे करून विकतात. ज्या लोकांचा मुख्य आधार दुधावर आहे, ते लोक आपल्या खाण्याच्या पदार्थांचा नाश कसा होऊं देतात? प्रजेच्या आरोग्याचा विचार न करितां पैशाच्या आशेनें लोकांच्या खाण्यापिण्याच्या वस्तूंचा अयोग्य व्यापार करण्याइतकें मनुष्यानें स्वार्थी कां बनावें? खरोखर दुधातुपासारख्या वस्तूंवर म्युनिसिपालट्यांनीं चांगलाच अंकुश ठेविला पाहिजे. मी नुकताच बकर-इ-इदच्या दंग्याच्या मुलखांतून येत आहे. कांहीं यःकश्चित् कारणामुळें दोन जातींत मारामारी होऊन तंटा विकोपास

गेला. त्यावर आपण कांहीं उपाय करूं शकलों नाहीं; सरकार करील त्यावरच आधार राखावा लागत आहे, यांत आपला पंगूपणा दिसून येतो. गोरक्षणाचा प्रश्न लहान सहान नाहीं. असें असून आपण त्याचा हवाला नामधारी गोरक्षणसभांवर सोंपविला आहे. हें गोरक्षणाचें कार्य प्राचीन काळापासूनचें आहे. देशाच्या गरजा भागविण्याकरितां त्याची उत्पत्ति झाली आहे. जेथें शेंकडा ९० लोक शेतीवर निर्वाह करितात आणि शेतीकरितां बैलाची जरूरी पडते, तेथें गाईचें रक्षण हें प्रमुख कर्तव्यच होऊन बसतें. अशा ठिकाणीं मांसाहारी देखील गाय मारणार नाहीं. गाईचें रक्षण करण्याला हीं स्वाभाविक कारणेंच पुरीं आहेत, पण इकडील स्थिति कांहीं विचित्रच आहे. मुसलमान बंधूंच्या हातांत खाण्यासाठीं गाय जाऊं द्यायची नाहीं, हाच येथें गोरक्षणाचा अर्थ दिसतो. राज्यकर्त्यांना गोमांसाची जरूर लागते, त्यासाठीं हजारों गाईंचा नित्यशः वध होत असतो, त्याविषयीं आपण कांहींच करीत नाहीं. कलकत्त्यांत हिंदुलोकच 'फुंकर' घालण्याची अघोर क्रिया करून गाईचें सर्व दूध हमेशा हरण करून घेतात. गुजराथेंत बैलांना हाकण्याकरितां हिंदूलोक अणकुचीदार काठ्या वापरतात, त्यांच्या-बद्दल आम्ही चकार शब्द काढीत नाहीं. आपल्या शहरांतील बैलांची स्थिति कींव करण्यासारखी दृष्टीस पडते. गाय आणि तिचा वंश यांचें रक्षण करणें हा मोठा व्यापक प्रश्न आहे. त्या प्रश्नास मुसलमानांशीं झगडा करण्याचें संकुचित स्वरूप देऊन गोवध मात्र आम्हींच वाढविला आहे. गाईचा जीव वांचविण्यासाठीं मुसलमानबंधूंचा वध करणें हा धर्म तर नव्हेच, पण अधर्म असण्याचा संभव आहे. मला वाटतें कीं, आपल्या मुसलमानबंधूंची जर आपण प्रेमानें समजूत घातली तर हिंदुस्थानची स्थिति लक्षांत घेऊन गोरक्षण करण्यास तेहि तयार होतील. त्यांना विनंति करून त्यांच्याशीं सत्याग्रह करून गोरक्षणाच्या बाबतींत त्यांची प्रवृत्ति आपण बदलूं शकूं; पण याकरितां या प्रश्नाचें खरें स्वरूप आपणांस समजलें पाहिजे, आपल्या भावाला मारण्याऐवजीं आपण स्वतः मरण्यास तयार झालें पाहिजे. परंतु आपली इतकी तयारी होण्यास गाईची खरी

किंमत आपल्या लक्षांत येऊन आपल्या अंतःकरणांत शुद्ध दयेची स्फूर्ति उत्पन्न झाली पाहिजे. ह्या एका कामांत दुसरीं पुष्कळ कामें होऊन जातील. हिंदु व मुसलमान यांमधील तेढ दूर होईल, गाईचें रक्षण होईल, दूधतूप निर्भळ व स्वस्त मिळेल आणि आपले बैल दुनयेनें पाहात राहावें असे होतील. आपली तपश्चर्या शुद्ध असेल तर आपण गाईचा वध इंग्रज, मुसलमान, किंवा हिंदू यांपैकीं कोणाच्याहि हातून होऊं देणार नाहीं. हें एक ( गोरक्षणाचें ) कार्यच स्वराज्यास जवळ आणणारें आहे."

एकटी स्वराज्याची चळवळ केली आणि त्या ध्येयाप्रीत्यर्थ शक्य ते सर्व प्रयत्न केले कीं त्यांत सर्वांचा समावेश होतो, गोरक्षणासारख्या चळवळीकरितां निराळे श्रम करण्याचें कारण नाहीं, असें कांहीं स्वराज्य वाद्यांचें मत असलेलें कळतें. परंतु महात्मा गांधीसारखे प्रमुख स्वराज्यवादी असें म्हणतात कीं, "गोरक्षण हें एक कार्यच स्वराज्यास जवळ आणणारें आहे." जेथें शेंकडा ९० लोक शेतीवर निर्वाह करितात आणि शेतीकरितां बैलांची जरूरी पडते तेथें गाईचें रक्षण करणें प्रमुख कर्तव्यच होऊन बसतें,—गाय आणि तिचा वंश यांचें रक्षण करणें हा मोठा व्यापक प्रश्न आहे." बंगाल्यांत जसे बाबु सुरेंद्रनाथ बानर्जी, मद्रासेकडे जसे ना. शास्त्री व सर सुब्रम्हण्य आयर, महाराष्ट्रांत जसे लो० टिळक व बॅ. जिना, संयुक्त प्रांतांत ना. पंडित मदनमोहन मालवीय व ना. चिंतामणी, त्याचप्रमाणें गुजराथेंत—इतकेंच नव्हे तर सर्व हिंदुस्थानांत—महात्मा गांधी हेहि एक कट्टे स्वराज्यवादी आहेत. त्यांचे उद्गार नेहमीं पूर्णमननानें पक्के बनविलेले व अनुभवानें ठाम ठरविलेले असे असतात आणि ते उद्गार खरे करण्याकरितां वाटेल ती झीज सोसावी लागली तरी त्यांची त्यास केव्हांहि तयारी असते हें सर्वांना माहीतच आहे. यावरून गुर्जरप्रांतिकपरिषदेचे अध्यक्ष या नात्यानें बोलतांना 'गोरक्षण' विषयासंबंधीं त्यांनीं जे आपले विचार प्रदर्शित केले आहेत, ते केवळ भाविकपणाचे किंवा सहजगत्या आलेले नसून अगदीं यथार्थ व मुद्देसूद आहेत असेंच कोणाही विचारी मनुष्यास कबूल करावें लागेल. म्हणून सर्व स्वराज्यवाद्यांस

आमची सविनय विनंति अशी आहे कीं, महात्माजींचे गोरक्षणाविषयींचे प्रिय व कळकळीचे बोल लक्षांत घेऊन त्यांनीं आपल्या कार्याबरोबरच गोरक्षणाचें पवित्र कार्यहि हातीं घ्यावें आणि त्याच्या प्रसारार्थ व सिद्धयर्थ शक्य तो सर्व प्रयत्न करावा.

## मुसलमान बंधूंस गोरक्षणाची आवश्यकता.

१ मिसरो फल्अतज अल्‌ बुनून कुम मकाबरल हयूवानात्‌ ।

'तूं पशुपक्ष्यांची कबर तुझ्या पोटांत करूं नकोस,' अर्थात्‌ पशुपक्ष्यांना तूं मारून खाऊं नकोस, असें पैगंबर हजरत अली साहेबांचें वचन आहे. याच अर्थाचा फारशीवेस्त फरमानाही आहे.

२ नसा इनी मकामे शिक परा तुगूर ।
जेबे हरे बहामय जेबे हरे तुयूर ।

गाई इत्यादि चतुष्पाद जनावरें हीं खाण्याकरितां नाहींत. दूध, ओझीं वहाणें इत्यादि कामांकरितां आहेत अशी खुद्द कुराणाची आज्ञा आहे.

३ लैयना लल्ला हो लहु मोहावला दमाऊ हावला कीयना लहुत कवामिन् कुम्‌ । –सुरतुल्‌ हज्ज आयत ३७.

'परमेश्वरापावेतों ह्यांचें (बळी दिलेल्या जिवांचें) मांस किंवा रक्त पोंचत नाहीं, तर तुमची प्रार्थना पोंचते असें पवित्र कुराणांतील हज्ज ( मक्केच्या महायात्रेसंबंधीं करावा लागणारा विधी ) च्या अध्यायांत स्पष्टपण म्हटलें आहे. त्याचप्रमाणें ''सुरतुल अन् आम'' आयत १४२ मध्यें अल्लातालानें सांगितलें आहे कीं,

**४ वमिनल अन् आमे हमूल तबवफर्शा कुलू मिम्मा रजक कुमुल्ला हो।**

चतुष्पाद जनावरांतील कित्यक (बैल, घोडे, रेडे इ.) ओझीं वाहण्याकरितां उत्पन्न केलीं आहेत. आणि जमिनींत पैदा होणाऱ्या वनस्पती व धान्यें ( तुम्हांला ) खाण्याकरितां उत्पन्न केलीं आहेत, तीं तुम्ही खा. ( जनावरें खाऊं नका. ) काय खाऊं नये याचाही स्पष्ट खुलासा कुराणांत सुरतुल माइदमध्यें केला आहे.

" रक्त व डुकराचें मांस, स्वाभाविक मृत्यूनें मेलेल्याचें मांस, कोण मूर्तीकरितां मारण्यांत आलेल्याचें मास, पडून मेलेल्याचें मांस, गळफास देऊन मारलेल्याचें मांस, दुसऱ्या प्राण्यामुळ मेलेल्याचें मांस व घाव करून मारलेल्याचें मांस, " हीं तुम्ही खाऊं नका.

त्याचप्रमाणें " मक्केमध्यें अगर त्याचे आसपासचे हद्दींत कोणीही जनावर मारूं नये आणि कोणी चुकीनें मारील तर त्याबद्दल स्वतः पाळलेलें जनावर सोडून द्यावें अथवा दोन शहाणीं माणसें जी किंमत ठरवितील तितकें खाणें गरिबांस घालावें. " असेंहि कुराणांत ह्यटलें आहे. तसेंच कुराणाच्या सुरतुलमाइद नांवाच्या अध्यायांत ह्मटलें आहे कीं, जेव्हां तुम्ही एहराम ( हज्जचीं वस्त्रें ) धारण कराल तेव्हां तुम्हीं शिकार शास्त्रविहित समजूं नये. याप्रमाणें मक्केंत किंवा आसपास शिकारीची तर मनाई आहेच; पण "झाड, पान, फूल, गवत वगैरे कापणें, तोडणें व ओरबडणें यांचीसुद्धां मनाई आहे. ज्यानें हज्जचीं वस्त्रें परिधान केलीं आहेत त्यानें तर ऊसुद्धां मारतां कामा नये. नख व केंस हीं देखील त्यानें काढावयाचीं नाहींत !"*

---

* टीप—पवित्र कुराणाचें मराठी भाषांतर पान ७८–८० वरील टीप

आम्हां हिंदू लोकांस जसे वेद त्याप्रमाणें मुसलमान लोकांस परम पूज्य व पवित्र असें जें कुराण त्यांत वरीलप्रमाणें ठिकठिकाणीं अहिंसेचीं वचनें मिळतात.

बकर--इ--इदीच्या दिवशीं मुसलमानांत हल्लीं गोवध होत असतो. पण ह्याची मूळ कथा फार वेगळी आहे. ती अशी—इब्राहिम पैगंबर ज्या वेळीं प्रभूची भक्ति करूं लागला त्या वेळीं त्याचा भाव—इमान किती आहे हें पहावें ह्मणून त्याच्या इमानाची परीक्षा करण्याकरितां अल्लानें त्यास सांगितलें कीं, ' बाबा तुला आवडत्यांत आवडती अशी वस्तू तूं मला अर्पण कर व त्या प्रिय वस्तूचा मला भोग दे, ' तेव्हां इब्राहिमानें आपणांस अत्यंत आवडता असा आपला ईस्मायल नांवाचा पुत्र प्रभूस भोग देण्यास तयार केला. पुत्राचा आपण आपल्या हातानें वध करावयाचा; तेव्हां न जाणो काय परिणाम होईल म्हणून त्यानें आपले डोळे बांधले. नंतर प्रभूकरितां पुत्रास मारण्यास धांवला. इतक्यांत प्रभूच्या सहज लीलेनें त्या ठिकाणीं बकरें येऊन उभें राहिलें, झालें. इब्राहीमच्या हातून बकरें कापलें गेलें व मुलगा वांचला. अल्लानें त्या बकऱ्यालाहि सजीव केलें. याप्रमाणें बकर—इ ईदची मूळ कथा आहे. या कथेवरून पैगंबर साहेबाच्या इमानाची परीक्षा पहाण्याकरितां अल्लानें हा प्रयत्न केला होता आणि बकऱ्याचा कांहीं भोग मागितला नव्हता. हें सहज समजून येईल.

या सणांत जनावर बळी देण्याचे वेळीं जो मंत्र म्हटला जातो. यांत गाईचें नांव कोठेंहि नाहीं; तो मंत्र असा "**नवितोअन् अरबाराकोतन् दुष्मन् हलालन् तैय्यबन् सुन्नतन् खैरूल इभ्राईल बिस्मिल्लाह अल्लाह अकबर.** " या मंत्रांत दुम्मा नावाची मेंढाराची एक जात आहे तिचा उल्लेख आहे. आम्हांला वाटतें या मंत्रानें हिंसाविषयीं ' संकोच ' केला असावा. कारण सनातन धर्मांतही मद्य-मांस-मैथुन यांविषयीं असाच संकोच सांगितल्याचें श्रीमद्भागवतावरून दिसून येतें. नाहीं तर दुम्मा म्हणून जर कोणत्या तरी पशूवर आपत्ति यावयाची, तर ती प्राणी ह्मणून मनुष्यावरहि येण्याचा संभव आहे. बकर—इ—ईदच्या कथेंतील मूळ तत्व बाजूस राहून परंपरेनें शेळ्या, उंट, गाई वगैरे प्राणी बळी

देण्याचा प्रघात पडला असावा. प्रत्येक धर्मातील आचारांत याप्रमाणें थोडाबहुत विपर्यास होतोच; असो.

याप्रमाणें धर्मग्रंथांच्या आज्ञा आहेत आणि त्यांस अनुसरूनच जाणत्या लोकाचें वागणें असतें. १९१३ सालीं बंगाल्यांत महापुरानें हजारों गुरांची प्राणहानी झाली; त्या वेळीं मुसलमान पुढारी व बंगाल मास्लेम लीग यांना अनुलक्षून मि.ए. रहिम यांनीं एक विनंतिपत्र प्रसिद्ध केलें होतें.त्यांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, "कुरबानी(बकर-इ-ईदच्या)सणांत मुसलमानांनीं गोहत्या करूं नये. त्यायोगें एका दगडानें दोन पक्षी मारल्यासारखें होईल; लोकांस गुरांची टंचाई पडणार नाहीं आणि उभयजातींत सलोखा उत्पन्न होईल." दुसरे सुप्रसिद्ध पुढारी ना. मझरूळ हक्क म्हणतात, "सर्व देशभर गोवध बंद झाला पाहिजे हें मत मला सर्वस्वीं मान्य आहे. गोवध करण्याचें सोडून देऊन मुसलमान हिंदूंचे खरेखुरे बंधु होतील असें करण्याचा मी शक्य तितका प्रयत्न करीन." चिन्नापट्टण ( इ ऊर्फ मद्रास ) येथील गोशाळेचे अध्यक्ष मौलवी मूर्तिझा साहेब या नांवाचे मुसलमान सद्गृहस्थ आहेत. तसेंच सन १८९२ च्या जानेवारींत शिवणी ( नागपूर प्रांत ) येथील गोरक्षक सभेचा ब्र. स्वामी आलाराम यांनीं जिर्णोद्धार केला; त्या वेळीं मुख्य सभापतीच्या स्थानीं तेथील एक बडे मुसलमान गृहस्थ जनाब खां साहेब महंमद मूर्तीझा खां मालगुजार यांची योजना झाली होती. १९१३ सालीं कानपूर येथें गोपाष्टमीचे उत्सावा-प्रीत्यर्थ सहानुभूति दाखविण्याकरितां हिंदूंप्रमाणें मुसलमान लोकांनीं ही दुकानें बंद केलीं होतीं. या गोरक्षणाच्या लोकोपयोगी बाबींत हिंदुस्थानचे रहिवासी या नात्यानें हिंदी मुसलमान बांधवांनीं वरीलप्रमाणें अनेकदां अनु-कूलता दर्शविली, ही विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे असें नाहीं. पण यार्कंद ( तुर्कस्थान ) येथें मुसलमानांचीच वस्ति जास्त असून व सत्ताहि सर्व मुसलमानांचीच असून तेथें हिंदूंची वस्ति ज्या मोहल्यांत आहे त्या मोहल्यांत गोवध करण्यांत येऊं नये अशी तेथील सरकारानें द्वाही फिरविली हें ऐकून कोणासही आश्चर्य वाटेल. पण यांत आश्चर्य कसलें ? व्यावहारिक नफानुकसानीचा निःपक्षपातीपणानें विचार केला तर कोणीहि

समंजस गृहस्थ–मग तो कोणत्याही जातीचा असो–गोरक्षणाविषयीं असेंच अनुकूल मत देईल. १९०७ च्या फेब्रुवारी महिन्यांत अफगाणिस्तानचे अमीर हबीबउल्ला खान यांची स्वारी हिंदुस्थानांत आली होती. त्या वेळीं त्यांनीं आपल्या खाजगी व सार्वजनिक भाषणांतून जो बहुमाल उपदेश केला तो दोन्ही जातींच्या लोकांनीं सदैव ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ह्मणून या ठिकाणीं त्याचा थोडक्यांत सारांश दिला आहे:—

"धार्मिक प्रसंगामुळें हिंदु व मुसलमान यांनीं एकमेकाच्या उरावर बसण्याचे दिवस आतां उरले नाहींत; एकमेकांचा अपमान करून कोणतें शतकृत्य हिंदूंना किंवा मुसलमानांना हिंदुस्थानांत करावयाचें आहे? गाय मारण्यांतच मुसलमानांचा सर्व धर्म आहे किंवा एखाद्या विशेष सणाचे वेळीं गाय मारलीच पाहिजे अशी मुसलमानी धर्माची आज्ञा आहे अशांतला मुळींच प्रकार नाही. हिंदू लोकांना गाय मारली असतां आपला धर्म बुडाला असें ज्याप्रमाणें वाटतें त्याप्रमाणें मुसलमानी धर्मांत गोवधाचा निषेध नाहीं एवढाच काय तो फरक. गोवधाचा निषेध नसला तरी गोवध केलाच पाहिजे अशी आज्ञाही नाहीं. तेव्हां ज्या बारीकसारीक गोष्टी धर्माचीं प्रधान अंगें नाहींत, ज्या केल्याच पाहिजेत, न केल्या तर धर्म बुडतो अशी धर्माज्ञा नाहीं, त्या केल्यानें जर हिंदु नाखुष होत असले व त्यांचीं मनें दुखत असलीं, तर त्या करण्याबद्दल आपण विनाकारण हट्ट कां धरावा?" (केसरी) अमीर साहेबांचे हे उद्गार केवळ ओठांतलेच नसून प्रत्यक्ष कृतींतले होते, हें त्यांनीं दिल्लीस बकर–इ–ईदीच्या वेळीं गोवध होऊं दिला नाहीं या सुप्रसिद्ध गोष्टीवरून उघड आहे. ठिकठिकाणच्या गोशाळा पांजरापोळचे अहवाल पाहिले तर त्यांतही मुसलमान बंधूंचीं नांवें साह्यकर्त्यांच्या यादींत सांपडतात.

एकंदरींत, मुसलमानांचे धर्मग्रंथ आणि त्यांचे पुढारी लोक यांचा गोरक्षणास विरोध नाहीं. म्हणून आमच्या सर्व मुसलमान बांधवांनीं या गोरक्षणाच्या कार्यास महानुभूति दाखवावी अशी आमची विनंति आहे. दुभत्या, विणाऱ्या व शेतकामाच्या जनावरांच्या निष्प्रतिबंध संहारामुळें शेतीवर व दूधदुभत्याचे पुरवठ्यावर होणारे दुष्परिणाम हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती,

पारशी वगैरे सर्व जातींस सारखेंच भोगावे लागत आहेत. शुद्ध गोदुग्धाचा भरपूर पुरवठा नमल्यामुळें सर्वच जातींचीं हजारों मुलें अकालीं मृत्युमुखीं जात आहेत. अशा प्रकारें गोरक्षणावर सर्वांचेंच जीवन अवलंबून असल्यामुळें आमच्या हिंदी-मुसलमान बांधवांनीं आपल्या पवित्र धर्मग्रंथांतील आज्ञांचें व सूज्ञ पुढाऱ्यांचें अनुकरण करून देशांतील गोरक्षणास यथाशक्ति हातभार लावावा अशी पुनः एकदां विनंति करून हा लेख संपवितों.

### ख्रिस्ती बांधवांसहि

## गोरक्षणाची आवश्यकता

Thou shalt not kill; and who-so-ever shall kill, shall be in danger of the judgment.— St. Mathew 5-21 New Testa-ment.

'ठार मारूं (हिंसा करूं) नकोस व जो कोणी हिंसा करील त्याला त्याबद्दल शिक्षा भोगावी लागेल. २१—सेंट मॅथ्यू अ. ५

सत्तत्त्वें हीं कोठेंहि गेलें तरी सारखींच आढळतात, या न्यायानें श्री सनातन धर्मांत हिंसा जशी त्याज्य मानिली आहे, तसेंच मुसलमानी धर्मग्रंथांतहि तिचा स्वीकार केल्याचें विशेषसें दिसून येत नाहीं, हें मागील

लेखावरून कळून येईल. लोकसंख्येच्या मानानें प्रमुख असलेल्या जगांतल्या चार धर्मापैकी बौद्ध धर्म तर सर्वस्वी अहिंसा-प्रधानच आहे. राहतां राहिला ख्रिस्ती धर्म. त्याविषयीं आतां विचार करावयाचा आहे. वरील वचन येशु ख्रिस्ताच्या तोंडचे आहे. त्यांत ' हिंसा करूं नकोस. केल्यास तिचें प्रायश्चित्त मिळेल.' अशी स्पष्ट आज्ञा आहे. वेदाज्ञा जशी हिंदूंना शिरसा-वंद्य, कुराण जसें मुसलमानांस पवित्र व प्रियतम, तसेंच बायबल ख्रिस्त भक्तांस आहे. त्यांतच वरील हिंसानिषेधपर वचन आहे. हिंसा बंद केल्या-नंतर आम्हीं खावें काय असा कोणी मांसाहारी प्रश्न करील तर त्यास पवित्र बायबल सांगतें कीं,—

26 And God said, Behold, I have given you every herb bearing seed; which is upon the face of all the earth; and every tree, in which is the fruit of a tree yielding seed; to you it shall bee for meat.

30 And to every beast of the earth, and to every fowl of the air; and to every thing that creepeth upon the earth where-in there is life, I have given every green herbe for meat.

Genesis I, Old Testament—

भावार्थ—परमेश्वर म्हणाला—'पहा सर्व पृथ्वीच्या पाठीवरील बी धारण करणारी प्रत्येक वनस्पति व सबीज फळ धारण करणारा प्रत्येक वृक्ष मीं तुम्हांस दिला आहे, तो तुम्हांस मांसाचेऐवजीं होईल ( खाण्याकारितां उप-योगी पडेल ). पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक पशु-पक्षी आणि प्रत्येक जीवमान वस्तु यांना मांसाऐवजीं ( खाण्याकारितां ) मीं वनस्पति दिली आहे.

ख्रिस्ती धर्मग्रंथांत याप्रमाणें अहिंसेबद्दल सामान्यतः वचनें असून गोरक्ष-णाबद्दलही त्यांची अनुकूलता आहे. याबद्दल 'बाम्बे क्रानिकलपत्रांत १९१४ सालीं पुढील मजकूर प्रसिद्ध झाला होता.'

' ख्रिस्ताचा जन्म ज्या दिवशीं झाला त्याविषयीं कांहीं समजुती अशा

आहेत कीं, सदरहू दिवशीं प्राणीवर्ग आणि पक्षी यांच्यावर एक प्रकारचा परिणाम होऊन त्यांना वाचा फुटत असते. येशु ख्रिस्ताच्या जन्माच्या पुष्कळ तसबिरांमध्यें त्यांच्याभोंवतीं गुरें, ढोरें आणि हरिण मध्यरात्रीं गुडघे टेकीत असतात, असा देखावा दाखविलला असतो.

To this day the Spanish are specially kind to their cows for they aver that when Christ was born the cows breathed on the Holy Child to supply wormth.

म्हणजे ख्रिस्ताच्या जन्म दिवशीं स्पेन देशांतील लोक आपल्या गाईस विशेष प्रेम नें वागवितात, कारण ते असा आधार दाखवितात कीं जेव्हां येशु ख्रिस्ताचा जन्म झाला तेव्हां त्याच्या अंगांत उष्णता उत्पन्न करण्याकरितां त्या पवित्र बालकाला गाईनें हुंगलें होतें.

थोर महात्म्यांच्या चरित्रांत एक गोष्ट विशेष रीतीनें लक्षांत येते कीं उन्नति-मार्ग आक्रमित असतां त्यांचा गाईशीं कांहीं तरी संबंध आलेला असतो. येशुख्रिस्ताच्या अंगांत धर्मचैतन्याची उष्णता उत्पन्न करून पृथ्वीचें पश्चिम गोलार्ध हलवून सोडण्यास ज्याप्रमाणें गाय कारण झाली, त्याच प्रमाणें पूर्व गोलार्धांत ही सर्व जगांतील तत्त्वज्ञानाचें मूल अशी श्रीमत् भगवद्गीता प्रगट करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णाच्या महोदयास देखील गायच कारण झाली. असें ह्मणण्याचें धाडस आम्ही आपल्या कल्पनेनें करितों असें नाहीं; तर खुद्द भगवान श्रीकृष्णच नाथमुखानें सांगतात, कीं—

गायींचे सेवें झाली पुष्टी । बाळपणीं मारिले जेठी ॥
कंस चाणूर मारिले हटीं । बैसविला राज्यपटीं उग्रसेन ॥१॥
गायींचे सेवेची अती गोडी । तेणें माझी कीर्ती झाली चोखडी ।
फोडिली कंसाची बांदोडी । तोडिली बेडी पितरांची ॥ २ ॥

ईश्वरी अवतार देखील याप्रमाणें गोरक्षणाची व गोसेवनाची अवश्य-कता सिद्ध करितात. तेव्हां तदनुयायांनीं गोरक्षण केलें पाहिजे हें काय निराळेंच सांगावयास पाहिजे?

पाश्चात्य देशांत मांसाकरितां गाईला मारीत नाहींत; त्या कामीं बैलांचा उपयोग करितात. कारण तिकडे शेतकामाला बैलांचे ऐवजीं घोडे उपयोगी पडतात. यामुळें त्या देशांत गोवधाला सहजच आळा पडल्यानें त्यांना सध्यांची स्पृहणीय स्थिति प्राप्त झाली आहे. गोरक्षणाकरितां झटणारे लोक लक्ष्मीच्या कृपाकटाक्षास पात्र होतात, असा अर्वाचीन व प्राचीन इतिहासाचा पुरावा आहे. एकट्या स्वित्झर्लंड देशांत इतक्या गाई आहेत कीं, तेथील लोक गोदुग्धाच्या व्यापारावर कोट्याधीश बनले असून, त्या देशांतील दूध सगळ्या जगाला पुरविलें जात आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, स्पेन, आदीकरून पाश्चात्य राष्ट्रें गाईची योग्य प्रकारें जोपासना करून, आपआपली उन्नति करून घेत आहेत. त्या देशांतील लोक आपल्या मुलांना लहानपणापासून गाईचें दूध मनमुराद पाजितात. त्यायोगें त्यांची प्रकृति सुदृढ व निकोप होऊन तीं दीर्घायुषी निपजतात. तात्पर्य धर्मदृष्टीनें–व्यवहार दृष्टीनें ख्रिस्ती लोकांचा गोरक्षणाशीं विरोध आहे असें नाहीं. तेव्हां हिंदुस्थानांतील ख्रिस्त धर्मीयांनीं सर्व लोकांच्या जीवनास आधारभूत अशा गाई बैलांच्या रक्षणार्थ हिंदू लोकांना सहानुभूति दाखवावी अशी आमची विनंति आहे.

# श्री चौंडे महाराज व गोरक्षण.

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाशा निवारूनी ॥ १ ॥ विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे धन जन मातापिता ॥ २ ॥ निर्वाणी गोविंद असे मागें पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्य कर्मा व्हावें साह्य । घातलिया भय नरका जाणें ॥ ४ ॥

**श्री तुकाराम** महाराजांनीं वरील अंभगांत भक्तांचीं लक्षणें सांगितल्याप्रमाणें श्री **चौंडे महाराज** यांचा जीवनक्रमहि जवळ जवळ त्याचप्रमाणें झालेला आहे. देवाचें मूळचें स्वरूप एकच आहे, तथापि प्रत्येक भक्त आपापल्या आवडीनें व प्रेरणेनें देवाच्या निरनिराळ्या रूपांची उपासना करतो. श्री तुकारायांचें उपास्य दैवत श्री विठ्ठल असल्यामुळें आणि विठ्ठल व नारायण हे एक स्वरूपीच असल्यानें त्यांनीं भक्तांचा विषय नारायण (देव) असें दाखविलें आहे. त्याप्रमाणें श्री चौंडे महाराजांचें उपास्य दैवत जरी श्रीराम आहे, तथापि नित्याच्या व्यवहारांतील उपास्य म्हणजे **श्री गोमाताच** झाली आहे, याकरितांच या लेखाचा मथळा "श्री चौंडे महाराज व गोरक्षण" असा घातला आहे. अंगीकृत विषयाशीं म्हणजे गोरक्षणाशीं श्री चौंडे महाराजांचें इतकें तादात्म्य झालें आहे कीं आज चौंडे महाराज म्हणजे गोरक्षण व गोरक्षण म्हणजे चौंडे महाराज अशी स्थिति झाली आहे. असें असल्यामुळें गोरक्षणाकरितां ज्यांनीं देह वाहिलेला आहे व जिवांत जीव असेपर्यंत हेंच कार्य करावयाचें असा ज्यांचा दृढनिश्चय आहे अशा त्या सत्पुरुषाच्या चरित्राची थोडिशी माहिती या पुस्तकांत दिली असतां बिलकूल अप्रासंगिक होणार नाहीं.

**पूर्वजांचा वृत्तांत**

श्री महाराजांचे पणजोबा राघोपंत चौंडे हे वाई येथें श्रीमंत सरदार रास्ते यांचे दरबारीं दिवाण होते. ते अत्यंत स्वधर्मनिष्ठ असून त्यांचें नीतिधैर्य तर अलोट होतें. श्री० रास्ते यांनीं त्यांची परिक्षा पहाण्याकरितां आपल्या नाटकशाळेंत बरोबर सहज म्हणून नेलें व तेथें त्यांस एकटेच सोडून दरवाजा बाहेरून बंद करून घेतला. आंतील नृत्यगायनांत गर्क असलेल्या वारांगनांचा घोळका पहातां क्षणींच राघोपंत बेशुद्ध पडले ! इतका त्यांना अनीतीच्या मार्गाचा व शृंगाराचा तिटकारा होता; हें पहातांच आंतील स्त्रिया घाबरल्या व दरवाजा उघडण्याविषयीं ओरड करून बाहेरच्या मंडळीस त्यांनीं आंत घेतलें,व नंतर मंडळींनीं राघोपंतास घरीं पोचतें केलें. हा झालेला प्रकार लक्षांत आणून दुसरे दिवशीं राघोपंतांनीं श्री० रास्ते यांच्या दिवाणगिरीस रामराम ठोकला आणि सराफीचा स्वतंत्र धंदा सुरू केला. श्री०बाळा-

साहेब रास्ते हे यांची योग्यता पूर्ण ओळखून असल्यामुळें ते राजीनामा स्वीकारीनात; पण राघोपंत पूर्ण निश्चयी असल्यामुळं त्यांनीं रास्त्यांची नोकरी पुनः पतकरली नाहीं. श्री० रास्ते यांनीं राघोपंतांची झालेली उत्कृष्ट कामगिरी लक्षांत घेऊन व त्यांच्या करारीपणास जणुं बक्षिस म्हणून त्यांना रहाण्यास एक उत्तम वाडा बांधून दिला. राघोपंतांचे चिरंजीव रा. त्रिंबकराव ऊर्फ तात्याबा ह्यांचें सर्व लक्ष परमार्थात असे. त्रिकाळ पांडुरंगाचें भजन आणि आळंदी–पंढरीची वारी यांतच त्यांचें सर्व आयुष्य गेलें. त्यांच्या प्रपंचाचा भार त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव वे. शा. सं० मार्तंडशास्त्री यांचेवर सर्वस्वीं सोंपविला गेला होता म्हणज व्यवाहारिक गोष्टींचा व्याप तात्याबांनीं आपल्या मागें फारसा लावूनच घेतला नव्हता. वे. शा. सं० मार्तंडशास्त्री हे सबंध महाराष्ट्रांतील जाड्या संस्कृत विद्वानांत गणले जात असून वक्ते या नात्यानेंहि ते फार प्रसिद्ध असत. श्रीमद्भारतभागवत यांवर पुराण सागण्यांत ते निष्णात होते. ते कीर्तनहि करीत असत. शिवाय यांच्या घराण्यांतील बऱ्याच मंडळीस गायन वादन व इतर औद्योगिक कला उत्तम प्रकारें अवगत असत. मृदंग वादनपटु प्रसिद्ध नानासाहेब पानसे हे राघोपंतांचे बंधु अंतोबा चौंडे यांचे जवळ वाजविण्यास शिकले. मार्तंडशास्त्री यांचे धाकटे बंधू मोरोपंत ऊर्फ आण्णुकाका हे अत्यंत भगवद्भक्त होते. त्यांचेंहि वादनकौशल्य महाराष्ट्रात सुप्रसिद्ध होतें. वाईनजीक असलेल्या श्रीभद्रेश्वर देवस्थानाच्या जिर्णोद्धाराच्या कामीं त्यांनीं आपली बहुतेक सर्व संपत्ति खर्च केली. एकंदरींत या घराण्यांतील पुरुषांमध्यें भगवद्भक्ति, वक्तृत्व, कीर्तन, भजन आदिकरून अध्यात्मिक गुणांचें विशेष प्राधान्य असून गायनवादनादि कलाहि बहुतेकांना अवगत होत्या.

वे. शा. सं० मार्डतशास्त्री यांचे चिरंजीव श्री चौंडे महाराज यांचे आंगी पूर्वजांचे वरील सर्वच गुण पूर्णपणें उतरून उत्तरोत्तर विकास पावत चालले आहेत हें त्यांच्या पुढें दिलेल्या चरित्रावरून सहज कळण्यासारखें आहे.

आपल्या चरित्रनायकाचा जन्म शके १७९८ माघ कृ० २ ( ता० १ फेब्रुवारी सन १८७७ ) बुधवारीं वाई येथें झाला. त्याचें टिपण पुण्याचे

प्रसिद्ध ज्योतिषि व ज्योतिषसंमेलनाचे चिटणीस पं० रघुनाथ शास्त्री ज्योतिषि यांनीं मुद्दाम तयार करून आम्हांकडे पाठविलें तें येणें प्रमाणें—




" या कुंडलींत जन्मकाळीं जे ग्रहांचे योग झालेले आहेत त्यांत विशेष महत्वाचे आणि जनतेच्या फायद्याचे असे दोन योग आहेत. जन्मलग्नीं गुरुशुक्रयोग हा गोमातेची सेवा घडविणारा व त्याकरितांच देह झिजविणारा आहे. त्याचप्रमाणें हें कार्य अखंड चालू राहून त्यांमध्यें पूर्णपणें यश येणें व सर्व धर्मांतील लोकांचें साहाय्य मिळून गोरक्षण आणि गोवर्धन हीं कार्यें जोमानें चालणें या सर्व गोष्टींना हितकर असे पराक्रमस्थानीं शनी व राहू हे बलिष्ठ आहेत. शनीचा योग असा आहे कीं, तो कार्यांत यश देईल आणि धनाढ्य लोकांकडून गोरक्षणास मदत मिळवील; धनस्थानीं रवि-बुध यांचा योग देखील या कार्यास राजानुकूलता दर्शविणारा आहे. एवंच अखंड जनतेला तर या कार्याविषयीं अभिमान वाटेलच; परंतु राजेरजवाडेहि गोमातेच्या रक्षणास धांवतील. सन १९१८।१९२०।१९२१ हीं वर्षें म्हणजे या पुरुषाच्या कार्यास उत्तमांत उत्तम आहेत. " ज्योतिषांनीं लिहिल्याप्रमाणें यांचा जीवनक्रम तंतोतंत चालल्याचें प्रसिद्धच आहे; तेव्हां आम्हांस कांहीं निराळें लिहावयास नको.

**बाळपण व ईश्वरभक्ति.**

अगदीं लहानपणींच मातृवियोग झाल्यामुळें आणि मातोश्रीची प्रकृति क्षयी असल्यामुळें महाराजांचें पोषण सर्वस्वीं गाईच्या दुधानेंच झालें; म्हणून गोमातेच्या उपकाराची फेड करण्याकरितांच कीं काय महाराजांनीं तिच्या आपत्तिनिवारणार्थ तन-मन-धनें-करून आपलें सर्व आयुष्य वेंचण्याचा संकल्प केला आहे! असो. हे जसजसे मोठे होऊन यांना समजूं लागलें—त्यावेळीं त्यांचें वय ७।८ वर्षांचें असेल—तेव्हां इतर मुलांप्रमाणें हे केव्हांहि चेंडू लगोऱ्या हे खेळ न खेळतां ईश्वराचें भजन करणें, सोबत्यांना घेऊन त्यांच्यामध्यें कीर्तन करणें, रामजयंति, कृष्णजयंति वगैरे उत्सव करणें, खेळगड्यांना ब्राह्मण करून त्यांचें ब्राह्मणभोजन घालणें अशा प्रकारचे खेळ खेळत. हे त्यांचे खेळ पाहून त्यांच्या घरच्या मंडळींसच काय, पण गांवांतील इतर पहाणारांससुद्धां कौतुक वाटत असे. 'पितृदेवोभव' या शास्त्राज्ञेप्रमाणें महाराज नेहमीं वडिलांचे आज्ञेंत वागत असून संस्कृत, धर्मग्रंथ व गायनवादन हे त्यांचेच जवळ शिकले. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षीच महाराजांनीं कीर्तन करण्यास सुरुवात केली; यावरून त्यांना कीर्तनाची स्वभावतःच किती आवड होती व त्यामुळें आज मितीस ते उत्तम कीर्तनकारांत कसे गणले जातात हें कळून येईल. इतक्या लहानपणामध्येंच महाराज कीर्तन करण्याकरितां मधून मधून बाहेर गांवीं जात असत, येणेंप्रमाणें कीर्तनाचा व्यासंग वयाच्या १८ ते २० व्या वर्षीपर्यंत चालला असतां त्यांच्या अंतःकरणांत एक सद्भावना उत्पन्न झाली. ती म्हटली म्हणजे आपण जो यथामति परमार्थाचा मार्ग पत्करला आहे त्याला कोणी तरी योग्य मार्गदर्शक मिळावा; त्याकरितां ते श्रीक्षेत्र सज्जनगडावर गेले. कारण त्यांच्या मनांतील उत्कट इच्छा अशी कीं, उपदेश घ्यावयाचा तो श्रीसमर्थ रामदासस्वामी महाराजांच्या गादीवरील वंशजाकडूनच घ्यावयाचा. त्याप्रमाणें अजमासें शके १८२० सालीं श्रीक्षेत्र सज्जनगडावर श्रीसमर्थांच्या सातव्या पिढीचे वंशज ब्रह्मनिष्ठ श्रीमहारुद्रस्वामिमहाराज यांचें कुटुंब श्री यशोदा-आईसाहेब यांचें दर्शन घेतलें आणि त्यांस आपला मनोदय कळविला. उपदेश देण्याचा अधिकार पुरुषांचा असल्यामुळें आपण तसा उपदेश देऊं

शकत नाहीं असें श्री आईसाहेब यांनीं सांगितलें. परंतु महाराजांची श्रीसमर्थांचे गादीवर दृढ श्रद्धा असल्यामुळें त्यांनीं श्रीसमर्थ गादीकडूनच मला उपदेश पाहिजे असा आग्रह धरिला. श्रीसमर्थांवरील ही त्यांची निष्ठा पाहून श्री आईसाहेबांना आनंद झाला आणि त्यांनीं त्यास श्रीसमर्थांच्या समाधीजवळ नेऊन श्रीसमाधीवरील अक्षरें वाचावयास सांगितलीं; तेथें महाराजांस त्रयोदशाक्षरी महामंत्र दिसला. तो त्यांनीं ग्रहण करून श्रीसमर्थ सांप्रदाय स्वीकारला. उपदेशग्रहणाबद्दल स्वतः श्री महाराजांनींच केलेला एक अभंग आम्हांस एके ठिकाणीं मिळाला आहे तो पुढें देत आहों.

धन्य रामदास धन्य त्यांची माउली ।
धन्य गंगाधर दीन जनां साउली ॥ धृ० ॥
धन्य सज्जनगड धन्य तेथींचे जन ।
धन्य चाफळग्राम जेथें नांदे श्री भगवान् ।
धन्य यशोदामाय धन्य त्यांचा परिवार ।
बालकृष्ण किंकर केला पाहुनि गुरुवार ॥ १ ॥

यशोदा माय बालकृष्णाला गोरक्षणाचाच उपदेश करणार—अशा उपदेशाचें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे. याच सुमारास उत्तर प्रांतांत गाजलेले प्रसिद्ध श्री रामभक्त परशुराम महाराज राजवाडे यांच्या पूजेंतील रामरायाची मूर्ति त्यांच्या आत्याबाईकडून त्यांना मिळाली. या वेळेपासून त्यांच्या परमार्थाचा भाग्यरवि अधिकाधिक प्रकाशमान होऊं लागला. दरसालचे श्रीरामनवमीचे व दासनवमीचे उत्सव या श्रीराममूर्तीपुढें मोठ्या टोलेजंग रीतीनें होऊं लागले. श्रीसज्जनगडाच्या पायथ्याशीं असलेलें परळीखोरें ९ महिनेपर्यंत अखंड नामस्मरणानें सारखें दुमदुमून राहिलें होतें. त्यापुढें वडिलांच्या इच्छेवरून त्यांना घेऊन महाराज काशीयात्रेस निघाले; परंतु हर्दा, उज्जयन, इंदूर, सुजालपूर, झांशी वगैरे ठिकाणच्या कीर्तनलोलुप भगवद्भक्तांच्या अत्याग्रहामुळें ठिकठिकाणीं कीर्तनें करीत करीत श्री क्षेत्र काशी येथें पोंचण्यास महाराजांना जवळ जवळ दोन वर्षें लागलीं. या प्रवासांत उज्जयन येथील बालमारुतीची व ग्वाल्हेर येथील श्रीसंकटमोचन मारुतीची स्थापना

व जेथें जातील तेथें भजनाचा व रामनामाचा प्रसार वगैरे गोष्टी झाल्या. श्रीक्षेत्र काशी येथील श्री शांताश्रमस्वामीमहाराज, कीर्तनाचार्य ह. भ. प. रामचंद्र महाराज चांदवडकर, वे. शा. सं. वझेशास्त्री, महामहोपाध्याय लक्ष्मणशास्त्री द्रवीड जटापाठी, त्यांचे ज्येष्ठबंधु कै. सीतारामशास्त्री व कै. हरि विठ्ठलमहाराज यांच्या साहाय्यानें श्रीदासनवमीचा सोहळा केला. नंतर याच महानुभावांचे प्रोत्साहनानें काशी येथें रामघाटावर श्रीसमर्थ रामदासस्वामींचें मंदिर बांधिलें, त्याचें नांव ‘ श्रीअयोध्याधीश बालक रामदास मंदिर ’ असें ठेविलें. याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत भगवद्भक्तीचा प्रसार करण्यांत व हजारों लोकांना सन्मार्गाला लावण्यांत शके १८२६ पर्यंतचा काल गेला. या सालचे अखेरीस महाराज गंगा घेऊन दक्षिणप्रांतीं आले, आणि श्रीसज्जनगडावर जाऊन, श्रीसमर्थचरणीं गंगा अर्पण केली. नंतर ८।९ महिने त्यांचा मुक्काम वाईसच होता. त्या अवधींत कीर्तन व भगवद्भजन यामध्येंच त्यांचा बहुतेक काल जात असे. त्याच सालचे म्हणजे शके १८२७ चे कार्तिक महिन्यापासून गोरक्षणाच्या कार्यास सुरुवात केली. तिची सविस्तर हकीकत येणेंप्रमाणें आहे.

**गोरक्षण कार्यास सुरवात व वाई येथील श्री गोवर्धन संस्थेची स्थापना.**

श्रीचौंडेमहाराज एक दिवस सकाळीं स्नानास जात असतां वाटेंत एक हृदयद्रावक देखावा त्यांच्या नजरेस पडला. एक मनुष्य एका गाईस ओढून मारीत नेत होता व ती न जातां तेथेंच थकून बसली होती. तिच्या डोळ्यांवाटे अश्रुधारा चाललेल्या होत्या. आपल्या दीन मुद्रेनें आपल्या सभोंवार अवलोकन करीत त्या संकटांतून सोडविणारा कोणी भेटेल कीं काय ? याची जणूं काय वाट पहातच ती तेथें पडली होती. हें पाहिल्याबरोबर एरव्हींच्या साधारण माणसासहि पाझर फुटल्याशिवाय राहणार नाहीं व मग ज्याचें ब्रीद म्हणजे ‘जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥ अशा प्रकारचें’ त्यांना अत्यंत वाईट वाटलें; त्यांनीं त्या गाईस सोडविण्याची फार खटपट केली. त्या गाईचा प्राण वांचावा म्हणून त्यांनीं त्या गाईला मारणाऱ्या इसमास साष्टांग नमस्कार घातला. परंतु त्याच्या पाषाणहृदयास दया आली नाहीं.

नाइलाज होऊन महाराज घरीं परत आले. परंतु त्यांना कांहीं सुचेना. इतक्यांत रा. नारायण नरहर अष्टपुत्रे वकील यांची गांठ पडली. त्यांस त्यांनीं हा प्रकार सांगितला, व म्हणाले, ' वाईसारख्या क्षेत्रीं जेथें हिंदू लोकांची व विशेषतः ब्राह्मणांची मोठी संख्या आहे, तेथें गाईवर दर आठवड्यास अशा प्रकारचे प्रसंग येत असावे, आणि तिकडे कोणींच लक्ष देऊं नये हें बरें नव्हे. निदान सुशिक्षितांनीं तरी इकडे लक्ष देऊन, या गोष्टीचा बंदोबस्त करावा. आज रोजीं रात्रौ कोटेश्वर महाराजांचा उत्सव असून, रात्रीं तेथें कीर्तन आहे. तेथें तुम्हीं येऊन सदर विषय व्याख्यानद्वारां लोकांपुढें मांडावा. ' याप्रमाणें रा. अष्टपुत्रे याजबरोर बोलणें झालें. ते निघून गेल्यावर महाराज दोन प्रहरीं गुरांचे बाजारांत गेले. तो सोमवारचा दिवस होता. तेथें ती गाय विक्रीकरितां आली होतीच. तिची किंमत देऊन तिला सोडवून घेतलें व तिचें नांव शांति असें ठेविलें. त्याच दिवशीं ' श्री गोवर्धन संस्था' स्थापन करून, त्या गाईची पूजा केली. आणि आपलें रहातें घर संस्थेस अर्पण केलें. हाच श्री महाराजांच्या गोरक्षणकार्याचा आरंभ होय. त्या दिवशीं शके १८२७ कार्तिक शुद्ध १० होती.

सदरहू संस्थेची योग्य व्यवस्था करणें व बाजारांतून गाई सोडविणें, सोडविलेल्या गाईच्या चाऱ्याची व्यवस्था करणें, गोग्रासभिक्षा सुरू करणें. इत्यादि गोरक्षणविषयक सर्व कामांची योग्य व्यवस्था करण्याकरितां, महाराज वाईस त्यापुढें सुमारें ५।६ महिने राहिले. या अवधींत कै. दत्त, भाऊराव भावे, स्वरूपचंद शेट, जेठमल शेट, वामनराव मुजुमदार आणि धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले, शंकरराव ऐनापुरे, अष्टपुत्रे वकील, शंकर शेट खरोटे, मामा चिटणीस, नारायण विठ्ठल ढेकणे, विष्णु एकनाथ कान्हेरे, ह. भ. प. दामुबोवा रिसबुड आणि इतर स्वयंसेवकमंडळी यांची गोरक्षणाचे कामांत महाराजांना फार मदत झाली.

यापुढें महाराज गोरक्षणाचे प्रसारार्थ बाहेर गांवीं जाऊं लागले. नरसोबाची वाडी, कुरुंदवाड, सांगली, उंब्रज, शिरवळ या गांवीं गोशाळा स्थापन केल्या. नरसोबाचे

गोरक्षणाचा प्र-

**सार व गोरक्षणी संस्थांची स्थापना.**

वार्डीस गेले असतां तेथें पुजाऱ्यास दृष्टांत होऊन महाराजांना छाटीचा प्रसाद देण्याबद्दल श्रीदत्त महाराजांची आज्ञा झाली व त्याप्रमाणें श्रीमहाराजांस छाटीचा प्रसाद मिळाला. वार्डीस परशुराम तांगेवाला नांवाचा एक पुंड मनुष्य होता. महाराजांच्या कीर्तनावर त्याची श्रद्धा बसली. आणि त्यानें ताब्यांत असलेली जागा तेथील गोरक्षणाचे कार्यास दिली. कुरुंदवाडास गुरांचा बाजार असून तेथें गाईची बरीच विक्री होत आहे असें कळल्यावरून महाराज तेथें गेले आणि आपल्या रसाळ वाणीनें तेथील लोकांच्या मनावर इतका परिणाम केला कीं, त्या बाजारांत येणाऱ्या कसाबांना देखील गोरक्षणाचें तत्व पटलें आणि महाराजावर त्यांची इतकी श्रद्धा बसली कीं, आपल्या मशिदीपुढें कीर्तन करण्याकरितां महाराजांस प्रेमानें त्यांनीं बोलाविलें. इतकेंच नव्हे तर पुन्हां केव्हांहि इकडे येणें झाल्यास आमच्या मशिदीपुढें कीर्तन केल्याशिवाय जाऊं नये असें त्यांनीं महाराजांस कायमचें आमंत्रण देऊन ठेविलें आहे. नंतर महाराज श्रीक्षेत्र काशी येथील मंदिराचे व्यवस्थेकरितां उत्तर हिंदुस्थानांत गेले. त्या वेळीं हर्दा येथें जाऊन गोग्रासभिक्षा सुरु केली. जबलपूरच्या पांजरपोळाचा जीर्णोद्धार केला, जबलपुरांत जे कित्येक कळकळीचे सहाय्यकर्ते मिळाले त्यांत मुनसी नूरमहमद फकीर नांवाचे मुसलमान सद्गृहस्थ होते ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. यानंतर झांशी, ग्वाल्हेर, काशी या ठिकाणीं गोशाळा स्थापन केल्या. काशी येथें श्री. भाऊसाहेब काळे, कीर्तनाचार्य रामचंद्र महाराज चांदवडकर व त्यांचे कनिष्ठ बंधु कै० गोपाळबुवा आणि त्यांची शिष्य मंडळी यांची गोशाळा स्थापण्याचे व चालविण्याचे कामीं फार मदत झाली. महाराजांचें रहाणें काशीस फार होत नसल्यामुळें ही गोशाळा तेथील जैनपाठशाळेचे ताब्यांत दिली आहे.

या उत्तरहिंदुस्थानचे प्रवासांत दक्षिणेंतील प्रसिद्ध सत्पुरुष ब्रह्मीभूत श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची व महाराजांची हर्दा मुक्कामीं भेट होऊन महाराजांनीं अंगिकारलेल्या गोरक्षणाच्या कार्यामुळें उभयतांचें फारच प्रेम जडलें व गोंदवलेकर महाराजांचे समाधीकालापर्यंत तें दिवसेंदिवस

वृद्धिंगतच होत गेलें. आणि गोंदवलेकर महाराजांनींहि आपले मठांत गोरक्षण सुरू केलें. शके १८३१ सालीं महाराज दक्षिणेंत आले व त्या वेळीं वाईस श्री कोटिलिंगार्चन सुरू झालें. काशीस असतां नागपूर गोरक्षणी सभेकडून प्रसिद्ध होत असलेलें ' गोरक्षा ' पत्र बंद पडल्याचें समजल्यावरून वाईस श्रीयुत अष्टपुत्रे वकील यांचें संपादकत्वाखालीं ' गोवर्धनमाला ' नांवाचें मासिक त्यांनीं सुरू केलें. त्याच सालचे कार्तिकापासून श्रीक्षेत्र सज्जनगड येथें त्रयोदशाक्षरी महामंत्राचें तेरा कोटि जपाचें व गायत्री मंत्राचें पुरश्चरणाचा समारंभ नऊ महिनेपर्यंत मोठ्या थाटानें केला. शके १८३२ चे श्रावणांत महाराज सातारा येथें आले. तेथें ५ महिने मुक्काम होता. त्या अवधींत तेथील ' धि एडवर्ड पांजरपोळां ' ची स्थापना केली. याच वेळीं श्रीक्षेत्र जांब, चाफळ व किल्ले सज्जनगड या संस्थानचे अधिपति व श्री समर्थांचे गादीवरील अधिकारी श्री बापूसाहेब महाराज यांनीं आज्ञा केल्यावरून श्री सज्जनगड येथील श्रीसमर्थ समाधीपुढील मंडपावर पत्रे घालण्याचें काम महाराजांनीं हातीं घेतलें. त्या कामांत त्यांचीं १।२ वर्षें गेलीं शके १८३४ सालीं नागपुरास चातुर्मास मुक्काम होता. त्यावेळीं वर्ध्यांचे दासानुदास परांजपे यांनीं समर्थसांप्रदायाचे नांवावर एकंकारादि अनन्वित प्रकार सुरू केले होते. म्हणून कै० श्री दादाजी महाराज सालपेकर व गुलाबराव महाराज यांच्या मदतीनें या अनन्वित प्रकारास आळा घातला, रामदासी पंथांचें खरें स्वरूप प्रगट केलें आणि याच कामाकरितां श्री रामदासी सांप्रदायिक उपासनापद्धति ' नांवाचें पुस्तक लिहून त्याच्या प्रस्तावनेंत श्रीसमर्थवचनाधारेंच श्रीसांप्रदायावर आलेल्या आक्षेपांचें योग्य प्रकारें खंडण केलें.

शके १८३५ सालीं श्रीसज्जनगडावरील मंडपाच्या पत्र्याचें काम संपलें आणि श्रीगोवर्धन संस्थेच्या कायम फंडाची व्यवस्था करण्याकरितां महाराजांनीं मुंबईस पहिला चातुर्मास केला. त्यानंतर शके १८३६ च्या वैशाखांत वाई मुक्कामीं गोशाळेमध्यें श्रीगोपालकृष्णाची मोठ्या समारंभानें त्यांनीं स्थापना केली. या समारंभास नागपूरचे सत्पुरुष दादाजी महाराज सालपेकर व श्री. भाऊराव जोशी हे मुद्दाम आले होते. शिवाय मुंबई, काशी,

झांशी, हर्दा वगैरे दूरदूरच्या ठिकाणाहूनहि पुष्कळ भक्तमंडळी आली होती. याच सालच्या हिंवाळ्यांत सातान्यास महाराजांचा मुक्काम असतांना पांजरपोळांनीं शेतकन्यांना सवलती देण्याची व मेंढराप्रमाणें गाई शेतांत बसविणेची योजना त्यांनीं काढली. आणि अनुभवानें ती विशेष उपयुक्त होईल असें वाटल्यावरून सर्व लोकांस कळण्याकरितां तिचा वर्तमानपत्रद्वारें जाहीर रीतीनें प्रसार केला. त्यामुळें ठिकठिकाणचे शेतकरी या पद्धतीचा फायदा घेऊं लागले आणि त्यामुळें शेंकडों गाईंचे जीव अल्प श्रमानें वांचले.

याच सालांत भोर, लोणंद, परळी, सासवड या गांवीं चार नवीन गोरक्षणी संस्था श्रीमहाराजांनीं काढल्या. त्यानंतर श्रीगोवर्धन संस्थेचें कार्य मुंबई येथील सुप्रसिद्ध व्यापारी शा. परमानंददास रतनजी ( शा. रतनजी जीवनदास आणि कं. ), शा. खीमजी हिराजी काणाजी जे. पी. शा. देवजी रायसी जव्हेरी, व शा. हिराजी कानजी या व्यापारी मंडळीकडे सोंपवून गोरक्षण व गोवर्धन कार्याच्या प्रसारार्थ महाराज मोकळे झाले. गेल्या चै० व. १ शके १८३९ रोजीं पुणें गोरक्षणसंस्थेची स्थापना झाल्यावर गेल्या श्रावण वद्य८चे मुहूर्तावर बारामती येथें श्री. पांजरापोळ व गोरक्षण संस्थेची स्थापना तेथील प्रमुख व्यापारी मंडळीच्या साहाय्यानें त्यांनीं केली. बारामती येथील संस्थेची व्यवस्था लाऊन आल्यानंतर तेथलि श्रमानें व दगदगीनें महाराजांना १५।२० दिवस एकसारखा ताप येऊं लागला; त्यांत ८।१० दिवस तर आंथरुणावर निजून होते, परंतु हातीं घेतलेलें काम तडीस नेऊन तें यशस्वी करण्यासंबंधीं यांची कळकळ इतकी जबरदस्त असते कीं, स्वीकृत कार्यापुढें शारीरिक असो किंवा मानासिक असो कोणत्याही आधिव्याधींस ते जुमानीत नाहींत. असा त्यांचा दृढनिश्चयी स्वभाव असल्यामुळें अंगांत १०३ डिग्रीपर्यंत ताप असतांही ते तसेच निपाणीस गेले व तेथील प्रमुख पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन भाद्रपद शु॥१४ शके १८३९ रोजीं 'श्रीकर्नाटक गोसंरक्षक पांजरपोळ' संस्थेची स्थापना केली. याशिवाय जेथें महाराज जातात तेथें तेथें ते कीर्तनद्वारां गोरक्षणाचा प्रसार करून लोकांत जागृति करितात. त्यांची कीर्तशैली इतकी प्रेमळ, भाविक, रसाळ आणि परि-

णामकारक असते कीं, भाविक माणसांची यांच्यावर श्रद्धा बसेल यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण गोविक्रय करणारे महार मांग वगैरे अंत्यज लोक सुद्धां यांचीं कीर्तनें ऐकल्यावर 'आम्ही याउपर गोविक्रय कधींही करणार नाहीं' अशा शपथा घेण्यास तयार होत असतात. अशीं कित्येक उदाहरणें आह्मीं स्वतः पाहिलीं आहेत. कीर्तनकार नात्यानें महाराजांची योग्यता एकप्रकारें विशेष आहे. तो विशेष हा कीं, सर्व सामान्य कीर्तनकाराप्रमाणें यांनी आजपर्यंत एकही कीर्तन मोल घेऊन केलें नाहीं. हें आह्मांस पक्कें माहीत आहे. 'मोलें कीर्तन करूं नये ।' या श्रीसमर्थवचनाप्रमाणें तंतोतंत यांचें वागणें असतें. यांच्या या निस्पृहपणाचा व स्वार्थत्यागाचा परिणाम यांनीं जे थोडेबहुत प्रचारक तयार केलेले आहेत त्यांवरही झालेला आहे. भक्तिप्रेमाखेरीज महाराजांच्या कीर्तनाचा दुसरा विशेष ह्मटला ह्मणजे

शृंघारिक नवरसिक । यामध्यें सांडावें एक ।
स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूं नये कीं ॥

या श्रीसमर्थ—आज्ञेप्रमाणें त्यांचे कीर्तनांत शृंगाररस किंवा साधकास वर्ज्य अशा गोष्टी केव्हांहि येत नाहींत. अस्तु.

**गोरक्षणी संस्थांचें एकसूत्रीकरण व श्री स. गो. महा मंडळाची स्थापना**

स्थापन झालेल्या सर्व गोरक्षणी संस्थांचें नियमन व्हावें, त्यांच्यांत परस्परांमध्यें सहकारित्व असावें, अडचणीच्या वेळीं एकमेकांस एकमेकांचा उपयोग व्हावा इत्यादि कारणांकरितां सर्व गोरक्षणी संस्थांचें एकसूत्रीकरण व्हावें अशी महाराजांची बरेच दिवसांची इच्छा असल्यावरून मिति ज्येष्ठ वद्य १४ शके १८३९ तारीख १८ माहे जून सन १९१७ इ. रोजीं पुणें येथील विद्वान पुढारी व धनिक व्यापारी यांच्या सहाय्यानें श्री. स. गो. महामंडळाची स्थापना केली. त्याचे नियम व उद्देशाचें त्रोटक भाषांतर इंग्रजींत या पुस्तकाचें शेवटीं दिलें आहे. त्यावरून या मंडळाविषयीं थोडीशी कल्पना येईल.

श्रीचौंडेमहाराजांच्या जीवनक्रमाची त्रोटक हकीगत येणेंप्रमाणें दिली आहे. ही पाहतां आमच्या लेखाचा मथळा 'श्रीचौंडेमहाराज व गोरक्षण'

असा जो दिला आहे तो यथार्थ आहे असेंच वाचकांस वाटेल. कारण, प्रौढवयापासून आजपर्यंतचें सर्व जीवित केवळ गोरक्षणकार्यासच त्यांनीं लाविलें आहे व पुढें सुद्धां हा ओघ असाच अव्याहत चालू राहील अशी त्यांच्या सहवासानें आमची खात्री झाली आहे. आणि म्हणूनच सामान्य भक्ताविषयीं ' विषय तो त्यांचा झाला नारायण ' असें ज्याप्रमाणें तुकोबारायांनी वर्णन केलें आहे त्याप्रमाणें श्रीचौंडेमहाराजांचें बाबतात ' विषय तो त्यांचा झाला गोरक्षण ।' असें आमच्या अल्पमतीनें आह्मांलाही वर्णन केल्याशिवाय रहावत नाहीं.

श्रीचौंडेमहाराजांनीं आतांपर्यंत केलेल्या कामाची संक्षिप्त हकीगत जी वर दिली आहे, तीवरून या पवित्र कार्यांत आजपर्यंत त्यांनीं एकट्यानींच कायते परिश्रम केले आहेत असें ह्मणण्याचा आमचा बिलकुल उद्देश नाहीं. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध गोभक्त कृष्णाजी आबाजी गुरुजी, नागपुरचे कै० गोपाळ रावजी भिडे, कै० बॅ० नारायण स्वामी नायडू, रामनारायण राठी, स्वामी आलाराम, दयानंद सरस्वती, पं. जगत् नारायण शर्मा त्याचप्रमाणें शेट शिवनारायण राठी हासानंद वर्मा, मि. के. एस् जसावाला, रा. नारायण शिवराम बर्वे वगैरे सज्जनानीं गोमातेच्या रक्षणार्थ अविश्रांत श्रम केलेले आहेत व त्याचप्रमाणें वारकरी सांप्रदायांतील विद्वान सुप्रसिद्ध सत्पुरुष ह. भ. प. जोगमहाराज, वऱ्हाडांतील प्रसिद्ध साधु डेबूजी बोवा आणि वासकरांच्या फडावरील श्री. गिंडे वकील यांनीं आपल्या सांप्रदायातील गोभक्तीच्या पुनरुज्जीवनार्थ जे प्रयत्न चालविले आहेत ते आम्हांस पूर्णपणें अवगत असून त्यांच्याबद्दल आम्हांस चौंडेमहाराजांच्या इतकाच पूज्यभाव व आदर वाटत आहे. आणि आमची ईश्वराजवळ अशी प्रार्थना आहे कीं, देशांतील प्रत्येक गांवीं श्री. चौंडेमहाराज, स्वामी आलाराम, जसावाला इत्यादिकांसारखे गोभक्त निर्माण होवोत आणि त्यांच्या तपश्चर्येच्या बळानें आमच्या वैभवशाली आर्यावर्तांत आपल्या परम पूज्य वेदांनीं जिला ' अघ्न्या ' म्हणजे अवध्य असें संबोधिलें आहे व व्यासवाणीनें जिला ' विश्वमाता ' असें ह्मटलें आहे, तिला दिलीपासारखे सद्भक्त पाठीराखे मिळून सर्व हिंदपुत्रांना भरपूर गोरस मिळो, भावी पिढीचा आधारस्तंभ अशीं आमचीं

बालकें गोदुग्धाच्या मुबलक पुरवठ्यानें धष्टपुष्ट होऊन देशाच्या सुस्थितीस हातभार लावोत, गोपुत्रांच्या अमूप संग्रहानें भारतवर्षाच्या शेतीची पूर्ववत अभिवृद्धि होवो, व गोधनाच्या भाग्योदयाच्या योगानें गरीब शेतकरी सुखसंपन्न होवोत. आपली ही प्रार्थना परमेश्वरकृपेनें सफल झाल्यावर कृषिप्रधान हिंदुस्थान देशांतील प्रजा कृषिकर्माच्या संपन्न स्थितीमुळें सुखी झालेली पाहून आपल्या राज्यकर्त्यांनाही आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं. येणेंप्रमाणें ' खरें गोरक्षण ' हें प्रजा व राजा या उभयतांच्या सुखास व आनंदास कारणीभूत आहे.

## गोशाळा व पांजरपोळ संस्थांची माहिती.

१ गोरक्षणी सभा— सीताबर्डी, नागपूर. स्थापना—१।७।१८८८. संस्थापक—कै. गोपाळ रावजी भिडे. अध्यक्ष— श्री. माधवराव बा. किनखेडे वकील. चिटणीस—१ श्री. वासुदेव रा. पुराणिक वकील, २ श्री. शं. ग. गाडगीळ वकील. दरसालचें उत्पन्न व खर्च—१५ हजार. उत्पन्नाच्या बाबी—मालगुजारी, शेती, गवताचें बीड, जंगल, धर्मादाय पेट्या, कापूस व धान्याच्या बाजारांतील धर्मादाय पेट्या, इतर देणग्या, वर्गणी. संस्थेच्या हेतूच्या प्रसारार्थ—पूर्वी उपदेशक फिरत असत, ' गोरक्षा ' हिंदी व मराठी वर्तमानपत्र १६ वर्षेपर्यंत सुरू होतें. उपदेशपर पुस्तकेंहि प्रसिद्ध होत असत.

२ * श्री गोवर्धनसंस्था, वाई. जि. सातारा. कार्तिक शु. १० शके १८२७. संस्थापक— श्री बाळकृष्ण मार्तंड चौंडे महाराज. चालक— १ श्री चौंडे महाराज, २ शा. परमानंददास रतनजी, ३ शा. खिमजी हिरजी कायाणी जे. पी, ४ शा. देवजी रायसी जव्हेरी, ५ शा. हिरजी कानजी. उत्पन्न व खर्च सुमारें ६ हजार. उत्पन्नाच्या बाबी— देणगी, पेट्या, गोग्रास खत, दूधविक्री. हेतूच्या प्रसारार्थ—शेतकऱ्यांच्या शेतीच्या गुरासंबंधीच्या व सांपत्तिक अडचणी दूर केल्या जातात. आसपासचे गांवीं प्रचारक हिंडत असतात. ' गोवर्धनमाला ' मासिक ४ वर्षे सुरू आहे. शिवाय गोरक्षणोपदेशपर उपयुक्त व मनोरंजक पुस्तकें प्रसिद्ध केलीं जातात. नवीन संस्था स्थापिल्या जातात. जरूर पडेल त्या ठिकाणीं प्रचारक पुरविले जातात. प्रचारक तयार करण्याकरितां श्रीगोपाल विद्यालय काढलें आहे.

३ * श्रीगोरक्षणसंस्था, पुणें. जिल्हा पुणें. चैत्र व. १ शके १८३९. अध्यक्ष— श्री. शेट हणमंतराम रामनाथ. चिटणीस— १ डॉ. रा. भि. नाईक, २ ह. भ. प. अनंतदास रामदासी. नुकतीच स्थापना झाली आहे. उत्पन्न— देणगी, पेट्या, गोग्रास, खत, दूधविक्री. शेतकऱ्यांच्या अडचणी शक्य तेवढ्या भागविल्या जातात.

४ पांजरपोळ धुळें, जि. पश्चिम खानदेश. स्थापन १३।५।१८८५ संस्थापक—शेट सखाराम दुर्लभदास. अध्यक्ष— श्री. शेट गुलाबचंद हिरालाल. चिटणीस— श्री. रा. गो. ब. गरुड, शा. गोविंदजी खिमजी. २७ हजार उत्पन्न व खर्च. व्यापारी लोकांचे लाग्यांचें उत्पन्न आहे.

५ सोलापूर पांजरपोळ व शेट वीरचंद दीपचंद अनाथालय—सोलापूर. स्थापना सन १८८९. ट्रस्टी—१ श्री. शेट नरोत्तमदास मुरारजी, २ रा. ब. शेट वसनजी खिमजी, ३ शेट सखाराम नेमचंद व इतर. चिटणीस—१ श्री. शेट हिराचंद नेमचंद दोशी, २ त्रिभुवनदास छगनलाल. ११ हजार उत्पन्न, ७ हजार खर्च. व्यापारी लोकांचे लागे, पेट्या, देणग्या वगैरे उत्पन्न आहे.

६ श्री पांजरपोळ (गोरक्षण) संस्था, अहमदनगर. स्थापना १।६।१८९४. संस्थापक—अहमदनगरचे व्यापारी लोक. अध्यक्ष—श्री. जिवराजजी नेमीचंदजी गुगळे. चिटणीस—के. एस्. फिरोदे बी. ए. एलेल्. बी.—वकील. १० हजार उत्पन्न व खर्च. भुसारमाल- कापूस—कापड यांचे विक्रीवरील धर्मादाय उत्पन्न. शेतकरी लोकांस गाई, बैल देण्यांत येतात व अपंग जनावरांचें संरक्षण होतें.

७ * श्री पांजरपोळ व गोशाळा संस्था, बारामती, जि. पुणें. स्था. भाद्रपद शु. ४ शके १८३९. संस्थापक-श्री चौंडे महाराज व बारामतीचे व्यापारी लोक. अध्यक्ष—शेट तलकचंद कस्तुरचंद. चिटणीस—१ श्री. के. रा. पराडकर, २ श्री. रा. वि. रांगोळे, ३ श्री. मो. गु. बोरीकर. देणगी, पेस्या, व्यापारावरील धर्मादाय, खत–दूध–विक्री वगैरे उत्पन्न आहे. प्रचारकांचे द्वारें आसपासचे गांवीं धर्मोपदेश करून जागृती केली जाते.

८ * श्री कर्नाटक गोसंरक्षक पांजरपोळ निपाणी–जि. बेळगांव, स्था. भाद्रपद शु. १४ शके १८३९. संस्थापक— श्री चौंडे महाराज. अध्यक्ष— श्री शेट चतुरचंद दिवाणी. चिटणीस— श्री गुरुनाथ इस्लामपुरे. उत्पन्न— गोग्रास देणग्या, पेस्या वगैरे. प्रचारकांमार्फत कीर्तन, पुराण वगैरेच्याद्वारें धर्मोपदेश करण्यांत येतो.

९ * श्री गोशाळा (पांजरपोळ) कऱ्हाड, जि. सातारा. संस्थापक–श्री चौंडे महाराज व शेट किसनलाल प्रेमराज. अध्यक्ष— श्री गणपतराव बटाणे. चिटणीस—शेट राजाराम मियाचंद गुजर. लोकांस उपदेश करण्यांत येतो.

१० * श्री गोशाळा शिलापूर, जि. नाशिक. चैत्र शु. ६ शके संस्थापक— श्री गं. सकुताई शिलापूरकर, २ श्री. गं. राधाबाई दाणी. संस्थापकच सर्व व्यवस्था पहातात. उत्पन्न -- कीर्तनद्वारा मिळणारी मदत; धर्मोपदेश करण्यांत येतो.

११ * सांगली पांजरपोळ संस्था, सांगली. संस्थापक श्री चौंडे

महाराज व सांगली येथील व्यापारी लोक. अध्यक्ष— श्री. शेट गोकुळदास मानचंद. चिटणीस— श्री. गोपाळ नारायण उकिडवे. ९ हजार उत्पन्न व खर्च. व्यापारी पट्टी, व्याज, देणग्या वगैरे उत्पन्न आहे.

१२ * श्रीसमर्थ गोशाळा–परळी, ता. व जि. सातारा. चैत्र शु. १ शके १८३७. संस्थापक— श्री चौंडे महाराज. व्यवस्थापक— श्री. रा. केशव गोपाळ देशपांडे. दरसाल उत्पन्न व खर्च–२५० रुपये. उत्पन्न—पेटी, गोग्रास, इतर देणग्या.

१३ धेनु–आश्रम वांद्रें, जि. ठाणें. स्थापना महाशिवरात्र शके १८३८. संस्थापक— श्री वासुदेव विनायक गोडबोले. संस्थापकच सर्व व्यवस्था पाहतात. नवीन आहे. उत्पन्न– गोग्रास व देणग्या. धर्मोपदेश करतात.

१४ श्री हुबळी पांजरपोळ-हुबळी. स्थापना २१।१०।१९०३. संस्थापक— श्री शेट उभाया रामदे व व्यापारी लोक. अध्यक्ष— श्री. रा. रामचंद्र अणापइ अनरड्डी. चिटणीस—चनबसाप्पा बेंडिगिरी. ११ हजार उत्पन्न व १० हजार खर्च. उत्पन्न–व्यापारी धर्मादाय व व्याज. धर्मोपदेश करतात.

१५ श्री गोरक्षण संस्था यवतमाळ, वऱ्हाड. स्था. २५।१२।१९१३ संस्थापक – व्यापारी लोक. अध्यक्ष— श्री शेट हिरजीभाई होरमसजी. चिटणीस—डॉ. सि. कृ. काणे. ५००० उत्पन्न व ३००० खर्च. बाबी–कापूस व धान्य यांवरील लागे, देणग्या. कार्यप्रसारार्थ–हस्तपत्रकें वाटणें, जलसे, मेळे भरविणें, व्याख्यानें देणें, उपदेशक पाठविणें वगैरे केलें जातें.

१६ * दि एडवर्ड पांजरपोळ–सातारा. स्थापना १।९।१९१०. संस्थापक— श्री चौंडे महाराज, साताऱ्चे व्यापारी व प्रमुख नागरिक. अध्यक्ष— श्री. गोकुळदास रामदास. चिटणीस— श्री. शेट मोतीलाल बालमुकुंद, २ शंकरलाल राऊतमल. १॥ हजार उत्पन्न व १२००खर्च. उत्पन्न—पेट्या, देणग्या, व्यापारी लागे. प्रसारार्थ– शक्य ते उपाय योजिले जातात.

१७ महुवा गोरक्षक सभा, महुवा बंदर काठियावाड. स्थापना

३।७।९१. संस्थापक—शा. ओधवजी रामजी सरवय्या. अध्यक्ष—नगरशेट श्री. हरिलाल मोनदास. चिटणीस—ओधवजी रामजी सरवय्या. १३ हजार उत्पन्न व ११॥ हजार खर्च. देणग्या, पेऱ्या, व्याज वगैरे. कार्यप्रसारार्थ– धर्मोपदेश करणें, शेतकऱ्यांना मदत करणें वगैरे होते.

१८ पांजरपोळ शाहूपुरी–कोल्हापूर, २८।१२।१९०६. संस्थापक—व्यापारी मंडळी–शाहूपुरी. अध्यक्ष—रा. रा. सिताराम रघुनाथ शिरगांवकर. चिटणीस—रणछोडदास जमनादास. १०२९९८३ उत्पन्न व ७००० खर्च. उत्पन्न लागे, खत–चामडेंविक्री, भाडें, व्याज, देणगी.

१९ श्री गोरक्षण संस्था, चाळीसगांव, पूर्वखानदेश. कार्तिक शु. १ शके १८२१. संस्थापक—शेट शिवजी रूपजी. व्यवस्थापक—शेट धनजी गोविंदजी. १२००० उत्पन्न व खर्च. बाब—गांवोगांव फिरून मिळणारी मदत. कसाई लोकांकडेस जाणाऱ्या किंवा गेलेल्या गाई सोडवितात.

टीप—*भोर,* सासवड,* लोणंद, नाशिक, जळगांव, संकेश्वर, झांशी,* काशी,* जबलपूर,* नरसोबाची वाडी* इ. ठिकाणीं असलेल्या पांजरपोळाकडे माहिती मागविली होती. तसेंच धामणगांव, कारंजा, मूर्तिजापूर, इ. ठिकाणीं संस्था आहेत असें यवतमाळसंस्थेचे सेक्रेटरी डॉ. काणे यांनीं कळविलें, पण पुस्तकप्रसिद्धीस अवकाश थोडा राहिल्यामुळें वरील संस्थांच्या माहितीचा समावेश या पुस्तकांत करितां आला नाहीं.

---

* सदर्हू संस्था श्री चौंडे महाराजांच्या परिश्रमानें स्थापन झाली.

श्रीक्षेत्र वांई येथील

# गोपालविद्यालय.

हल्लींच्या गोरक्षणी व पांजरपोळ संस्थांस कृषिसाहाय्यक व औद्योगिक स्वरूप देण्याकरितां शिकलेल्या प्रचारकांची जास्त जरूरी असल्यानें दोन वर्षांपूर्वी वांईच्या श्रीगोवर्धनसंस्थेनें सुरू केलेल्या ह्या विद्यालयांत चालू सालीं नवीन २१ विद्यार्थी घ्यावयाचे आहेत. शिक्षणक्रम २ वर्षांचा. जेवणाची व राहण्याची व्यवस्था संस्थेच्या खर्चानें होईल. शिक्षण संपतांच दरमहा १२ रु. पगारावर नेमलें जाईल व योग्यतेप्रमाणें ५० पर्यंत मिळू शकेल. नवीन अभ्यासक्रम येत्या माघ शुद्ध ५ पासून सुरू होणार आहेत. विद्यार्थ्यांनीं मार्गशीर्ष व. ३० चे आंत अर्ज पाठवावे. उमेदवाराचें वय १६ ते २५ असून प्रकृति सुदृढ व अव्यंग असावी. ट्रेनिंग स्कूलच्या धर्तीवर जामीन घेतला जाईल व संस्थेंत निदान १० वर्षें काम करण्याबद्दल करारनामा लिहून द्यावा लागेल. याशिवाय सदर विद्यालयांत अनाथ विद्यार्थ्यांना शक्य ती मदत करण्याची तजवीज केली जाईल; तरी या पवित्र कार्याकरितां दयाळू सद्गृहस्थांनीं मदत केल्यास अनाथ विद्यार्थ्यांना मदत मिळून खऱ्या गोरक्षणाचें पुण्य पदरीं पडेल. विशेष माहिती पत्रद्वारें.

कार्तिक शु. १५ शके १८[illegible] — व्यवस्थापक

गोपालविद्यालय, C/o गोशाळा, वांई,

# OUR-SELVES.

पुराणमित्येव न साधु सर्वं । नचापि काव्यं नवमित्यवद्यम् ॥

—कालिदास

"Every thing is not good simply because it is old, nor is a poem bad because it is new"—*K*ALIDAS.

1. The object of this book is threefold. Firstly there are, in various places in this country, many institutions for the protection of cattle and Panjarpoles for invalid animals. An awakening is being created among the general public, and their sympathy is being enlisted, in the cause of the protection of cattle by means of writings and lectures. All this is highly encouraging to a worker in the cause. But the real and tangible fruit of such institutions ought to be an abundant supply of milk and its products especially for young children and of bullocks for agricultural purposes. The reports however, of the Government Department of Agriculture by such experts as Mr. Hume or Prof. Knight., as well as a study of the actual conditions, show that this is far from being the case. There is in fact a great dearth everywhere of milch—cows and agricultural animals. Our attempt in this book will be to indicate the means by which to enhance the practical utility of the existing movement for the protection of cows, and in so doing, to consider how to increase the economic and industrial advantages in matters such as dairy farms, cattle-breeding, manures, hides of dead animals &c., without hurting the orthodox religious sentiments of the

Hindus or the prejudices of any caste or sect. In giving this information, an account of the self-less and valuable work done by the famous devotee of cows, Shri Chavande Maharaj, during a period of twelve or fourteen years and of the experience obtained by him in founding in various places 15 or 16 Gorakshani institutions, is included in this book.

2. Secondly, if our thoughts regarding the protection of cows, which will be found to be of general utility, are put forth in a Marathi garb, their spread will be limited to Maharashtra only. The present is an age of general awakening, when every important question is widely discussed in the country; and it will be contrary to principles of general progress, to confine the discussion of such an all-important question as Cow-protection to Maharashtra. If, according to the desire of the prominent leaders in India, Hindi were the language of our nation, we would have gladly and proudly published this book in that language. But in asmuch as the fulfilment of that desire is a work of time, we are expressing our ideas in English, which is, for the present at least, the common medium of communication obtaining in the country and it is hoped that it will help in the spread among, and acceptance by, the people, in some measure at least, of our thoughts regarding this important subject. Further, about this time there is going to be held at Calcutta a session of the All-India Cow-protection Conference, at which will assemble from all parts of the country learned and experienced devotees of this Cow-question and where questions as to how the utility of this movement can be enhanced so as to benefit all classes of people, will chiefly come in for discussion. We, therefore, earnestly trust that this English publication will facilitate the exchange of ideas at this juncture also.

Shri Chavande Maharaj has lately founded the Shri Sanatan Govardhan Mahamandal in Poona. Its main objects are to give such direction to the work of Goshalas and Panjarpol institutions in India that their ideal will, as far as possible, conform to the principle set forth above, to bring about sympathy and co-operation among these institutions and when, in future, questions requiring mutual Co—operation in the matter of cow-protection arise, the Shri Sanatan Govardhan Mahamandal should serve as a central body to take them up. We hope this English publication will help to further that object.

3. Thirdly, with a view to accomplish these ends, as also to impress upon the people the utility and importance of Cow-protection, it is proposed to start, as an organ of the Shri Sanatan Govardhan Mahamandal, a weekly called "Gorakshan or Krishi-jivan" ( Cow-protection or the soul of Agriculture, ) devoted to the discussion of questions such as how to render the movement of Cow-Protection beneficial to the people generally, how largely economic and industrial devolopment of India depends on the preserving and increasing the supply of agricultural animals, and also to supply information regarding the work of the numerous institutions for Cow-protection in the various parts of the country. Thus our ideas regarding Cow-protection will make their way in the minds of the public, and, if they find favour with them, will induce many of them to assist us by becoming subscribers to our weekly journal and in various other ways. In the article "Cow-protection in its real sense" and others that follow, we have endeavoured to set out our ideas on this important subject and these articles will serve to acquaint the people with the lines on which this journal will be conducted.

In the present peculiar circumstances, the starting of a

new journal is attended with no few difficulties. In this weekly, however, as we propose to discuss principally matters regarding the protection of Cows and the improvement of agriculture, and as the head of our district and the head of our Presidency have expressed their sympathies for Cow-protection from the point of view of its practical utitity, we hope our task in this matter will be comparatively easy. The articles appearing in this book will be of special value in placing before the Government the method and direction of our work.

In conclusion, we make a general request to all persons interested in this problem that they will recognize the magnitude and importance of the work undertaken by us, and help the cause of true Cow-protection by becoming the subscribers of the weekly journal about to be started and in such other ways as may be possible, so that by so doing they will be serving two mothers, the *Cow* and their country *India*.

# COW-PROTECTION

## in its real sense.

यया सर्वमिदं व्याप्तं जगत्स्थावरजंगमम् ।
तां धेनुं शिरसा वन्दे भूतभव्यस्य मातरम् ॥ १ ॥

—श्रीमन्महाभारत.

" I bow to the Cow, the mother of the past and future ( generations ) who pervades all the movable and the immovabe world.— —*Mahabharat.*

### RELIGIOUS BELIEF—COW, INCARNATION OF MOTHER EARTH.

In ancient Hindu mythology we find that whenever the earth is groaning under some kind of oppression, it always assumes the form of a Cow and approaches the Almighty supplicating Him to relieve her from the prevailent oppression. Hence the Cow came to be believed as the living image of the earth and the earth was believed to be her non-living form. The services, which the Cow renders to humanity in general, more or less, correspond to the favours which the earth bestows upon us and this analogy also accentuated the belief that the Cow and the earth are identical in spirit, though not always in form. This faith somewhat explains the profound reverence with which the Cow has come to be looked upon by the Hindus from times immemorial.

### UTILITY—COW, SECOND MOTHER.

Besides, even if we look from the utilitarian point of view, the Cow proves to be a veritable second mother to

our infants and orphans, and the bullocks whom she gives birth to are the main-stay of our Indian agriculturists. Her excretions provide a very good manure to the land, and thus the Cow, during her whole-life time, wi h a minimum of expense, renders the maximum of service possible. Religious faith, based upon utility, has, therefore, as pointed out in the verse quoted from the Mahabharat, enjoined upon all the pious-minded Hindus to worship the Cow. In *Shrimat-Bhagvat* too Shri Krishna has, in the following verse,

सूर्योऽग्निर्ब्राह्मणो गावो वैष्णवः खं मरुज्जलम् ।
भूरात्मा सर्वभूतानि भद्र पूज.पदानि मे ॥

told that Cow also is one of the objects to be worshipped. This is thus one of those rare instances where utility and faith so agreeably combine.

INFLUENCE OF FAITH.

Our ancient sages were very good masters of psychology, and they knew the fact that if an object, in addition to its utility, is surrounded with a halo of religious belief, then it is sure to tide over the stormy times, when utility alone can not save it from destruction. And we can see the truth of this even in present times, when, compared with other animals, the Cow receives more help in famines from the hands of the Hindus. If we, however, go back in his'ory some 2-3. centuries ago, then we see the liberator of Maharashtra, and the founder of the Maratha Empire, Shivaji the Great, unsheathing his sword as the defender of the Cows and the Brahmins, and liberating them from the hands of the Mahomedan conquerors, who, in their religious fenzy, had vowed to exterminate these two living emblems of the Hindu reli.ion. Shivaji was proud to be called a *Go-Brahman-Pratipalak* and he received this inspiration from the two religious works

*Ramayan* and *Mahabharat*, which have, as we have seen, expressly laid down a mandate to the Kshatriya class to uphold the cause of the Cow and the Brahmin. This mandate was scrupulously observed by that class, and we see in our history many incidents in which even blood was shed and lives were lost to protect the Cow. Even the recent *Arrah* riots were due to the anticipated slaughter of the Cows, and we thus see what potent effect religious sanction in this matter has created upon the minds of the Hindus. Utility alone would have failed to generate such a tremendous influence, and we really admire the foresight and wisdom of the ancient sages in incorporating this idea of Cow-protection in the body of our religion. Fanatics however always carry matters to the extreme, and riots must unhesitatingly be condemned. But apart from that and if kept within reasonable bounds, the principle of Cow-protection is one of the best in our religion, and we can not too highly admire the wisdom of our ancestors in this matter.

### FAITH SHAKEN.

Owing largely to western secular education, tinged with such dogmas as " Cow has no soul " religious faith is being fast undermined, and when atheism, agnosticism, rationalism and such other ' isms ', more or less imperfect in themselves, are spreading their wings everywhere, it is no wonder that the poor Cow should be relegated to an altogether obscure position in the minds of the present generation.

### ITS DISASTROUS RESULTS
### REDUCTION IN THE NUMBER OF COWS.

The result of this is that she is altogether neglected from the Prince down to the peasant. In former times the Princes of India were proud of their herds of king, but now none

so devout a Prince to do her reverence and be proud of his flock. Other less wealthy classes have neither the faith, nor the means, sufficient enough to protect or maintain her. The rich Bhatias and Jains have some sparks of piety left in their minds, but the money they pay for this purpose is, sometimes, as the Fourth Annual Report of the Nagpur Cow-Protection society shows, utilised in some other works of charity. The peasants and the poorer classes, though willing, are unable to maintain her properly and the Cow now-a-days fails to receive adequate protection in the present adverse times. In former ages also the Cow had had to face famines, pestilences, and cruelties of flesh-eaters, but strong religious faith came always to her rescue and the Hindus not only prided themselves upon saving her from destruction, but, had the spiritual satisfaction of having done a religious duty enjoined upon them by the Shastras. Now when strong faith itself does not survive, the Cow, in famines and other calamities, fails to receive necessary protection and the number of the Cows is being fearfully reduced in every year of famine and scarcity.

## IGNORANCE OF THE FARMER-CLASS; ITS RESULTS.

Not only this; the peasants and the lower classes, when utter poverty stares them in their face, are compelled to sell their cows to the butchers to purchase the necessaries for their livelihood. To them the cows are comparatively less useful than their bullocks, implements and their utensils, and when any dire necessity compells them to sell any thing, then their first choice falls on the cows and thus they are the first to be sold to the butcher. The bullocks, being quite necessary for the agricultural pursuits, fetch a higher price than the cows and there is therefore not much demand for bullocks from the butcher class. Likewise, the calves also, being a tax on the

resources of the peasants, are sold, and thus the mothers of the future bullocks and young calves fall in far greater numbers into the hands of the butchers than any other animals, and the result of all this is a heavy toll on the number of the cows and, consequently, on the number of bullocks also. The poor peasants rest content when their immediate wants are satisfied, not knowing how they, by the sale of the cows and the calves to the butchers, strike at the very root of their future prosperity by lessening the number of their most useful animals.

## CRUELTIES OF THE MILKMEN.

